महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते

भारतीय पुराणवस्तुशास्त्र

सिंहावलोकन



सत्यमेव जयते

भारतीय पुराणवस्तुशास्त्र

सिंहावलोकन

('इंडियन आर्कियॉलॉजी' ह्या इंग्रजी पुस्तिकेचें भाषांतर)

मूळ लेखक

ए. घोष

(भारतीय पुराणवस्तु खात्याचे डायरेक्टर-जनरल)

अनुवादक

दे. रा. पाटील

शासन मुद्रणालय नागपुर
१९६३

प्रकाशक

संचालक, राज्य दप्तर व पुरातत्त्व, महाराष्ट्र राज्य, मुंबई

(शासकीय संशोधन व सांस्कृतिक कार्य खातें, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्याकरितां)

[किंमत रु. २·५० नये पैसे.]

Printed by the Manager, Government Press and Book Depot, Nagpur.

अनुक्रमणिका

प्रस्तावना

'भारतीय पुराणवस्तुशास्त्र—सिंहावलोकन' ह्या नांवाचें एक वार्षिक प्रकाशन गेल्या सहा वर्षापासून भारत सरकारचें पुराणवस्तुखातें प्रसिद्ध करीत आहे. या प्रकाशनांत देशांतील पुराणवस्तुविषयक कार्याचा संक्षिप्त अहवाल दरवर्षी प्रसिद्ध होतो. पुराणवस्तुक्षेत्रांत खात्याचे अधिकारी आणि इतर विद्वान् यांनीं संकलित केलेली माहिती या अहवालांत मिळतें.

या महिन्याच्या प्रारंभीं भारत सरकारचे शास्त्रीय शोध आणि सांस्कृतिक संबंध (Scientific Research and Cultural Affairs) यांचे मंत्री प्रोफेसर हुमायून कबीर यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की या अहवालाचा संक्षिप्त गोषवारा निरनिराळ्या देशी भाषांमध्ये भाषांतर करून प्रसिद्ध व्हावयास पाहिजे; म्हणजे त्यामुळें सामान्य जनतेसहि ही माहिती मिळू शकेल. त्यानुसार त्यांनी मला आदेश दिला की, प्रथम हा गोषवारा इंग्रजी भाषेंत मी तयार करावा आणि नंतर योग्य त्या व्यक्तीकडून त्याचे देशी भाषांमध्ये भाषांतर व्हावें.

सामान्य जनतेस पुराणवस्तुविषयक क्षेत्राच्या वार्षिक कार्याचा नीट बोध व्हावा यासाठीं या विषयाच्या पार्श्वभूमीची थोडी माहिती देणें अप्रस्तुत होणार नाही. म्हणून या पुस्तिकेचे पहिले चार खंड प्रस्तावनेच्या स्वरूपांत आहेत. हे खंड जरी जरूरीपेक्षां जास्त लांब वाटत असले तरी विषयाची नीट ओळख व्हावी म्हणून ते देणें अवश्य भासतें. त्यानंतरच्या खंडांत फक्त गेल्या वर्षाच्या कार्याचा अहवाल दिला आहे.

पहिल्या प्रकरणांत म्हणजे '१९०२ च्या पूर्वीचें भारतीय पुराणवस्तु-शास्त्र' यांत मी Ancient India, No. 9 (1953) मध्यें प्रकाशित झालेल्या श्री. सौंद्रिंद्रनाथ रॉय यांच्या 'Indian Archaeology from Jones to Marshall' या लेखाचा भरपूर उपयोग करून घेतला आहे.

मला वाटतें की, ह्या पुस्तिकेंत ज्या शासकीय आणि शास्त्रीय शब्दांचा उपयोग केला गेला आहे त्यांचे परिभाषावाचक शब्द प्रमाणित रूपानें देशी भाषांमध्यें मिळत नाहीत. साहजिकच भाषांतरकाराचें काम बरेंच कठीण होऊन बसलें आहे. तरीपण माझी खात्री आहे की, यांत ते आपली पराकाष्टा करतीलच.

नवी दिल्ली :
१५ आक्टोबर १९५९.

अमलानंद घोष.

भारतीय पुराणवस्तुशास्त्र

१९०२ पर्यंत

(१)

हिंदुस्थानच्या पुराणवस्तुसंपत्तीकडे ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचें १८ व्या शतकाच्या अखेरीस पहिल्यांदा लक्ष वेधलें गेलें. १७८४ सालीं कंपनीच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सर विलियम जोन्स यांच्या उत्साहपूर्ण प्रेरणेनें व त्यांच्या वैयक्तिक मार्गदर्शनाखालीं आशिया खंडांतील देशांचें वाङमय, इतिहास, पुराणवस्तुसाधनसामग्री' शास्त्र व कला या विषयांवर संशोधन करण्यासाठीं कलकत्त्यास 'एशियाटिक सोसायटी' (Asiatic Society) या नांवाच्या संस्थेची स्थापना करण्यांत आली. या संस्थेच्या संस्थापकांपैकीं तत्कालीन गव्हर्नर-जनरल वॉरन् हेस्टिंग्ज हेहि एक होते. ह्यांच्या दहा वर्षे आधीं इंग्रजी वाङमयाचे सुप्रसिद्ध विद्वान् डॉ. जॉन्सन् ह्यांनीं वॉरन् हेस्टिंग्जना एक विशेष संस्मरणीय पत्र लिहिलें होतें. "पौर्वात्त्य देशांचा इतिहास, सांस्कृतिक परंपरा त्यांच्या प्राचीन इमारती व भग्नप्राय अवशेष यांचें सूक्ष्म रीतीनें परीक्षण व सांगोपांग अभ्यास होणें अत्यावश्यक होय" असा खास विनंतिवजा आग्रह त्यांनीं ह्या पत्रांत गव्हर्नर-जनरल-साहेबांना केला होता. एशियाटिक संस्थेच्या स्थापनेमुळें या कार्याला साहजिकच पुष्टि व चालना मिळाली. १७८८ मध 'एशियाटिक रिसर्चेस' (Asiatic Researches) नांवाचें त्रैमासिक (Journal), संस्थेकडून सुरू करण्यांत आलें. पुढें १८१४ सालीं संस्थेच्या कार्यकर्त्यांनी वेळोवेळीं संशोधन करीत असतांना मिळालेल्या पुराणवस्तूंचें एक संग्रहालय पण स्थापन केले. या संस्थेच्या कार्यप्रणालींत पुराणवस्तुसंशोधन व त्या वस्तूंचा सूक्ष्म रीतीनें अभ्यास या कार्यांचाहि कांहींसा समावेश होता. अर्थात् ज कांहीं थोडें कार्य पुराणवस्तुक्षेत्रांत त्यावेळीं केलें गेलें तें शास्त्रशुद्ध पद्धतीनें केलें गेलें नव्हतें. कारण तें बहुश: लौकिक व पौराणिक कथा आणि अद्‌भुतरम्य भाकडकथा यांवरच आधारलेलें होतें. इतकें असूनसुद्धां त्यावेळचें हें कार्य कांहीं दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें होय. उदाहरणार्थ, १७८८ सालीं चार्लस् विल्किन्स यांनीं गुप्तकालीन लिपी आणि कुटील लिपी पहिल्यांदाच वाचून काढल्या. तसेंच होरेस हेयमन विल्सन ह्यांनीं अफगाणिस्थानच्या कांही प्रदेशांचें निरीक्षण करून जो अहवाल प्रसिद्ध केला तो त्यावेळीं झालेल्या कार्याच्या मानानें अतिशय महत्त्वाचा होय.

सन १८०० सालीं लॉर्ड वेलस्ली यांनीं तत्कालीन म्हैसूर राज्याच्या प्रदेशांचें सर्वांगीण परीक्षण करण्यासाठीं फरान्सिस् बुकानन् यांची नेमणूक केली. नंतर १८०७ सालीं त्यावेळच्या बंगालमधील स्थळ, इतिहास तथा पुराणवस्तुसाधनसंपत्तिविषयक माहिती एकत्रित करण्यासाठीं व त्याचप्रमाणें या मुलुखांची भौगोलिकदृष्टया पाहणी करण्यासाठीं याच बुकानन्‌साहेबांची पुन्हां नेमणूक झाली. दिनाजपूर, रंगपूर, पुर्णिया, भागलपूर, पाटणा, बिहार, शहाबाद आणि गोरखपूर ह्या जिल्ह्यांमध्यें हें पाहणीचें काम बुकानन्‌साहेबांनीं सतत मेहनत करून पुढील आठ वर्षांत पुरें केलें.

गोरखपूर जिल्ह्याशिवाय इतर जिल्ह्यांचे बुकानन्च्या कार्याचें अहवाल कांहीं वर्षांपूर्वी बिहार सरकारनें प्रसिद्ध केले. या अहवालांचा संक्षिप्त परिचय मॉंटगोमेरी मार्टिन ह्यांच्या 'Eastern India' नामक ग्रंथांत आलेला आहेच. या अहवालावरून बुकानन्साहेबांनीं आपली पाहणी व निरीक्षण किती अचूकपणें व दूरदर्शीपणानें केलें होतें हें लक्षांत येतें.

कलकत्ता मिंट किंवा टंकसाळमध्यें जेम्स प्रिन्सेप हे नाणकपरिक्षक अथवा 'असे-मास्टर' (Assay Master) ह्या हुद्यावर होते. प्रिन्सेपनीं १८३८ सालीं त्यावेळीं अपढच असलेली ब्राम्ही लिपी पूर्णपणें वाचून काढली. ही लिपी त्यावेळपर्यंत कोणीहि नीट वाचूं शकला नव्हता. तिच्या वाचनामुळें अशोकच्या त्यावेळच्या उपलब्ध लेखांचा संपूर्ण बोध झाला. या लेखांमधें समकालीन पाश्चिमात्य ग्रीक राजांचाहि उल्लेख असल्यानें अशोकचा कालनिश्चय करण्यांत विशेष मदत झाली. भारताच्या प्राचीन इतिहासाच्या कालमानाची निश्चित रूपरेखा अशा रीतीनें प्रथमतःच आंखली गेली.

ह्या सुमारास जेम्स फर्ग्युसन ह्या विद्वानानें हिंदुस्थानांतील प्राचीन इमारतींचें वास्तूशास्त्रदृष्टया सूक्ष्म परीक्षण केलें व त्यांचा खोल अभ्यास केला. १८ वर्षें सतत मेहनत करून या विषयांवर त्यांनीं जो ग्रंथ प्रसिद्ध केला, तो अजूनहि या विषयावर प्रमाण मानला जातो.

बुकानन्ची वर सांगितल्याप्रमाणें निरीक्षण कार्यासाठीं नेमणूक, मधूनमधून आग्रा व दिल्ली येथील महत्वाच्या ऐतिहासिक इमारतींची डागडुजी व इतर किरकोळ गोष्टी वगळल्या तर सरकारनें ह्यावेळपर्यंत पुराणवस्तुविषयक क्षेत्रांत विशेष लक्ष दिलें नव्हतें असें म्हणावयास हरकत नाहीं.

सन १८४४ सालीं ब्रिटनच्या 'रॉयल एशियाटिक सोसायटी' नें अजंठा आणि इतर ठिकाणच्या गुंफांतील चित्रांची प्रतिकृति बनविण्यासाठीं व या गुंफा सुस्थितींत ठेवण्याच्या उद्देशानें ईस्ट इंडिया कंपनीच्या तत्कालीन कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना विनंति केली. त्याचा परिणाम म्हणजे त्यावेळीं उभ्या असलेल्या प्राचीन इमारती व इतर पुराणवस्तु यांची सद्यःस्थिति काय आहे त्यांचे गुणधर्म कोणते, त्यांचा विस्तार किती आहे, इत्यादींबाबतींत सारासार व अचूक माहिती एकत्रित करण्यासाठीं कंपनीनें एक कमिशन नेमण्याचें निश्चित केलें. याचवेळीं लॉर्ड हार्डिग्ज यांनीं असा प्रस्ताव मांडला होता कीं, कमिशन नेमण्याचे आधीं या विषयाच्या तज्ञांकडून एक प्रारंभिक स्वरूपाचा अहवाल तयार करण्यांत यावा. तदनुसार प्राचीन अवशेषांचें निरीक्षण करण्यासाठीं कांहीं थोडया अधिकाऱ्यांची नेमणूक पण झाली. परंतु यांतून कांहींहि निष्पन्न झालें नाहीं.

(२)

सन १८६१ सालीं अलेक्झांडर कनिंगहॅम यांनीं तत्कालीन गव्हर्नर-जनरल लॉर्ड कॅनिंग यांना देशांतील प्राचीन अवशेषांचें शास्त्रीय पद्धतीनें निरीक्षण करण्याचा उपक्रम हातीं घेण्याची आवश्यकता पटवून दिली. कनिंगहॅम हे पूर्वी लष्करांत इंजिनियर होते व यावेळेपर्यंत प्राचीन वस्तुसंशोधन क्षेत्रांत भरीव कार्य करून त्यांनीं बरीच प्रसिद्धि मिळविली होती. कनिंग-हॅमच्या प्रस्तावाचा योग्य तो परिणाम होऊन त्यांची योजना कंपनी सरकारनें मान्य केली आणि त्यानीं स्वतःच ही कार्यधुरा अंगावर घ्यावी असें सरकारनें ठरविलें. अशा रीतीनें मध्यवर्ति

सरकारच्या पुराणवस्तु खात्याच्या स्थापनेचा पाया रोंवला गेला व खुद्द कनिंगहॅम या खात्याचे पहिले 'आर्केऑलॉजीकल सर्व्हेयर' बनले. ह्या घटनेमुळें देशांतील पुराणवस्तुसाधन-संपत्तीच्या संरक्षणाची जबाबदारी सरकारवरच आहे अशी पर्यायानें मान्यता दिल्यासारखे झालें. परंतु, ह्यावेळीं प्राचीन इमारतींच्या संरक्षणाची जबाबदारी ह्या 'सर्व्हे' वर नव्हती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

नोव्हेंबर १८६१ ते जानेवारी १८६५ पर्यंत फाहियान आणि ह्यूएन्त्स्यांग ह्या चिनी यात्रेकरूंच्या प्रवासवर्णनाच्या आधारानें कनिंगहॅमनें उत्तर हिंदुस्थानांतील बऱ्याचशा भागांचें पुराणवस्तु-संशोधनानिमित्त निरीक्षण केलें. या निरीक्षणांत त्यांनीं अनेक प्राचीन इमारतींचा अभ्यास केला, ठिकठिकाणीं खंडित अवशेष शोधून काढले, व या सर्व कार्याचा विस्तृत अहवाल फोटो आणि आराखड्यासहित प्रसिद्ध केला. दुर्दैवानें १८६५ सालीं कांहीं अज्ञात कारणानें सरकारनें हा 'सर्व्हे' बंद केला.

या नंतरच्या पांच वर्षांत कांहीं प्राचीन इमारतींचे फोटो घेणें व कांहीं वास्तूकलाखंडांच्या प्रतिकृति बनविणें इत्यादि थोडेसेंच कार्य झालें. ह्याशिवाय या क्षेत्रांत महत्त्वाची अशी प्रगति झाली नाहीं. १८७० सालीं, त्यावेळचे सेक्रेटरी ऑफ स्टेट, लॉर्ड आर्गिल, ह्यांना याबाबतींत कांहींतरी भरीव कार्य होणें अत्यावश्यक आहे आणि तें केवळ केंद्रीय सरकारच्या एका स्वतंत्र खात्यामार्फतच होणें शक्य आहे अशी जाणीव झाल्याकारणानें त्यांनीं 'आर्केऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया'स पुनर्जन्म दिला. या सर्व्हेचे, 'डायरेक्टर जनरल' म्हणून परत कनिंगहॅमचीच नेमणूक झाली. मात्र आतां त्यांच्या मदतीस आधीं दोन व नंतर तीन सहाय्यक अधिकाऱ्यांची नेमणूक झाली.

नंतरच्या १४ वर्षांत, म्हणजे १८८५ पर्यंत, कनिंगहॅम आणि त्यांचे सहाय्यक यांनीं उत्तर व पूर्व हिंदुस्थानांतील बरींच प्राचीन स्थळें शोधून काढलीं व त्यांचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें. या कार्यांत कांहीं महत्त्वाच्या ठिकाणीं त्यांना दोनतीनदां जाऊन पाहणी करावी लागली. या कार्याचें फलस्वरूप म्हणजे बरेच शिलालेख, नाणीं, शिल्पें, इत्यादि पुराणवस्तू-विषयीं अमूल्य माहिती त्यांनीं एकत्रित केली. या कामगिरीचें वर्णन कनिंगहॅम यांनीं स्वतःच्या भाषेंत संक्षिप्तपणें दिलें आहे तें असें ––

"प्राचीन हिंदुस्थानांतील बऱ्याचशा महत्त्वाच्या शहरांचा तसेंच प्रसिद्ध स्थानांचा कसो-शीने शोध करून त्यांच्या मूळ स्थानांचा मी स्थलनिर्णय केला. उदाहरणार्थ, एओर्नोसचा खडक, तक्षशिला नगरी, संगलचा किल्ला या सर्व स्थानांचा 'अलेक्झांडर दी ग्रेट'च्या इतिहासाशी निकट संबंध येतो. हे सर्व कोठें होते याचा मी नीट शोध काढला. त्याचप्रमाणें सांकिसा, श्रावस्ती व कौशांबी ह्या नामांकित शहरांचा बुद्धाच्या इतिहासाशीं निकट संबंध येतो. हीं शहरें कोठें वसलीं होतीं हेंहि मी शोध करून दाखवून दिलें. माझी सर्वांत महत्त्वाची कामगिरी म्हणजे भरहूत येथील श्रेष्ठ स्तूप मी शोधून काढला ही होय. ह्या स्तूपावर बुद्धाच्या जीवनांतील मुख्य प्रसंग कोरलेले आढळतात. व त्याबरोबरच शिलालेखहि मिळतात. राजा अशोकचे तीन शिलालेख मला सांपडले. त्यांत निश्चित् संवत् दिलेला आढळतो. त्याचप्रमाणें खडकावर लिहिलेले या राजाचें एक आज्ञापत्रहि (Edict) मला सांपडलें. याची लिपी बाक्ट्रीयन ग्रीक आहे व त्यांत अशोकचे संपूर्ण बारावे आज्ञापत्र मिळालें आहे. तिगोवा, बिलसड, भितरगांव, कुठेरा आणि देवगढ येथील प्राचीन मंदिराचे

संशोधन करून मी गुप्तकालीन वास्तुशैलीची पूर्ण रूपरेखा निदर्शनास आणून दिली. त्याचप्रमाणें या सामर्थ्यवान् राजवंशाचे नवीन शिलालेख एरण, उदयगिरि, इत्यदि ठिकाणीं मला सांपडले."

वरील शब्दांत कनिंगहॅमच्या कार्याची केवळ ओझरती कल्पना मिळते. वास्तविक पाहतां त्यांनीं केलेल्या कामाचा विस्तार व त्याची उपयुक्तता यापेक्षां कितीतरी मोठी आहे.

(३)

कनिंगहॅमचें कार्यक्षेत्र फक्त उत्तर व पूर्व हिंदुस्थानांतच होतें. हेंच काम पश्चिम हिंदुस्थानांत पुरें करण्यासाठीं 'आर्केऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया'ची स्थापना १८७३ मध्यें करण्यांत आली. या सर्व्हेचा कारभार जेम्स बर्जेसवर सोंपविण्यांत आला. नंतर १८८१ त 'आर्केऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' चें कार्यहि बर्जेसच्याच हातीं आलें.

सन १८७३ मध्यें साम्राज्य सरकारनें स्थानिक किंवा प्रांतीय सरकारांना प्राचीन इमारतींचें 'संरक्षण' करण्याविषयीं आदेश दिले होतें. परंतु १८७८ सालीं लॉर्ड लिटन यांना पूर्णपणें समजून चुकलें कीं, ह्या संरक्षणाच्या कार्याची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनेंच पत्करलेली बरी. त्यांचें म्हणणें असें कीं, "साम्राज्य सरकारच्या नैतिक धोरणानुसार ह्या जबाबदारीचा व कार्याचा शासकीय व आर्थिक भार साम्राज्य सरकारनेंच आपल्या शिरावर घेणें इष्ट आहे असें मला वाटतें." ह्या धोरणाचा योग्य तो परिणाम होऊन १८८१ सालीं एच्. एच्. कोल यांची 'क्युरेटर ऑफ एन्शंट मान्युमेंटस्' या हुद्यावर नेमणूक झाली. पुढच्या दोन वर्षांत कोलसाहेबांनीं आपलें कार्य समाधानकारक रीतीनें पार पाडलें, परंतु १८८३ सालीं ही जागा रद्द झाली आणि पर्यायानें स्थानिक किंवा प्रांतिक सरकारांच्या शिरावर ह्या प्राचीन इमारतींच्या संरक्षणाची जबाबदारी येऊन पडली.

सांपडलेले शिलालेख किंवा अभिलेख एकत्र करणें व त्यांना नीट वाचून काढणें या कामांत कनिंगहॅमनें पूर्वीच विशेष लक्ष घातलें होतें. शिवाय या उपलब्ध लेखांचें पद्धतशीर वर्गीकरण करून त्यांना प्रसिद्ध करावें असेंहि त्यांना फार वाटत होतें. १८८३ सालीं या दिशेनें पहिलें पाऊल टाकलें गेलें व जॉन फेथफुल फ्लीट यांची 'गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट' या पदावर नेमणूक झाली. त्याचप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानाच्या अभिलेखांच्या कार्यासाठीं १८८६ सालीं एक स्वतंत्र जागा निर्माण करण्यांत येऊन त्यावर इ. हुल्ट्झ्श यांची नियुक्ति झाली.

१८८५ सालीं कनिंगहम डायरेक्टर-जनरलच्या पदावरून सेवानिवृत्त झाले व पुढील वर्षांत जेम्स बर्जेस हे डायरेक्टर-जनरल बनले. परंतु बऱ्याच अंशानें डायरेक्टर-जनरलच्या कामाचें निष्केन्द्रीकरण करण्यांत आलें. म्हणजे देशांतील पुन्या सर्व्हेच्या कामासाठीं तीन वेगवेगळचा सव्हअरच्या जागा निर्माण करण्यांत आल्या, आणि पूर्व व उत्तर हिंदुस्थान वगळून पश्चिम व दक्षिण भागाच्या सर्व्हे कामाची जबाबदारी प्रत्यक्ष बर्जेस यांचेवरच पडली. ही व्यवस्था अखेरीस बरीच गुंतागुंतीची आणि निरुपयोगी आढळून आली.

डायरेक्टर-जनरलच्या हुद्यावर तीन वर्षें काम करून बर्जेस सेवानिवृत्त झाले, आणि त्याचवेळेस सरकारनें 'आर्केऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया' चें हें मध्यवर्ती खातें बंद केलें व पुन्हा प्रांतिक सरकारांवर या सर्व्हेच्या कामाची आणि पुराणवस्तुविषयक इतर सर्व कार्यांची जबाबदारी येऊन पडली साहजिकच या कार्यांत पुढील कांहीं वर्षांत विशेष प्रगति होऊ शकली नाहीं.

१८९८ पर्यंत हीच स्थिति कायम होती. यावर्षी सरकारास या कार्याबद्दलच्या आपल्या जबाबदारीची जाणीव होऊन एक योजना बनविण्यांत आली. प्राचीन इमारतींची देखरेख, सुव्यवस्था व त्यांचें नीट संरक्षण या कार्यांसाठीं देशाचे पांच भाग किंवा सर्कल बनविण्यांत यावे, अशा प्रत्येक सर्कलवर एका आर्केऑलॉजिकल सर्व्हेयरची नियुक्ति व्हावी व त्यांनी आपलें कार्य संबंधित प्रांतिक सरकाराच्या हुकमतीखालीं चालवावें, अशी ही योजना होती. दक्षिण हिंदुस्थानाच्या एपिग्राफिस्टच्या पदावर हुल्टस्झसाहेब पूर्वीप्रमाणेंच राहणार होते. ही योजना सुरवातीस फक्त पांच वर्षांकरितां म्हणून मंजूर करण्यांत आली.

१८९९ सालीं लॉर्ड कर्झन गव्हर्नर-जनरल म्हणून हिंदुस्थानांत आले. एकसूत्री धोरणाच्या अभावीं हिंदुस्थानांतील पुराणवस्तुविषयक कार्याची झालेली शोचनीय स्थिति त्यांच्या तात्काळ लक्षांत आली. प्रांतीय सरकारांना या कार्यांत मुळींच आस्था नाहीं हेंहि त्यांच्या ध्यानांत आलें; आणि ह्याचा दुष्परिणाम असा झाला कीं, "प्रेक्षणीय व प्रसिद्ध ऐतिहासिक इमारती कालानुगतीनें धुळीस मिळण्याच्या पंथास लागल्या, आणि जी कांहीं थोडी डागडुजीचीं कामें या इमारतींत केली जात होतीं व त्यांची जी इतर संरक्षणव्यवस्था होत होती. त्यांत कोणत्याहि तत्त्वाचा अवलंब केला जात नसून एकसूत्री धोरणाचा अभाव मात्र त्यांत दिसून येत होता." कर्झनसाहेब पुढें म्हणतात, "जर जर्मनीची सत्ता हिंदुस्थानावर असती तर माझी खात्री आहे कीं, त्या देशाच्या सरकारनें लाखो रुपये या कार्यावर खर्च केले असते. आणि याच कार्यासाठीं आपण ६१,००० रुपयाऐवजीं आतां ८८,००० रुपयें खर्च करीत आहोंत या तुटपुंज्या औदार्यावर स्वतःस धन्य मानून घेत आहोंत." १९०० सालीं बंगालच्या एशियाटिक सोसायटीसमोरच्या आपल्या प्रसिद्ध भाषणांत ते म्हणाले, "अभिलेख-विज्ञान (epigraphy) यास संशोधन कार्याच्या पाठीमागें ढकलणें उचित होणार नाहीं. परंतु त्याचप्रमाणें संशोधन कार्यासहि प्राचीन इमारतींच्या संरक्षण कार्यापेक्षां गौणत्व देणें योग्य ठरत नाहीं. माझ्या सूक्ष्ममतें उत्खनन, संशोधन, पुराणवस्तूंचें वर्गीकरण, विश्लेषण व त्याचें सुटसुटित वर्णन, नवीन शिलालेखांचा शोध व त्यांचें वाचन, आणि या सर्वांच्या बरोबरच आज उभ्या असलेल्या प्राचीन इमारतींचें योग्य संरक्षण व त्यांचें गुणवर्णन या सर्वच गोष्टी आपापल्या परीनें महत्त्वाच्या आहेत." कर्झनसाहेबांच्या वरील उक्तीवरून पुराण-वस्तु-क्षेत्राविषयीं त्यांची दृष्टि किती व्यापक होती हें समजून येतें. उत्खनन, निरीक्षण, संशोधन, अभिलेखविज्ञान, प्रसिद्धीकरण व इमारतींचें संरक्षण या सर्वांचा या कार्यांत त्यांनी समावेश केला होता.

सन १९०० सालीं कर्झन साहेबांनीं प्रांतीय आर्केऑलॉजिकल सर्वेयरच्या कार्यांत सुसंघटितपणा यावा व त्यांना ठीक मार्गदर्शन व्हावें म्हणून डायरेक्टर-जनरलचें पद परत निर्माण करण्याबद्दलचा ठराव ब्रिटिश सरकारापुढें मांडला. या ठरावांत असेंहि होतें कीं, केंद्रीय सरकारनें प्रांतिक सरकारांना दरवर्षी एक लाख रुपये देणगीदाखल द्यावेत. या कार्याच्या केंद्रीकरणाच्या दृष्टीनें—जो कर्झनसाहेबांचा खरा अंतस्थ हेतु असून तो २० वर्षां-नंतर पार पडला असें पुढें दिसून येईलच—हें एक पुढचें पाऊलच होतें असें म्हणण्यास हरकत नाही.

ब्रिटिश सरकारनें ही योजना मान्य केली व त्याप्रमाणें १९०२ सालीं जॉन मार्शल आपल्या तरुण वयाच्या केवळ २६ व्या वर्षी या पुनर्निर्मित आर्केऑलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाचे पहिले डायरेक्टर-जनरल म्हणून हिंदुस्थानांत आले.

१९०२ नंतर

जॉन मार्शलनें पुराणवस्तुकार्याची पद्धतशीर आंखणी व सं
यशस्वी रीतीनें पूर्ण केली. आपल्या आगमनानंतर थोड्या वर्षांतच
येथील प्राचीन इमारतींच्या कारभाराची पूर्ण उलथापालथ करून, त्यांनीं
केली, कांही प्राचीन स्थलांचें उत्खनन करविलें व नवीन संग्रहालयें स
लक्ष पुरविलें. १९०४ सालीं Ancient Monuments Pre
नांवाचा कायदा पास करण्यांत आला. त्याचा मुख्य उद्देश म्हणजे
संरक्षण करणें, ठराविक प्राचीन स्थलांच्या उत्खननांवर नियंत्रण ठे
स्मारकांना सरकारप्राप्त करून घेणें व संरक्षण करणें, तसेंच ऐतिहासि
प्राचीन वस्तूंचें संरक्षण करणें" हा होय.

वर लिहिलेंच आहे कीं पांच वर्षांसाठीं पांच विभाग किंवा सर्क
१८९९ मध्यें सरकारनें दिली होती. परंतु मार्शलनें सरकारला
आर्केऑलॉजिकल सर्व्हेचें अस्तित्व कायम स्वरूपाचें व्हावयास पाहिजे,
स्वरूपाचें आहे कीं, तें कोणत्याहि इतर संघटनेला किंवा संस्थेला पार पा
ह्या कार्यास फाटा दिल्यास देशाच्या प्राचीन अवशेषांच्या संरक्षणाची ज
नाहीं असें मान्य केल्यासारखें होईल. अखेर १९०६ सालीं आर्केऑ
घटनेचें अस्तित्व कायम स्वरूपाचें करण्यांत आलें. ह्या घटनेप्रमाणें
खात्याचे मुख्याधिकारी व शिवाय गव्हर्मेंट एपिग्राफिस्ट अशा दोन मह
त्याचप्रमाणें पुऱ्या देशाचे (म्हैसूर सोडून परंतु ब्रम्हदेश धरून) सहा
बनविण्यांत आलें.

वरीलप्रमाणें आर्केऑलॉजिकल सर्व्हेची एक कायम सरकारी खातें
निर्मिति झाली, त्याच्या कार्यप्रणालीविषयी एक मूलभूत धोरण अ
कार्यास जोराची चालना मिळाली. तसेंच नुकत्याच पास के
Monuments Preservation Act या कायद्याखालीं शेंकडों
व स्थलांचें 'संरक्षण' करण्यांत आलें.

सन १९११ पर्यंत हें खातें बहुश: इंग्रज अधिकाऱ्यांच्याच हातांत हो
बद्दल त्यावेळीं भरलेल्या एका पौर्वात्य विद्वानांच्या परिषदेंत बरीच कडाक
आली. त्याचा परिणाम असा झाला कीं, पुढील वर्षीं सरकारनें योग्य अ
या खात्यांत नेमणूक करण्याचें ठरविलें. १९२१ मध्यें ४० टक्के युरोपिय
हें प्रमाण या खात्याच्या अधिकाऱ्यांत असावें असें सरकारनें ठरविलें
कित्येक वर्षें होऊन गेलीं. हें खातें आतां पूर्णपणें हिंदी लोकांच्या हा
नकोच.

सन १९१९ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया अॅक्टान्वयें पुराणवस्तुसं
केन्द्रीय विषय ठरविण्यांत आला व हें खातें एक मध्यवर्ती संघटना बनली

Monuments Preservation Act खाली प्राचीन स्मारक किंवा स्थल 'संरक्षित' करण्याची घोषणा करण्याचा अधिकार प्रांतीय सरकारांकडेच अजूनहि राहिला होता. हा अधिकारहि नंतर १९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया अॅक्टान्वयें मध्यवर्ती सरकारकडे गेला.

सन १९२० पर्यंत ह्या खात्यानें जें उत्खनन कार्य केलें त्याचें संक्षिप्त विवरण येथें देणें अप्रस्तुत होणार नाहीं. कनिंगहॅमसाहेबांना बौद्धधर्मीय प्राचीन स्थलांविषयी विशेष ओढ होती. आणि म्हणून त्यांनीं सारनाथ, राजगिर, सांची, स्रावस्ति, कुशीनगर, नालन्दा आणि वायव्य सरहद्द प्रांतांतील कांहीं प्राचीन स्थलांकडे विशेष लक्ष पुरविलें. याचा परिणाम म्हणजे बुद्धधर्माशीं निकट संबंध असलेली वास्तुकला, शिल्पकला व मूर्तिविज्ञान या विषयांवरील ज्ञानाचें विशेष संवर्धन झालें व बरीच नवीन माहिती उपलब्ध झाली. प्राचीन शहरांच्या स्थलांपैकीं अलाहाबादेजवळ भिटा, तसेंच पाटणा आणि रावळपिंडी जिल्ह्यांतील तक्षशीला या ठिकाणीं उत्खनन करण्यांत आलें. पैकीं पहिलें ठिकाण ख्रिस्ताब्दिहूनहि प्राचीन असून तें एक महत्त्वाचें व्यापारी केंद्र होतें असें आढळून आलें. पाटणा शहराजवळ मौर्यकालीन राजप्रासादाचे भग्नावशेष दृष्टोत्पत्तीस आले. या उत्खननांपासून असें अनुमान निघतें कीं, येथें अगदीं सुरवातीस लांकडानें बांधलेला भव्य राजवाडा होता आणि त्याचे खांब मात्र एकमेव पाषाणाचे होते. ह्या खांबांची एकूण संख्या ८० किंवा त्यापेक्षां जास्त होती. तक्षशीला शहराच्या स्थानावरहि कित्येक वर्षेपर्यंत, म्हणजे १९१३ पासून १९३४ पर्यंत, उत्खनन चालू राहिलें. या उत्खननावरून निष्कर्ष निघतो की, येथें भिन्नभिन्न काळांत एकावर एक अशा तीन भिन्न शहरांची वस्ति होती. सर्वांत प्राचीन शहर सध्यांच्या 'भीर-पहाडी' नांवाच्या ठिकाणावर वसलेलें होतें व तें इसवी सनापूर्व ५ व्या शताब्दि किंवा त्यापेक्षां जास्त प्राचीन होतें. प्रसिद्ध ग्रीक विजेता अलेक्झांडर याची स्वारी याच शहरावर झाली असावी. दुसरें शहर ज्या भागास हल्लीं 'सिरकप' म्हणतात तेथें होतें. यावर इन्डो-ग्रीक राजांची सत्ता असून इंडो-पार्थियन राजांच्या कारकीर्दींत या शहराची नमुनेदार रचना केली होती असा तर्क आहे. तिसऱ्या म्हणजे शेवटच्या शहराची वस्ती हल्लींच्या 'सिरसुख' या ठिकाणावर होती व त्यावर कुशान लोकांचें राज्य होतें असा उत्खननापासून निष्कर्ष निघतो.

उत्खननक्षेत्रांत सर्व्हेनें केलेल्या कार्याची रूपरेखा वर थोडक्यांत दिली आहेच. परंतु मध्यंतरी एक महत्त्वाची घटना घडली, ती म्हणजे ज्याला आतां "सिंधु नदीची संस्कृति" या प्रसिद्ध नांवानें संबोधिलें जातें. त्या संस्कृतीचे अवशेष पंजाबमधील हरप्पा (मांटगोमेरी जिल्ह्यांत) आणि सिंधमधील मोहेनजोदडो (लारकाना जिल्ह्यांत) या ठिकाणीं अकस्मात् सांपडले हें होय. हीं दोन्ही ठिकाणें आतां पाकिस्तानमध्यें आहेत. १९२१ मध्यें हरप्पा येथें व १९२२ सालीं मोहेनजोदडो या ठिकाणीं खात्यानें रीतसर उत्खनन सुरू केलें. उत्खननाच्या सुरवातीसच असें दिसून आलें कीं येथें मिळत असलेल्या पुराणवस्तु देशांतील इतर प्राचीन स्थानांत मिळत असलेल्या अवशेषांपासून मूळांतच भिन्न स्वरूपाच्या असून त्या दुसऱ्या कोणत्या तरी संस्कृतीचे निर्देशक आहेत. ह्या उत्खननकार्याचा संक्षिप्त गोषवारा १९२४ सालीं लंडनमध्यें प्रसिद्ध झाला. या गोषवाऱ्यांत उत्खननांत मिळालेल्या एका नवीनच अक्षरवटिकेंत लिहिलेल्या कांही steatite मुद्रांचाहि उल्लेख होता. या अक्षरवटिकाचें इराकमध्यें इ. सन पूर्व अदमासें ३,००० वर्षापूर्वीच्या भूमिस्तरांत मिळत असलेल्या अक्षरवटिकेशीं बरेंच साम्य आहे असें पाश्चिमात्य विद्वानांच्या तत्काळ लक्ष्यांत आलें. साहजिकच या शोधानें बराच गाजावाजा

होऊन कालमानदृष्टच्या हिंदुस्थानांतील पुराणवस्तुक्षेत्राचा व्याप किती प्राचीन कालापर्यं पोहोंचतो याची सर्व जगास कल्पना येऊन गेली. हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास या शोधा २,००० वर्षें मागें ढकलला गेला. या वेळेपर्यंत भारताच्या इतिहासाचा प्रारंभ बु काळापासून म्हणजे इ. स. पूर्व अदमासें ५०० पासूनच होतो अशी सामान्य समजूत होती. य शोधानें देशांत एकप्रकारें उत्साही वातावरण निर्माण केलें व त्यामुळें १९२६ सालीं सर्व्हेमध एक अलग 'शोध विभाग' (Exploration Branch) अशा पोट-संघटनेची निर्मिति झाली.

या नवीन शोधांचा पुरा माग लावणें आंता अत्यावश्यक वाटूं लागलें. वरील दोन्ह स्थानीं मोठ्या प्रमाणावर १९३१ सालापर्यंत उत्खनन करण्यांत आलें व त्यांत दोन शहरांच्य अस्तित्त्वाचा पुरावा प्राप्त झाला. सिंध व बलुचिस्थानांतहि अशाच प्राचीन स्थलांच जारीचा शोध सुरूं झाला, जो १९२५ पासून १९३१ पर्यंत चालूं होता. सिंधमध्यें हडप्प संस्कृतिचे अवशेष असलेलीं बरीच अन्य लहान स्थळें शोधून निघालीं, तसेंच अमरी या ठिकाण तर या संस्कृतीच्याहि पूर्वीचे अवशेष प्राप्त झाले आणि झुकार व चन्हुदरो येथें या संस्कृतीच्य नंतरचेहि अवशेष मिळाले. बलुचिस्थानमध्यें बरीच अशींच स्थळें शोधून निघालीं तेहि वरील भिन्न कालांचे द्योतक होत. देशांतील इतर ऐतिहासिक स्थानीं उत्खननें झालीं त्यांत नालन्दा व नागार्जुनी-कोंडा यांचा विशेष उल्लेख करण्यासारखा आहे.

१९२८ सालीं मार्शलसाहेब डायरेक्टर-जनरलच्या अधिकारापासून निवृत्त झाले यानंतर ३ वर्षांतच देशांतील आर्थिक दैनावस्थेमुळें चोहोंकडे सरकारी खर्चांत कपात करण्यां आली आणि परिणामतः १९३२ मध्यें खात्याच्या Exploration शाखेचें उच्चाट करण्यांत आलें, तसेंच खात्याच्या नेहमींच्या चालू खर्चांतहि बरीच छाटनी करण्यांत आली.

१९३१ सालीं खात्याच्या बाहेरील देशी व परदेशी संस्थांना उत्खनन करण्या उत्तेजन देण्याच्या हेतूनें Ancient Monuments Preservation Act म थोडा सुधार करण्यांत आला आणि याचा फायदा घेऊन, अमेरिकन स्कूल ऑफ इंडिक अ इरानियन स्टडीज' व 'बोस्टन म्युझियम ऑफ आर्ट' या दोन्ही संस्थांनी मिळून उपरिनिर्दि चन्हुदरो या प्राचीन स्थानीं उत्खनन केलें.

१९३५ सालीं केंब्रिज व येल या विश्वविद्यालयांनीं हेलमुट डी टेरा यांच्या नेतृत्त्वाखाल भूगर्भीय व प्रागैतिहासिकदृष्टचा संशोधन करण्यासाठीं एक शोधमंडळ (Expedition पाठविलें. या मंडळानें देशाच्या वायव्य सरहद्दीय भागांत बरेंच महत्त्वपूर्ण कार्य केलें.

१९३९ मध्यें मध्यवर्ती सरकारनें सर लियोनर्ड वूली या प्रसिद्ध ब्रिटिश पुरातत्त्वे त्यास पुरातत्त्व खात्याच्या उत्खननादि संशोधन कार्याचें भावी धोरण आंखण्यांत सल्लामसल करण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांत निमंत्रित केलें. वूलीसाहेबानी खात्याच्या प्रस्तुत उत्खन पद्धति तथा कार्यप्रणालीवर बरीच कडक टीका केली. ही टीका जरी कांहींशा घा केलेल्या निरीक्षणावर तथा पूर्वग्रहदूषित मतांवर आधारित असली तरी, त्यांत बराच तथ्यां होता. कारण वस्तुस्थिति अशी होती कीं, अमेरिका आणि युरोपांतील देशांत उत्खन क्षेत्रांत ज्या नवीन-नवीन पद्धतींचा अवलंब केला जात होता तिकडे मध्यवर्ती खात्यानें विशे लक्ष घातलें नाहीं व भारतीय उत्खननशास्त्र अजूनहि जीर्ण स्थितींतच राहिलें. खोलव उत्खनन करतांना सांस्कृतिक क्रमबद्धता (cultural sequence) ठरविण्याच्या दिशे

कोणतेहि प्रयत्न करण्यांत आले नव्हते ; तसेंच उत्खनन करण्यासाठीं योग्य अशा स्थानांची पद्धतशीर योजनांच्या आधारे कधींच निवड करण्यांत आली नाहीं. त्यामुळें पुराणवस्तु-संशोधनदृष्ट्या देशाचा बराचसा भाग अज्ञानांधकारांत राहिला.

१९४० ते १९४४ सालांत खात्यानें उत्तरप्रदेशांतील बरेली जिल्ह्यांत अहिच्छत्रा या प्राचीन ठिकाणीं फार मोठ्या प्रमाणावर उत्खनन केलें आणि अशा रीतीनें प्रथमतःच गंगा नदीच्या वरच्या खोऱ्यांतील प्रदेशांची इ. स. पूर्व १००० पासून ११ व्या शतकापर्यंतची सांस्कृतिक कालक्रमपरंपरा निश्चितपणें ठरविण्यांत आली.

(४)

सन १९४४ मध्यें डॉ. राबर्ट एरिक मॉर्टिमर व्हीलर यांची डायरेक्टर-जनरलच्या पदावर नेमणूक झाली. यांच्या ४ वर्षांच्या कारकिर्दींत खात्याची चोंही बाजूंनीं प्रगति झाली. त्यांनीं खात्यांतील निरनिराळ्या सर्कलांच्या क्षेत्रांच्या मर्यादांमध्यें पुनर्घटना केली. आणि संग्रहालयाच्या व्यवस्थेंतहि फेरबदल केले. तसेंच रावळपिंडी जिल्ह्यांतील तक्षशीला, पांडिचेरी जवळील अरिकेमेडु, हरप्पा आणि म्हैसूर राज्यांतील ब्रम्हगिरी, इत्यादि प्राचीन स्थानांत उत्खनन करीत असतां खात्यांतील अधिकाऱ्यांना तसेंच खात्याबाहेरच्या उमेदवारांना आधुनिक उत्खननपद्धतीचा परिचय करवून दिला. या प्रत्येक ठिकाणच्या उत्खननांनीं महत्त्वपूर्ण परिणाम घडवून आणले.

सन १९५० च्या शासनघटनेमुळें पुराणवस्तुसंशोधनदृष्ट्या महत्त्वाचे फेरफार घडून आले. आतांपर्यंत १९१९ आणि १९३५ च्या कायद्यान्वयें हा संपूर्णतः केंद्रिय विषय होता ही स्थिति बदलून खालीलप्रमाणें फेरफार करण्यांत आले :—

(१) लोकसभेनें जाहीर केल्याप्रमाणें किंवा पास केलेल्या कायद्याखाली जी ऐतिहासिक वा प्राचीन स्मारकें, ध्वस्तावशेष अथवा प्राचीन स्थळें, 'राष्ट्रीय महत्त्वा' चीं म्हणून घोषित केली जातील त्यावर मध्यवर्ती सरकारची हुकूमत असावी.

(२) वरील कलमांत जीं एतिहासिक अथवा प्राचीन स्मारकें समाविष्ट नाहींत, ती संबंधित राज्याच्या (किंवा प्रांतिक) सरकाराच्या अधीन समजावींत.

(३) प्राचीन ध्वस्तावशेष अथवा स्थळें जीं वरील प्रथम कलमांत समाविष्ट नाहींत, तीं मध्यवर्ती व राज्य सरकार या दोघांच्या अधीन समजावींत.

वरील कलमांच्या आधारावर १९५१ सालीं, त्यावेळेपर्यंत जीं प्राचीन स्मारकें व ध्वस्तावशेष अथवा प्राचीन स्थळें ब्रिटिश राज्यांतील प्रांतांत असून आधींच 'संरक्षित' होतीं तीं 'राष्ट्रीय महत्त्वाची' होत, असें लोकसभनें एक कायदा पास करून घोपित केले. आणि या घोपणेंत स्वातंत्र्यपूर्व देशी संस्थानांतील बऱ्याचशा प्राचीन स्थानांचा (ज्यावर मध्यवर्ती सरकाराची पूर्वी हुकूमत नव्हती) ; तसेंच ध्वस्तावशेष असलेल्या ठिकाणांचाहि समावेश करण्यांत आला.

नवीन शासनघटनेखाली प्रत्येक राज्यानें आपल्या अधीन असलेलीं प्राचीन स्मारकें तथा प्राचीन स्थळांचें 'संरक्षण' करण्यासाठी स्वतंत्र कायदे बनवावेत आणि त्यांच्या व्यवस्थेसाठी, आवश्यक असल्यास, आपलें स्वतंत्र खातें ठेवावें असा हेतु आहे. कांहीं राज्यांमध्यें ही संघटनव्यवस्था आधीच होती आणि कांहीं राज्यें ही व्यवस्था करण्याच्या तयारींत आहेत.

पुरातत्त्वक्षेत्राच्या इतिहासाचा हा आढावा संपविण्यापूर्वी हिंदी राज्यसंघांत समाविष्ट होण्याचे आधीं निरनिराळ्या देशी संस्थानांत जें कार्य केलें गेलें त्याचाहि उल्लेख येथें करणें अत्यावश्यक आहे. म्हैसूर संस्थानांत १९०० सालापासूनच या खात्याची निर्मिति झाली होती. यानंतर काश्मीर आणि मयूरभंज या संस्थानांनींहि असलीं खातीं उघडलीं. तदनंतर हैदराबाद, ग्वाल्हेर, त्रावणकोर, भोपाळ, बडोदे व जयपुर यांनीहि हा उपक्रम सुरुं केला. कांही संस्थानांनी आपल्या हद्दींतील प्राचीन स्मारकांचें संरक्षण करण्यांत महत्त्वाची कामगिरी केली व कांहींनीं तर उत्खनन कार्यहि केलें. इतर कांही संस्थानांना साम्राज्य सरकारानें द्रव्य व सल्ला या रूपानें मदत केली.

स्वातंत्र्य प्राप्तिनंतर हीं संस्थानें नाहीशीं झालीं आणि त्यांतील महत्त्वाची प्राचीन स्मारकें मध्यवर्ती सरकारनें 'राष्ट्रीय महत्त्वाचीं स्मारकें' या नात्यानें आपल्या ताब्यांत घेतलीं; आणि पर्यायतः १९५३ मध्यें ज्या संस्थानांत या कार्यासाठी स्वतंत्र खातीं होती त्यांतील बहुतेक अधिकारी आणि नोकरवर्गहि केंद्रिय सरकाराच्या खात्यांत सम्मीलित झाला. १९५९ साली जम्मु आणि काश्मीर संस्थानांतील महत्त्वाची प्राचीन स्मारकें तथा नोकरवर्ग अशाच रीतीनें केंद्रीय खात्यांत विलीन पावले. तात्पर्य, आतां या क्षेत्राच्या दृष्टीनें देशांत एकसूत्री व्यवस्था झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

मध्यवर्ती सरकारचें पुरातत्त्वखातें आज 'शास्त्रीय शोध आणि सांस्कृतिक कार्य' (Scientific Research and Cultural Affairs) या मध्यवर्ती सरकारच्या सचिवालयाच्या अधीन आहे. ह्या खात्याची संघटना आज बरीच मोठी असून तिचें विस्तारक्षेत्र देशभर पसरलेलें आहे. तिचें संघटन व रचना खालीलप्रमाणें आहेत :—

या खात्याचें मुख्य कार्यालय नव्या दिल्लींत आहे. त्याचे मुख्याधिकारी डायरेक्टर-जनरल असून त्यांचे मदतीस जॉइंट डायरेक्टर-जनरल आहेत. त्याचप्रमाणें इतर कार्यासाठीं तीन डेप्युटी डायरेक्टर-जनरल, एक आर्केऑलॉजिकल एंजिनीअर, एक असिस्टंट सुपरिंटेंडेंट असे अन्य अधिकारी या कार्यालयांत आहेत. गेल्या आक्टोबर १५ पासून 'स्कूल ऑफ आर्केऑलॉजी'ची स्थापना न्यू दिल्लींत झाली आहे व तिचें ध्येय होतकरू विद्यार्थ्यांना पुराणवस्तुक्षेत्रांत प्रात्यक्षिक कामाचा अनुभव व शिक्षण देणें हें होय. ह्या स्कूलचे मुख्य अधिकारी म्हणून एक डायरेक्टर आहे.

खात्याच्या दिल्ली येथील मुख्य कार्यालयाशिवाय देशाच्या निरनिराळ्या भागाची विभागणी करून नऊ 'सर्कल' बनविले गेले आहेत. प्रत्येक सर्कलच्या व्यवस्थेसाठीं एक सुपरिंटेंडेंट, एक असिस्टंट सुपरिंटेंडेंट असे दोन अधिकारी आहेत. काहीं सर्कलांमध्यें प्रत्येकीं एक असिस्टंट इंजिनीअरचीहि नुकतीच नेमणूक झाली आहे. हीं सर्कलें खालील प्रमाणें आहेत :—

(१) वायव्य सर्कल—नवी दिल्ली, (२) उत्तर सर्कल—आग्रा, (३) मध्यपूर्व सर्कल—पाटणा, (४) पूर्व सर्कल—कलकत्ता, (५) आग्नेय सर्कल—विशाखापत्नम, (६) नैऋत्य सर्कल—औरंगाबाद, (७) दक्षिण सर्कल—मद्रास, (८) पश्चिम सर्कल—बडोदे आणि (९) मध्य सर्कल—भोपाल याशिवाय जम्मू आणि काश्मीर प्रदेशाकरिता एक छोटे सर्कल नुकतेंच बनविण्यांत आलें आहे व त्यावर एका असिस्टंट सुपरिंटेंडेंटची नेमणूक झाली आहे. या सर्कलांचीं मुख्य कामें म्हणजे प्राचीन स्मारकांना दुरुस्त स्थितींत ठेवणें,

त्यांची संरक्षण-व्यवस्था पाहणें, इतर सामान्य पुराणवस्तुविषयक कार्य करणें आणि सवडी-नुसार उत्खनन व शोधकार्य (exploration) करणें हें होय. अशा रीतीनें गेल्या दहा वर्षांत वायव्य सर्कलनें नव्या दिल्लीमधील पुराणा-किल्ल्यांत उत्खनन केलें. त्याचप्रमाणें दिल्लीच्या ऐतिहासिक तटबंदीच्या जागेवर व यमुना नदीच्या किनाऱ्यावरील आलमगिरपुर या ठिकाणींहि उत्खनन केलें. हेंच काम उत्तर सर्कलनें स्त्रावस्ति व मथुरा या दोन प्राचीन शहरांच्या ठिकाणावर केलें. मध्यपूर्व सर्कलने बिहारमध्यें राजगिरला उत्खनन केले ; तसेंच पश्चिम बंगालमध्यें बिरभानपुर व तामलुक आणि ओरिसामध्यें रत्नगिरि, जौगडा आणि उदयगिरि येथें पूर्व सर्कलनें हें काम केलें. आग्नेय सर्कलनें आंध्र प्रदेशांत शालिहुंडम व कोट्टुरु येथें ; दक्षिण सर्कलनें मद्रासमध्यें सनुर, पल्लवमेडु, अमिर्थमंगलम् आणि कुन्नतुर येथें ; नैऋत्य सर्कलनें गोदावरीच्या खोऱ्यांत बहाळ-टेकवाडा आणि दैमाबाद, तापी नदीच्या खोऱ्यांत प्रकाशाला आणि म्हैसूर राज्यांत मस्की येथें ; आणि पश्चिम सर्कलनें गुजराथेंत अमरेली, रंगपुर, मोत-मचिआला आणि लोथल येथें, अशा रीतीनें उत्खनन कार्याचा थोडक्यांत तपशील आहे.

खात्याच्या उत्खनन शाखेचें (Excavations Branch) कार्यालय आतां नागपुरला आहे. तिचा मुख्याधिकारी म्हणून एक सुपरिंटेंडंट आहे. देशांतील महत्त्वाच्या उत्खननाचा कार्यभार ही शाखा वाहते. व्हीलरसाहेबांच्या कारकिर्दींत आणि नंतरच्या कालांतहि या शाखेनें बरीच महत्त्वाची कामगिरी बजावली. उदाहरणार्थ, ओरिसांत शिशुपालगढ येथें, तसेंच गंगेच्या वरच्या पात्रांतील खोऱ्यांत हस्तिनापुर या ठिकाणीं आणि त्याचप्रमाणें सतलजच्या सुरवातीच्या खोऱ्यांत रूपर, बारा व सलौरा आणि माळव्यांत नागदा व उज्जयिनी, इत्यादि ठिकाणीं या शाखेनें महत्त्वाचें उत्खननकार्य केलें.

अभिलेख-शाखेचें कार्यालय उटकमंडला आहे व त्याचे कार्याधिकारी म्हणजे गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट, दोन सुपरिंटेंडंट व तीन असिस्टंट सुपरिंटेंडेंट हे होत. याशिवाय नागपुरला अरबी आणि फारशी लेखांसाठीं एका असिस्टंट सुपरिंटेंडेंटच्या अधिकाराखालीं अलग कचेरी आहे. नवीन लेखांचा शोध करून त्यांचा संग्रह करणें, त्यांच्या लिपीचा उहापोह करून त्यांचें अचूक वाचन करणें व त्यांना छापून काढून प्रसिद्ध करणें हें ह्या शाखेचें मुख्य कार्य आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची पुनर्रचना व जुळवाजुळव करण्यांत ह्या शाखेनें अतिशय महत्त्वाचें काम केलें आहे, हें सांगणें नकोच ; आणि या लेखाशिवाय हें काम अशक्यप्रायच होतें हें तज्ञांना सांगणें नकोच.

खात्याला जोडून रसायनशास्त्रशाखा पण आहे व त्याचेसाठीं एक आर्केऑलॉजीकल केमिस्ट डेहराडून येथे असतो. त्याचें महत्वाचे काम म्हणजे रासायनिक द्रव्यांच्या सहाय्ये स्मारकांना, त्यांतील मूर्त्यांना, चित्रांना व म्युझियममधील अन्य प्राचीन वस्तूंना स्वच्छ करणें, आहे त्या स्थितींत ठेवण्याचा प्रयत्न करणें व इतर कार्यांची दिशा ठरविणें हें होय. तसेंच ह्या कार्याच्या हेतूनें संशोधन करून नवीन असेच मार्ग शोधून काढणें हेंहि ह्या शाखेचें कार्य असते. याच्या हाताखालीं दोन सहाय्यक आर्केऑलॉजीकल केमिस्ट, एक डेहराडूनला व एक हैदराबादला आहेत. त्यांच्या प्रत्येकाच्या हाताखालीं दोन ज्युनिअर ऑर्केऑलॉजीकल केमिस्ट आहेत. हे अनक्रमें डेहराडून, हैदराबाद, भवनेश्वर व औरंगाबाद येथें असतात व प्राचीन स्मारकांच्या ठिकाणीं या कार्याची व्यवस्था बघतात.

अश्मयुगांतील पुराणवस्तुसंशोधनासाठीं नागपुरला 'प्रागैतिहासिक' कार्याची शाखा आहे व त्यासाठीं एक सुपरिंटेंडेंट व असिस्टंट सुपरिंटेंडेंट आहेत. ही शाखा नुकतीच उघडली असून थोड्या अवधींतच तिनें तापी नदीचें खोरें, बुंदेलखंडांतील नद्यांचीं खोरें, तसेंच बिआस व बाणगंगाचीं खोरें यांत संशोधन कार्य केलें आहे.

खात्याच्या संग्रहालयांच्या देखरेखीसाठीं एक 'संग्रहालय शाखा' पण या खात्यास जोडून आहे. या कामासाठीं एक सुपरिंटेंडेंट व एक असिस्टंट सुपरिंटेंडेंट आहेत. खात्याचीं संग्रहालयें खालील ठिकाणीं आहेत: लाल किल्ला म्युझियम—दिल्ली, फोर्ट सेंट जॉर्ज म्युझियम—मद्रास, टिपू सुलतान म्युझियम—श्रीरंगपट्टण आणि सारनाथ, नालंदा, बोधगया, सांची, खजुराहो नागार्जुनी-कोंडा, हंपी आणि कोंडापूर येथील आर्केऑलॉजीकल म्युझियम.

खात्यास जोडून बागायत विभाग (Garden Branch) पण आहे व त्यासाठीं एक सुपरिंटेंडेंट व दोन असिस्टंट सुपरिंटेंडेंट असून ते कांहीं महत्त्वाच्या स्मारकांतील बागांची व्यवस्था बघतात.

शिवाय तत्कालिक किंवा खास कामासाठीं स्वतंत्र कार्यालयें निर्माण केलीं गेलीं आहेत. उदाहरणार्थ, नागार्जुनसागर-धरण योजनेखाली, जो प्राचीन स्मारकयुक्त प्रदेश पाण्याखालीं जावयाचा आहे त्याच्या उत्खननासाठीं एक स्वतंत्र कार्यालय उघडण्यांत आलें व त्यावर एक सुपरिंटेंडेंट व चार असिस्टंट सुपरिंटेंडेंटची नियुक्ति करण्यांत आली आहे. हें कार्य लौकर संपुष्टांत यावयाचें आहे. तसेंच प्राचीन मंदिरांचें वास्तुशास्त्रदृष्ट्या संशोधन करण्यासाठीं दोन खास अधिकारी नेमण्यांत आले आहेत. पैकी एक उत्तर हिंदुस्थानासाठी भोपाळला व दुसरें दक्षिण हिंदुस्थानासाठीं मद्रासला असतात. त्याप्रमाणें पुराणवस्तु व स्मारकस्थानदर्शक नकाशांचा संग्रह बनविण्यासाठीं एक छोटी ॲटलास (Atlas) शाखाहि नागपुरला उघडण्यांत आली आहे.

विशेष आनंदाची गोष्ट ही की, पुराणवस्तुविषयक कार्यांत आजकाल विश्वविद्यालयें व भिन्नभिन्न राज्य सरकारेंहि विशेष लक्ष देऊं लागलीं आहेत. कलकत्ता विश्वविद्यालयानें तर १९३७—१९४१ मध्येंच बानगड या बंगालमधील प्राचीन स्थानीं महत्त्वपूर्ण उत्खनन कार्य केलें. गेल्या १० वर्षांत डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिटच्युट, पुणें, के. पी. जयस्वाल रिसर्च इन्स्टिटच्युट, पाटणा, या संस्थांनीं, तसेंच अलाहाबाद, सागर, बडोदें, कलकत्ता व वाराणसी विश्वविद्यालयांनीं; तसेंच राजस्थान, सौराष्ट्र, मध्यप्रदेश, मुंबई आणि आन्ध्रप्रदेश येथील राज्यसरकारांनींहि ह्या क्षेत्रांत प्रशंसनीय कार्य केलें. महत्त्वाचें परीक्षण (exploration) कार्य सोडून या संस्थांनी खालील प्राचीन स्थानीं उत्खनन कार्यहि केलें:—

गोदावरीच्या खोऱ्यांत नासिक, जोरवे व नेवासे (डेक्कन कॉलेज); नर्मदेच्या किनाऱ्यावरील त्रिपुरी (सागर विश्वविद्यालय); ह्याच नदीच्या कांठीं महेश्वर व नावदातोली (डेक्कन कॉलेज, बडोदें विश्वविद्यालय व मध्यप्रदेश सरकार ह्यांच्या सहकार्यानें); गुजराथेंत बडोदें, लांगनज व वडनगर (बडोदें विश्वविद्यालय); गुजराथेंतच प्रभासपट्टण व रोजडी (तत्कालीन मुंबई व सौराष्ट्र राज्यसरकार); छत्तिसगढ मध्यें धनोरा व

शिरपुर (मध्यप्रदेश सरकार); उदेपुरजवळील अहार (राजस्थान सरकार); अलाहाबादेजवळ कौशाम्बी (अलाहाबाद विश्वविद्यालय); राजघाट-वाराणशी (वाराणशी विश्वविद्यालय); पाटलिपुत्र, सोनपुर व वैशाली (जयस्वाल इन्स्टिटयुट); पश्चिम बंगालमध्यें चन्द्रकेतुगढ (कलकत्ता विश्वविद्यालय); आणि आन्ध्रप्रदेशांत एल्लेश्वरम् व उतनूर (आन्ध्रप्रदेश सरकार).

प्राचीन स्मारकें, स्थळें आणि वस्तूंच्या संरक्षणाविषयींच्या कायद्याची अंमलबजावणी

Ancient Monuments Preservation Act विषयी वर उल्लेख आला आहेच. प्राचीन स्मारकें, स्थळें व वस्तुविषयक ह्या व इतर कायद्याविषयी सामान्यत: अज्ञान असल्यानें त्याची ठोकळ माहिती येथ देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

१८७८ मध्यें The Indian Treasure Trove Act प्रथम पास करण्यांत आला. ह्या कायद्यांतील महत्त्वाचें कलम म्हणजे जमिनींत किंवा जमिनीशी संलग्न कोणत्याहि ठिकाणी जर कोणत्याहि प्रकारचें १० रुपयांपेक्षां जास्त किंमतीचें धन कोणत्याहि व्यक्तीस सांपडले तर त्यानें जिल्ह्याच्या कलेक्टरला त्याची आगाऊ सूचना दिली पाहिजे आणि सांपडलेली वस्तू जवळच्या ट्रेझरींत जमा केली पाहिजे किंवा त्याबद्दल योग्य जमानत कलेक्टरला दिली पाहिजे. हें धन सांपडण्याच्या तारखेपासून १०० वर्षांपेक्षां पूर्वी पुरलेलें असावें असें जर कलेक्टरनें ठरविलें तर ती बिनमालकीची मत्ता समजली जावी आणि त्या धनाची विभागणी शेंकडा ७५ हिस्सा मालकाला आणि २५ वा हिस्सा ज्यास सांपडलें त्याला अशी व्हावी. मात्र मालक आणि ज्यास सांपडले ती व्यक्ति या दोन्ही-मध्यें याबाबतींत कांही करार झाला असल्यास विभागणी त्याप्रमाणें होण्यास कायद्याची हरकत नाहीं. मालकाची या हिश्श्याबद्दल मागणी नसल्यास ज्यास सांपडलें त्याने पुरें धन घेण्यासहि कायद्याची हरकत नाही. कलेक्टरला वाटल्यास हें पुरें धन अशा रीतीने विभागण्या-ऐवजीं सरकारजमा होऊं शकते. मात्र त्या स्थितींत वरील व्यक्तीस या धनाची पुरी किंमत आणि शिवाय त्याच्या एक-पंचमांश किंमत द्यावी लागते. ज्या व्यक्तीस अशा रीतीनें धन सांपडते त्यानें जर कलेक्टरला वरील कायद्याप्रमाणें सूचना दिली नाही आणि तें धन जमानत ठेवलें नाहीं किंवा त्या धनाविषयी खरी स्थिति कळू नये या उद्देशानें त्यांत फेरफार केला तर त्या व्यक्तीस कायद्याप्रमाणें धनाचा हिस्सा मिळण्याचा हक्क पोहोंचत नाही आणि शिवाय या कृत्याबद्दल त्याला कायद्यानें दंड किंवा एक वर्षाची कैद किंवा दोन्ही अशी शिक्षा सांगितली आहे.

ह्या कायद्याने केलेली महत्त्वाची कामगिरी म्हणजे असंख्य प्राचीन मूर्ति, नाणीं आणि अन्य प्राचीन वस्तू सरकारजमा होऊं शकल्या व त्यामुळें आजची देशांतील बरीचशी संग्रहालय समृद्ध झाली आहेत. लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे कायद्याप्रमाणें सरकारनें हें धन सरकारजमा झाल्यास ज्यांस सांपडले त्यास त्या धनाच्या बाजारु किंमतीशिवाय त्याच्या एक-पंचमांश जास्त रकम देऊं केलें आहे. तरीपण दुर्दैवाने साधारणत: असें आढळून येतें कीं बरेच अज्ञानी लोक सांपडलेलें धन चोरून ठेवतात किंवा सांपडलेल्या धातूंच्या प्राचीन वस्तू वितळून टाकून विकतात व अशा रीतीनें इतिहासाच्या आणि पुराण वस्तू-क्षेत्रांच्या दृष्टीन हें अमूल्य धन कायमचें नाहींसे झाल्यामुळें बरीच हानि होते.

१९०४ च्या Ancient Monument Preservation Act विषयी संपूर्ण माहिती येथें देणें अनावश्यक आहे, कारण तो कायदा बव्हंशी खाली निर्देशिलेल्या Ancient

numents and Archaeological Sites and Remains Act कायद्या-
ब्रदलला गेला आहे. शासनपद्धतींत आणि देशाच्या राजकीय परिस्थितींत बरेच मूलभूत झाले असूनहि प्राचीन स्मारकांचें संरक्षण करण्यांत व उत्खनन कार्याचें नियंत्रण करण्यांत अन्य दृष्टीनें गेल्या ५५ वर्षांत यापूर्वीच्या कायद्यानें सरकारला बरीच मदत झाली आहे.

१९४७ च्या प्राचीन वस्तूंच्या निर्यातीत निर्बंध घालणाऱ्या Antiquities (Export Control) Act नें देशाबाहेर शंभर वर्षांपेक्षा प्राचीन वस्तूंची सरकारी परवान्याशिवाय निर्यात करणाऱ्या व्यक्तीस शिक्षा देण्याची सोय केली आहे. ह्या कायद्याचा उद्देश हा आहे कीं, देशाची प्राचीन साधन-संपत्ति शक्यतो देशाबाहेर जाऊं नये.

गेल्या १५ आक्टोबरला Ancient Monuments and Archaeo-
ical Sites and Remains Act ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. कायदा लोकसभेनें आदल्या वर्षींच पास केला होता. ह्या कायद्यानें १९०४ च्या .cient Monuments Preservation Act मध्यें परिस्थितीनुसार महत्त्वाचे फार केले आहेत, आणि शिवाय त्यांत नवीन महत्त्वाच्या कलमांची जोड दिली आहे. तील महत्त्वाच्या कलमांचा संक्षिप्त गोषवारा किंवा तात्पर्यवजा माहिती येथें देणें श्यक आहे. १९५१ च्या कायद्यांत जाहीर केलेल्या राष्ट्रीय प्राचीन स्मारकें व स्थळें ना हा कायदा पूर्णपणें लागूं पडतो. पूर्वीच्या संस्थानांतील महत्त्वाचीं स्मारकें व स्थळें णि १९०४ च्या कायद्याखालीं संरक्षित असलेल्या सर्व प्राचीन स्मारकें व स्थळें यांचा यांत समावेश होतो. या यादींत गॅझेटमध्यें पूर्वी सूचना देऊन सरकारला अन्य स्मारकें व ळें समाविष्ट करण्याचा अधिकार मिळाला आहे. कायद्याप्रमाणें अशा सर्व स्मारकांना प्राचीन स्थानांना 'संरक्षित स्मारकें व स्थळें' म्हणतात.

जर एकादें असें 'संरक्षित स्मारक' खाजगी मालमत्ता असेल तर केन्द्रीय सरकार अशा लकाशी या स्मारकाची व्यवस्था, दुरुस्ती इत्यादि बाबींविषयी करार करूं शकतें. जर लक असा करार करण्यास तयार होत नसेल तर सरकार कांहीं बाबतींत त्याच्या सुव्यवस्थे-ठीं स्मारकावरचा अधिकार व ताबा घेऊ शकतें आणि आवश्यक वाटल्यास मालकाच्या लकी अधिकारावरहि योग्य ते निर्बंध घालू शकतें.

एकाद्या प्राचीन स्मारकाच्या मालकाच्या कोणत्याहि कृतीनें त्या स्मारकाच्या रक्षिततेला धक्का पोहोंचण्याचा संभव आहे किंवा त्याचे जवळच किंवा त्याला लागूनच र बांधकाम होण्याचा संभव आहे असा खात्याचे मुख्याधिकारी डायरेक्टर-जनरल यांना शय आल्यास, तर त्यांना या स्मारकाच्या मालकाला तसें न करण्याबद्दल हुकूम सोडण्याचा धिकार कायद्यानें दिला आहे. एकाद्या प्राचीन स्मारकाचा कोणत्याहि धार्मिक कामासाठीं त्वा पूजेसाठीं अव्याहत उपयोग होत असला तर त्याला कायद्यानें आडकाठी केलेली नाहीं.

आतां आपण 'संरक्षित प्राचीन स्थळां' विषयीं विचार करूं या. अशा संरक्षित थानांचा शेतीच्या कामासाठीं सामान्य उपयोग करण्याची कायद्याची आडकाठी नाहीं ; रंतु त्या ठिकाणीं इतर खोल खोदकाम, किंवा खाणीचें काम करण्याची **बिलकूल** रवानगी नाही. अशा ठिकाणीं सरकारी परवान्याशिवाय बांधकाम न करण्याची कायद्याची क्ति आहे आणि अशा परवान्याशिवाय बांधकाम झाल्यास तें तेथून **बांधणाऱ्याच्या** र्चानें सरकार नष्ट करूं शकतें

मध्यवर्ती सरकारच्या पुराणवस्तु खात्याच्या अधिकाऱ्याशिवाय कोणाहि व्यक्तिला खात्याचे डायरेक्टर-जनरल यांचेकडून परवाना घेतल्याशिवाय उत्खनन करण्याची सक्त मनाई आहे, त्याचप्रमाणें 'असंरक्षित' प्राचीन ठिकाणीं उत्खनन करण्याची खात्याच्या कोणत्याहि अधिकाऱ्यास कायद्यानें मुभा दिली आहे.

'संरक्षित' किंवा 'असंरक्षित' प्राचीन स्थान जर एकाद्या खाजगी व्यक्तीची मालमत्ता असेल तर सरकार त्या मालकापासून उत्खननांत सांपडलेल्या वस्तु विकत घेऊं शकतें.

कोणत्याहि प्राचीन वस्तू नाहींशा होण्याचा संभव आहे, किंवा आपल्या जागेवरून हलविल्या जात आहेत किंवा नष्टप्राय होऊं पहात आहेत किंवा त्यांना एकाद्या सार्वजनिक स्थानीं प्रदर्शित करणें आवश्यक आहे असें जर मध्यवर्ती सरकारला वाटलें तर त्या वस्तू ते विकत घेऊं शकतात. त्याचप्रमाणें सरकार अशा मालकाला आदेश देऊं शकतें कीं, त्या वस्तू आपल्या मूळ ठिकाणाहून परवानगीशिवाय हलविल्या जाऊं नयेत.

वरील कायद्याप्रमाणें कोणताहि गुन्हा घडल्यास गुन्हेगारास ३ महिने कैद किंवा ५,००० रुपयेपर्यंत दंड, किंवा दोन्ही, याप्रमाणें शिक्षा दिली जाऊं शकते.

या कायद्याबरहुकूम सरकारनें जे नियम बनविले आहेत व ज्यांची अंमलबजावणी १५ आक्टोबर १९५९ पासूनच सुरू होते तेहि तितकेच महत्त्वाचे असल्याने त्यांचाहि सारांशतः उल्लेख करणें येथें गैर होणार नाहीं.

सामान्यतः सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत कोणत्याहि संरक्षित प्राचीन ठिकाणीं जाण्यास सर्व लोकांस परवानगी आहे. कांही विशिष्ट ठिकाणीं जेथें बागा आहेत, ही वेळ सूर्योदयापासून रात्रीं १० वाजेपर्यंत ठरविली गेली आहे. कांहीं ठराविक ठिकाणीं ह्या वेळा स्मारक मालकाशीं केलेल्या करारप्रमाणें ठरविल्या गेल्या आहेत.

सामान्यतः कोणत्याहि प्राचीन ठिकाणीं प्रवेश मुफत असतो, कांहीं विशिष्ठ ठिकाणीं मात्र २० नव्या पैशाची फी ठेवली आहे; १५ वर्षांचे आंतील मुलांना फी नाही. अशी प्रवेश फी असलेलीं स्मारकें सकाळीं ९ पासून संध्याकाळीं ५-३० वाजेपर्यंत उघडीं असतात.

कोणत्या प्राचीन संरक्षित ठिकाणीं कोणत्याहि प्रकारची सभा भरविणें, बैठकी करणें किंवा मेजवान्यांचा कार्यक्रम चालविणें यांची सक्त मनाई आहे. मात्र आधींच मान्य केलेल्या धार्मिक संमेलनांना हा निर्बंध लागू नाहीं. अशा ठिकाणीं जाहिरातबाजी करणें, कोणताहि क्रय-विक्रय व्यवहार करणें आणि परवान्याशिवाय स्मारक पाहणाऱ्यांना दाखविण्याचें कार्य (Guide) करणें असल्या सर्व कृत्यांना सक्त बंदी आहे.

संरक्षित प्राचीन स्मारकांचें रेखाचित्र काढणें, फोटो घेणें, इत्यादि कृत्यांना साधारणतः मुभा आहे ; परंतु फोटो काढतांना स्टँडचा उपयोग करणें किंवा कोणत्याहि प्रकारें पाहण्यास आलेल्या लोकांची गैरसोय करणें यांची मात्र बंदी आहे. अशा स्मारकांच्या आवारांत किंवा आंत चलच्चित्र किंवा सिनेमा शूटिंग करण्यास आधींच परवाना घ्यावा लागतो.

कांहीं संरक्षित प्राचीन ठिकाणीं खाणकामावर किंवा बांधकामावर निर्बंध घालणें आवश्यक आहे असें वाटल्यास त्या स्मारकांच्या आसपासच्या जागेला 'निर्बंधित (prohibited) किंवा नियमित (regulated) क्षेत्र' म्हणून जाहीर करूं शकतें किंवा त्याबाबतींत

नियम बनवूं शकतें. निर्बंधित क्षेत्रांत कोणत्याहि खाणकामाची किंवा बांधकामाची पूर्ण बंदी असते आणि 'नियामक क्षेत्रांत' असलें कार्य करणारास परवाना घ्यावा लागतो वरील नियमांचा भंग करून बांधकाम झाल्यास तें नाहीसें करण्याचा सरकारला पूर्ण अधिकार आहे. प्राचीन राष्ट्रीय स्मारकाचें योग्य संरक्षण व्हावें आणि त्याचें आसपासचें वातावरण दर्शनीय असावें या मुख्य हेतूनेच हें निर्बंध घालण्यांत आले आहेत. या निर्बंधामुळें एकाद्या व्यक्तीचें विशेष नुकसान होत असल्यास त्याची भरपाई करण्याची व्यवस्थाहि कायद्यानें केली आहे हेंहि येथें नमूद करणें आवश्यक आहे. कोणत्याहि प्रकारचा नियमभंग झाल्यास या नियमांत ठराविक शिक्षा सांगितलेल्या आहेत.

भारताची अतिपूर्व प्राथमिक संस्कृति

एक किंवा अनेक लक्ष वर्षांपूर्वी, किंवा अत्यंत प्राचीनकाळीं, पृथ्वीतील अन्यप्रदेशा-प्रमाणें भारतांतहि मनुष्यजन्माची उत्पत्ति झाली असावी असा समज आहे. प्रागैतिहासिक मनुष्याचे अश्मीभूत (fossil) अस्थ्यवशेष अजून भारतांत सांपडलेले नाहींत ; परंतु अशा मनुष्याचें अस्तित्त्व त्यानें बनविलेल्या अधून मधून सांपडणाऱ्या ओबडधोबड दगडी हत्यारांनीं किंवा औजारांनीं जाहीर होतें.

पूर्वपाषाणयुगीन (palaeolithic) मनुष्य ज्यावेळीं पृथ्वीवर वस्ती करून होता त्यावेळीं पृथ्वीची हवा आजपेक्षा बरीच वाईट असावी असें दिसतें. समुद्रसपाटीपासून उंच प्रदेशावर दीर्घकालपर्यंत कडक थंडी पडत असून हिमवर्षावहि होत असावा असें तज्ञांचें म्हणणें आहे. अशा दीर्घकालीन हिंवाळ्यानंतर अति कडक उन्हाळा व कोरड्या हवेचा ऋतु येत असावा असेंहि आढळून येतें. त्याचप्रमाणें आसपासच्या सखल मैदानावर फार पाऊस पडत असावा आणि दलदलीची हवा असावी असें दिसतें. या ऋतुकालांच्या पर्यंतरामुळें पृथ्वीच्या पृष्ठभागावर बरींच महत्त्वाचीं स्थित्यंतरें होणें साहजिकच आहे.

नदीकांठच्या भिन्न भिन्न प्राचीन थरांमध्यें किंवा नद्यांनी सोडलेल्या जुन्या पात्रांमध्यें, तसेंच नद्यांच्या प्रवाहानें जमलेल्या बरड्यांत आणि चुनखडी भागांत (gravels) या प्रागैतिहासिक मानवानें बनविलेली पाषाणाची हत्यारें वा औजारें (palaeoliths) मधूनमधून आढळून येतात. अति प्राचीन पहाडी गुफांमध्येंसुद्धा असले अवशेष कधींकधीं इतर देशांत मिळतात. परंतु हिंदुस्थानांत मात्र अशी एकहि गुहा मिळाली नाही.

भारत सरकारच्या भूगर्भशास्त्राचे एक अधिकारी रॉबर्ट ब्रूस फूट यांना १८६३ सालीं मद्रास जवळच्या पल्लवरम या ठिकाणीं हिंदुस्थानांतील सर्वांत पहिले दगडाचे हत्यार सांपडलें. नंतरच्या ७० वर्षाच्या कालांत गंगा व सिंधु नद्यांचीं खोरें सोडून हिंदुस्थानां-तील बऱ्याच प्रदेशांत अशी हत्यारें किंवा औजारें बहुसंख्येनें मिळालीं आहेत ; परंतु ह्या वस्तूंचा भूगर्भशास्त्राच्या कालक्रमानुसार पद्धतशीर अभ्यास केला गेला नव्हता.

युरोपखंडांत जशीं हवामानप्रत्यंतरें घडून आल्याचें दृष्टोत्पत्तीस येतात त्याचप्रमाणें काश्मीरमध्येहि हिमयुग (glaciations) आणि त्यांतील मध्यंतरकाळ अशीं प्रत्यंतरें घडलीं असावींत असें भूगर्भशास्त्रज्ञ यांचें म्हणणें आहे. परंतु युरोपप्रमाणें काश्मीरमध्यें मात्र मनुष्यानें बनविलेलीं पाषाणाशस्त्रें मिळत नाहींत. डी टेरा या तज्ञानें सिंधु नदीला मिळणाऱ्या रावळपिंडी जिल्हयांतील सोहन नदीच्या खोऱ्याचें विशेष निरीक्षण करीत असतांना काश्मीरप्रमाणेंच या प्रदेशांतहि जवळजवळ अशींच हवेचीं प्रत्यंतरें घडून आलीं होतीं असें सिद्ध केलें आहे. या खोऱ्यांत मात्र ही पाषाणाशस्त्रें सांपडलीं आहेत. या 'सोहन-हत्यार' बनवितांना नदीच्या प्रवाहांतील दगडाचा गोटा (pebble) घेऊन त्याच्या वरच्या एका भागाचीं झिलपी (chip) काढली जात होती आणि त्यामुळें उरलेला भाग अणकुचीदार बनत असे. असल्या हत्याराला तज्ञ एक-मुखी (unifacial) परशु

(chopper) असें म्हणतात. काहीं विद्वानांचें म्हणणें आहे कीं, हीं हत्यारें बनविण्याची कृति पूर्वेकडून ब्रम्हदेश, जाव्हा किंवा चीन या देशांतून हिंदुस्थानांत आली असावी. बीआस नदीस मिळणाऱ्या बानगंगा नांवाच्या नदीच्या खोऱ्यांत कांगरा या ठिकाणाजवळ असलीं हत्यारें आढळून आलीं आहेत. असो.

मद्रासजवळ सांपडलेलीं हत्यारें मात्र भिन्न प्रतीचीं आहेत. या हत्यारांचें वैशिष्टय म्हणजे एक मोठा धोंडा किंवा नदीप्रवाहांतील गोटा घेऊन त्याच्या दोन्ही बाजूच्या झिलप्या (chips) काढल्या जात व अशा रीतीनें एक परशुच्या आकाराचीं हाताने वापरण्याची कुऱ्हाड, किंवा पाचर घालण्याच्या कामाचे हत्यार (cleaver), किंवा अण्डाकार हत्यार (ovate) बनविलें जाई. थोडया प्रमाणांत अशा प्रकारचीं हत्यारें उत्तरेंत सोहन नदीच्या खोऱ्यांतहि मिळालीं आहेत. हीं हत्यारें बनविण्याची जी हातोटी आहे त्यांत व युरोप आणि आफ्रिका खंडांत सांपडणाऱ्या 'Abbevillean' and 'Acheleun' हत्यारांच्या बनावटींत बरेंच साम्य आढळून येतें.

हिंदुस्थानांतील पूर्वपाषाणयुगांतील हत्यारांचे मुख्यत: दोन प्रकार पडतात — (१) एकमुखी (unifacial) म्हणजे एका बाजूची झिलपी काढून अणकुचीदार बनविलेलीं व (२) द्विमुखी. संशोधनाअंतीं असें दिसून येतें कीं हिमालयपर्वताच्या प्रदेशांत विशेषत: एकमुखी हत्यारें सांपडून येतात, आणि इतर प्रदेशांत द्विमुखी हत्यारांचा विशेष प्रादुर्भाव आहे. मात्र त्याबरोबरच कोठेंकोठें दोन्ही प्रकारच्या शस्त्रांचें मिश्रण आढळून येतें.

गेल्या कांहीं वर्षांत या प्राचीन पाषाणयुगाच्या अभ्यासाकडे आणि प्रदेशनिरीक्षणाकडे बऱ्याच तज्ञांनी लक्ष घातलें होतें आणि त्याचा परिणाम म्हणजे बऱ्याच नदींच्या किनाऱ्यालगतच्या जमिनीच्या थरांत दगडी हत्यारें सांपडलीं आहेत. ह्या नद्या मुख्यत्त्वेंकरून राजस्थान, पंजाब, गुजरात, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र व दक्षिण प्रदेशांत आहेत.

मध्यप्रदेशांत आणि दख्खनमध्यें हातांत पकडण्याची बिनदांडी कुऱ्हाड किंवा पाचर ठोकण्याचे हत्यार–ज्यास तज्ञ 'प्रकार एक' (Series I) म्हणतात—याचा प्रथम प्रचार सुरू झाला आणि त्यानंतर दुसऱ्या प्रकारच्या (Series II) बहुतकरून लहान पण चांगल्या दगडाच्या हत्यारांचा प्रादुर्भाव झाल्याचें दिसून येतें. याचे आकार बरेच वेगवेगळे असून त्यांत पातें असलेली, खुरचटण्याच्या कामाची (Scrapers) भोंके पाडण्याच्या कामाच्या आणि कोरण्याच्या कामांच्या हत्यारांचा समावेश होतो. विशेषेंकरून नर्मदा नदीच्या कांठीं महेश्वरजवळ आणि गोदावरी नदीस मिळणाऱ्या प्रवरा नदीच्या काठीं नेवाश्याजवळ असा स्पष्ट प्रस्तरयुक्त (Stratigraphic) पुरावा मिळतो कीं, प्रकार २ चीं हत्यारें प्रकार नं. १ च्या हत्यारांच्या मानाने बरींच नंतरची असून, नं. २ ची हत्यारें तर बऱ्याच वरील एका विशिष्ट भूस्तरांत मिळतात. यावरून स्पष्ट होतें कीं, नं. २ आणि नं. १ यांचा परस्पर अनुक्रम-संबंध नसून तीं अगदींच भिन्न काळाची आहेत. केवळ आकाराचा मोठेपणा वगळल्यास ज्यास तज्ञ (microlith) म्हणतात, अशा चिमुकल्या हत्यारांचा वरील नं. २ च्या हत्यारांशीं आकाराच्या दृष्टीनें बरेचसें साम्य आढळून येतें. या चिमुकल्या हत्यारांविषयी (microliths) आतां विचार करूं या.

युरोप, आफ्रिका आणि पश्चिम आशिया खंडांमध्यें सांपडलेलीं असलीं चिमुकलीं पाषाणशस्त्रें मध्यपाषाणयुगकालीन आहेत असें तज्ञांचें म्हणणें आहे. मध्यपाषाणयुग म्हणजे उपरिनिर्दिष्ट पूर्वपाषाणयुग (Palaeolithic age) आणि अभिनव पाषाणयुग—ज्याच्याविषयीं नंतर उहापोह करता येईल—यांच्यामधील काळ होय. हिन्दुस्थानांतील ह्या मध्य काळाविषयीं निश्चित माहिती सध्यां उपलब्ध नाही. हिंदुस्थानांत सांपडणाऱ्या चिमुकल्या पाषाणशस्त्रांचे, ज्या प्रदेशांत तीं सांपडतात त्या अनुरोधानें, तीन प्रकार स्पष्टपणें दिसून येतात. यांतील सर्वांत प्राचीन हत्यारें दक्षिणेंत लाल वाळवंटांत (ज्याला 'टेरिस' असेहि तेथील लोक म्हणतात), आणि पश्चिम बंगालमध्य बिरभानपुर इत्यादि ठिकाणीं सांपडतात. त्यांचा आकार अगदीच ओबडधोबड असून त्यांचे बरोबर इतर कोणत्याहि प्राचीन वस्तू आढळून येत नाहीत. दुसऱ्या प्रकारची चिमुकलीं शस्त्रें आंध्र प्रदेशांत नागार्जुनी-कोंडा आणि गुजराथेंत लांगनज इत्यादि स्थळीं सांपडतात. यांचेसमवेत मातीच्या भांड्यांचे अवशेष मिळतात. तिसऱ्या प्रकारची हत्यारें संपूर्ण विकास पावलेल्या ताम्राश्म-युगांतील (Chalcolithic period) आहेत आणि त्यांची माहिती खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

मध्यप्रदेश, महाराष्ट्र व दक्षिण हिंदुस्थानांत अभिनवपाषाणशस्त्रें (Neoliths), म्हणजे गुळगुळीत करून चमक आणलेलीं हत्यारें, बऱ्याच संख्येनें सांपडतात. हीं हत्यारें उत्तरपूर्व हिंदुस्थानांतहि सांपडतात, परंतु तेथें त्यांचा आकार भिन्न आढळून येतो. सुरवातीस उल्लेखिलेल्या प्रदेशांत त्यांचा आकार गोलसर किंवा चप्पट (oval) आढळून येतो, पण ईशान्येकडील प्रदेशांत हा आकार लांबट गोल (oblong) असून त्याचा कांहीं भाग विशेष फुगीर असतो. ह्या आकाराचीं हत्यारें पूर्वेकडील देशांतून आलीं असावींत असा अंदाज आहे. अभिनवपाषाणयुगाची (म्हणजे तांब्याचा उपयोग माहीत होण्याच्या आधींच्या काळांतील) महाराष्ट्रांतील कांहीं थोड्याच ठिकाणीं उत्खननाचा प्रयत्न झाला आहे. या खणण्यांत जी थोडी माहिती मिळाली आहे त्यावरून दिसून येते कीं काळ्या आणि राखी रंगाच्या मातीची भांडींहि या काळांत उपयोगांत आणलीं जात होतीं. वर उल्लेखलेली चिमुकली शस्त्रेंहि या अभिनवपाषाणकाळाच्या हत्यारांसमवेत कधीं कधीं आढळून येतात.

मध्यप्रदेशांत आणि महाराष्ट्रांत हीं चिमुकलीं हत्यारें, अभिनवपाषाणशस्त्रें आणि तांब्याच्या वस्तु हे तिन्ही परस्परसमवेत सांपडतात. अशा स्थितीच्या कालास chalcolithic म्हणजे ताम्राश्मकाल म्हणण्याचा प्रघात आहे. असा अंदाज आहे कीं या ताम्राश्म-युगांत अभिनवपाषाणशस्त्रांचा प्रादुर्भाव दक्षिणेंतून मध्यप्रदेशांत प्रचलित झाला असावा. परंतु ताम्राश्मयुग-संस्कृतीचा विचार करण्याच्या आधीं वायव्य हिंदुस्थानांत काय परिस्थिति होती ह्याचा विचार करण अत्यावश्यक आहे.

१९२१-२२ सालीं शोधून निघालेल्या हरप्पा संस्कृतीमुळें हिंदुस्थानांतील संस्कृतीच्या मूळ उगमाविषयी व प्राचीनत्त्वाविषयी जी क्रांति घडवून आणली त्याचा उल्लेख वर आलेला आहेच. ह्या संस्कृतीस तज्ञ लोक 'कांसाचे युग' (Bronze Age) म्हणतात. कारण तांबे व पितळ यांचे मिश्रण करून नवीन धातु बनविण्याची विशिष्ट कला यावेळीं मनुष्यानें अवगत केली. या युगाचें वैशिष्टय म्हणजे भाजलेल्या विटांचीं घरें बांधणें व

पद्धतशीर वसाहत करणें (Town Planning), गटारें बनविणें व आटोपशीर गृहरचना करणें इत्यादि विषयांचें ज्ञानहि यावेळीं हस्तगत करण्यांत आलेलें दिसून येतें. सांस्कृतिकदृष्टया ही महत्वाची क्रांति होय, कारण या विषयांची मूलभूत कल्पना जवळजवळ आधुनिक कालीनच म्हटली पाहिजे. या लोकांनीं बनविलेल्या विशेष वस्तू म्हणजे 'steatite' नांवाच्या पाषाणाच्या लिखित मुद्रा होत, ज्यावर कोण्यातरी प्राण्याची आकृति आणि एकदोन ओळीचें अक्षरेंहि आढळतात. हीं अक्षरें अजूनहि नीट किंवा निश्चितपणें वाचली गेली नाहींत. याचप्रमाणें चाकावरून बनविलेल्या विशिष्ट आकाराची मातीची लाल रंगाचीं भांडीहि सांपडतात व त्यांतील कांहींवर काळ्या रंगाचीं चित्रेंहि आढळून येतात. तसेंच कांशाची भांडी, चर्ट (chert) पाषाणाचे चाकू किंवा सुऱ्या, मातीच्या बनविलेल्या देवतांच्या, माणसांच्या आणि अन्य प्राण्यांच्या मूर्ति, सोन्याच्या वस्तू, रंगीत पाषाणापासून बनविलेलें मणीहि या ठिकाणी सांपडले आहेत.

मोहेनजदडो आणि हरप्पा येथें अनुक्रमें सात व आठ भिन्न भिन्न वसाहती झालेल्या दिसून येतात. आतांपर्यंत समज असा आहे की, या वसाहती इ. पूर्व २५०० ते १५०० च्या कालावधींत झालेल्या असाव्यात. या संस्कृतीचा इराकमधील संस्कृतीशी संबंध असल्याचा पुरावा मिळाला आहे यावरून आणि अन्य दृष्टीनें वरील कालमानाचा अंदाज बांधण्यांत आला आहे.

सिंध व बलुचिस्थानमध्यें शोधकार्य होऊन हरप्पा संस्कृतीदर्शक जी बरीच ठिकाण शोधून निघालीं त्याचा उल्लेख वर आलाच आहे. १९३५ मध्यें पंजाबमधील अंबाला जिल्ह्यांत कोटला-निहांग या प्राचीन स्थानाचा शोध लागला. १९४०-४१ मध्यें सध्यांच्या पाकिस्तानमधील बहवालपुर संस्थानांतील गुप्तप्राय: झालेल्या सरस्वती नदीच्या सुकलेल्या पात्रांतहि अशाच कांहीं प्राचीन स्थानांचा शोध मिळाला. १९४६ सालांत हरप्पा येथे परत उत्खनन करण्यांत आलें आणि त्यामुळें या संस्कृतीविषयी आणखी कांहीं नवीन माहिती मिळाली. १९५०—५३ साली तर राजस्थानमधील गंगासागर जिल्ह्यांत सरस्वती नदींत व तिला मिळणाऱ्या दृषद्वती नदीच्या पात्रांत आणखी कांहीं नवीन स्थळें शोधून निघालीं. ह्याच सुमारास कोटला-निहांग जवळ रूपर येथें हरप्पा संस्कृतीचे अवशेष आढळून आले लगेच १९५३—५५ मध्यें रूपर येथें मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्यांत आलें. १९५८ मध्यें ह्या हरप्पा संस्कृतीचें अस्तित्व असल्याच्या खाणाखुणा सर्वांत पूर्वेस म्हणजे यमुना नदीस मिळणाऱ्या हिंदोन नदीच्या किनाऱ्यावरील मीरत जिल्ह्यांतील आलमगिरपुर या ठिकाणीं आढळून आले.

खाली दक्षिणेंत गुजराथमधील झालावाड जिल्ह्यांत रंगपुर येथें हरप्पा संस्कृतीचें अवशेष असल्याचा पूर्वीपासूनच अंदाज होता आणि म्हणून १९५३—५५ मध्यें येथें उत्खनन करण्यांत आलें व तो अंदाज पूर्णतया खरा ठरला. गुजराथेंतहि अहमदाबाद जिल्ह्यांत सरगवाला जवळील लोथल या ठिकाणीं तर हरप्पा संस्कृतीचें महत्त्वाचें ठिकाण शोधून निघाले आणि तेथें १९५५ पासून चालू वर्षापर्यंत मोठ्या प्रमाणावर उत्खनन करण्यांत आले आतांपर्यंत माहीत असलेल्या संस्कृतीचें सर्वांत दक्षिण दिशेंतील ठिकाण म्हणजे तापी नदीच्या मुखाजवळील भगतराव हें होय.

या उत्खननावरून हरप्पा संस्कृतीचा विस्तार पूर्वेपासून पश्चिमेस व उत्तरेपासून दक्षिणेस जवळजवळ ५०० मैलपर्यंत पसरलेला आढळून येतो, आणि ह्या संस्कृतीचा प्रादुर्भाव या सर्व प्रदेशांत बव्हंशी सारखाच दिसून येतो. अर्थात् कांहीं ठिकाणीं कांहीं किरकोळ प्रादेशिक भेद दिसून येतात. उदाहरणार्थ, लोथल येथें हरप्पा धर्तीच्या मातीच्या भांड्याचे अवशेष तर मिळतातच, परंतु त्याबरोबरच फिक्कट (buff-coloured) काळी आणि लाल मातीच्या भांड्याचे अवशेषहि मिळतात. या संस्कृतीचा हा अफाट विस्तार खरोखर अखिल आशिया खंडांतील कांस्ययुगाच्या इतिहासाच्या दृष्टीनें विशेष उल्लेखनीय आहे. हरप्पा येथील १९४६ च्या उत्खननांत असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं, तेथील एका उंचवट्याच्या चोहोंबाजूंनी एक उंच कोट असून त्यांत कांहीं महत्त्वाच्या इमारती असाव्यात असा तर्क आहे. म्हणजे या शहरांतील जीवन लोकसत्तेला पोषक नसावे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें एका भागांत तर एका स्मशानाची जागा शोधून निघाली जेथें मृतांचा देह पुऱ्या पसरलेल्या (extended position) स्थितींत पुरला जात होता.

रूपरमध्यें भाजलेल्या किंवा साध्या सुकविलेल्या विटा आणि दगडानें बांधलेल्या भिंतीचे अवशेष मिळाले ; तसेंच स्टीअटाईट (steatite) या पाषाणाच्या मुद्रा आणि हरप्पा संस्कृतीदर्शक अन्य वस्तु मिळाल्या आहेत. हरप्पाप्रमाणें एका स्मशानाच्या खाणाखुणा पण येथे आढळून आल्या आहेत.

लोथल येथें या हरप्पा संस्कृतीवाल्या लोकांनी कच्च्या विटांनी (mud-bricks) उंच व मोठा चबुतरा बांधलेला असल्याचें आढळून आलें. ह्याचा उद्देश गांवाच्या वस्तीचें अतिवृष्टिपासून संरक्षण व्हावें हा असावा असें दिसतें. कारण याचे चोहोंबाजूने सखल दलदलीत प्रदेश आहे आणि समुद्रहि फार लांब नाहीं. हा चबुतरा अनेकदां वाहून गेला असावा. घरें मात्र भाजलेल्या विटांनीं बांधलेलीं असल्याचें दिसून येतें आणि त्यांत स्नानगृहांची उत्कृष्ट सोय असून पाणी जाण्यासाठी मोऱ्या व सडकेला लागून गटारांची नीट सोय होती.

एकंदरींत असें दिसून येतें की, या संस्कृतीचा पूर्वेकडील विस्तार यमुना नदीच्या पात्रापर्यंत असून तो बव्हंशी नदीकांठच्या प्रदेशावरच झाला असावा. दक्षिणेकडे मात्र हा विस्तार समुद्रमार्गे झाला असण्याचा जास्त संभव वाटतो.

उत्तर हिंदुस्थानांतील ह्या अफाट हरप्पा संस्कृतीचा उगम कसा झाला याबद्दल मात्र अजून कुतूहल आहे. ह्या संस्कृतीचा इराकमधील संस्कृतीशी ऋणानुबंध होता हें निःसंशय होय. परंतु हरप्पा येथील लोकांचे पूर्वज पश्चिम आशियांतील प्रदेशांतून आले असावेत असें मात्र संभवनीय वाटत नाहीं. सिंधमधील अम्री या अति प्राचीन स्थळाविषयी आधींच उल्लेख केला आहे. बलुचिस्थानमध्यें हरप्पाहूनहि पूर्वीचीं ठिकाणें मिळालीं आहेत, जसें कुल्ली, मेही, रणघुणुई, क्वेटा, टोगऊ, इत्यादि. यापैकी कांही स्थानांची कालपरंपरा हरप्पाच्या कालापर्यंतहि येऊन पोहोंचतें असें म्हणण्यास हरकत नाही. बलुचिस्थानमध्यें इतस्ततः विखुरलेली खेडूत वस्तीच होती. ह्या संस्कृतीची कांहीं उपांगें जरी हरप्पा संस्कृतीशी मिळतीजुळती असलीं तरी तिच्यापासूनच हरप्पा संस्कृतीचा जन्म झाला असावा असें निश्चितपणें प्रतिपादन करण्यास अजून तरी जागा नाहीं हें मात्र खरें.

ह्या हरप्पा संकृस्तीचा अंत कसा व केव्हां झाला याबद्दलहि अजून निश्चित माहिती उपलब्ध नाहीं. असें म्हणतात कीं, परकीयांच्या स्वाऱ्या, नद्यांचे पूर किंवा जमिनीची नासधूस या कारणांमुळें ही संस्कृति नष्ट झाली असावी, परंतु असें निश्चितपणें म्हणण्यास सबळ पुरावा अजून मिळालेला नाहीं. पुराणवस्तुशास्त्रदृष्टया अजूनहि उत्तरेकडे तरी हा पुरावा उपलब्ध झालेला नाहीं. मोहेनजदडो शहराच्या अंतकाळीं या संस्कृतीचा ऱ्हास होत असल्याची चिन्हें दिसून येतात, आणि कोणी तरी परकीय लोकांनीं कांहीं प्रमाणांत विध्वंसकार्य केल्याचेंहि आढळून येतें. झुकार व चन्हुदरो येथें तर हरप्पा संस्कृतीच्या पाठोपाठ एका अलग संस्कृतीचीं वैशिष्टयें आढळून येतात, ज्यास तज्ञ 'झुकार संस्कृति' असेंहि संबोधितात. ह्या संस्कृतीची खास खूण म्हणजे फिक्कट आणि धुवार किंवा धुळवट (buff or cream) मातीचीं भांडीं आणि त्यावरची लाल किंवा जांभळया रंगाचीं चित्रें होय. ह्या संस्कृतीचा पूर्वीच्या हरप्पा संस्कृतीशी ऋणानुबंध होता असें निश्चितपणें म्हणण्यास अजून जागा नाही. खुद्द हरप्पा येथेंहि एक अशी संस्कृति सांपडली आहे कीं, तिची मुख्य खूण म्हणजे मृत देहास मोठ्या मातीच्या रांजणांत पुरत असत. या रांजणांवर आणि येथें सांपडलेल्या इतर मातीच्या भांडयावर अशीं चित्रें आढळून येतात कीं, तीं हरप्पाच्या इतर मातीच्या भांडयांवरील चित्राहून अति भिन्न होत. ह्या विक्षिप्त संस्कृतीस 'स्मशान एच् (Cemetery H) संस्कृति' या विशिष्ट नांवानें तज्ञ लोक संबोधितात. मूळ हरप्पाच्या लोकांनीं या शहराचा त्याग केल्यानंतर बऱ्याच कालानंतर या समाधिस्थळाचें अस्तित्व असल्याचें आढळून येतें.

पूर्वेस उत्तरभागाच्या सखल मैदानांत या हरप्पा लोकांच्या पाठोपाठ जे लोक आले ते कांहीं विशिष्ट प्रकारची मातीचीं भांडीं वापरत असावेत असें दिसून येतें, आणि या भांडयांना "painted grey ware" म्हणजे चितारलेली राखी भांडीं असें तज्ञ लोकांनी नांव ठेविलें आहे. एवढें मात्र निश्चितपणें आढळून येतें कीं, हे नवीन लोक या ठिकाणीं हरप्पाच्या लोकांचा नायनाट झाल्यानंतरच आले असावेत. अशा रीतीनें हरप्पा संस्कृति आणि ही नवीन संस्कृति यांमधील कालांतराविषयीं सध्यांतरी बिलकूल माहिती उपलब्ध नाहीं.

गुजराथेंत मात्र परिस्थिति भिन्न असण्याचा संभव आहे. येथे रंगपुरला, आणि कांहीं प्रमाणांत लोथललाहि, हरप्पा आणि त्याच्या पाठोपाठची संस्कृति यांत कांहीं बाबतींत साम्य दिसून येतें. नंतरच्या संस्कृतीच्या मातीच्या भांडयांच्या आकृतींत आणि हरप्पाच्या भांडयांच्या विशिष्ट आकृतींत स्पष्टपणें ऋणानुबंध असल्याचें दिसून येतें. साहजिकच अंदाज निघतो कीं ही नंतरची संस्कृति हरप्पाच्या संस्कृतीशीं संलग्न असावी. हरप्पा संस्कृतीच्या अस्तित्वाच्या खूणा गुजराथेंत बऱ्याच इतर ठिकाणीं आढळून आल्या आहेत. उदाहरणार्थ, रोडजी येथें. गुजराथेंत याचे नंतरच्या संस्कृतीचेहि अवशेष सांपडले आहेत. उदाहरणार्थ, प्रभासपट्टण येथें; परंतु हे अवशेष अन्यत्र अजून मिळालेले नाहींत.

म्हैसूर राज्यांत ब्रम्हगिरि येथें जें उत्खनन करण्यांत आलें त्यांत ताम्राश्मीय संस्कृतीचे अवशेष मिळाले. येथें सांपडलेल्या पुराणवस्तूंमध्यें राखी व लाल रंगाची भांडीं, अभिनव पाषाणशस्त्रें, चिमुकलीं पाषाणशस्त्रें, चर्ट नांवाच्या दगडाची सुरीसारखी पातीं आणि कांहीं

तांब्याच्या वस्तु यांचा समावेश होतो. लाल रंगाच्या भांड्यांवर काळ्या रंगानें काढलेलीं चित्रेंहि दिसून येतात. दक्षिण व मध्य हिंदुस्थानांत साधारणपणें इ. पू.वें १५०० ते ५०० पर्यंतच्या काळांत ताम्राश्मीय संस्कृतींचा व्याप चोहींकडे पसरला होता असें संशोधनाअंतीं आढळून आलें आहे. आतांपर्यंत खालील ताम्राश्मीययुगीन स्थलांमध्यें उत्खनन करण्यांत आलें आहे :—

तुंगभद्रा नदीच्या खोऱ्यांत ब्रम्हगिरि व मस्की येथें ; गोदावरी नदीच्या खोऱ्यांत नासिक, जोरवे, नेवासे व दैमाबाद येथें ; तापी नदीच्या खोऱ्यांत बहाल व प्रकाशें येथें ; नर्मदा नदीच्या खोऱ्यांत महेश्वर, नावदातोली व त्रिपुरी येथे ; आणि चंबळ नदीच्या खोऱ्यांत नागदा येथें. या प्रत्येक भागाच्या संस्कृतींत आपापलें वैशिष्टच दिसून येतें, परंतु कांहीं बाबतींत साम्यहि आढळून येतें. उदाहरणार्थ, अभिनव पाषाणशस्त्रें व चिमुकलीं पाषाणशस्त्रें यांचा उपयोग, तांब्याच्या वस्तु, काळ्या रंगानें चित्रें काढलेलीं लाल रंगाचीं भांडीहि सर्वत्र दिसून येतात. कालमानदृष्ट्याहि ह्या संस्कृतींचा परस्पर संघर्ष व ऋणानुबंध स्पष्ट दिसून येतो. तसेंच हरप्पा संस्कृतीच्या उत्तरार्धाची अवस्थाहि येथें आढळून येतें. कांहीं ठिकाणीं ह्या संस्कृतीचा उद्‌भव थोडा आधींच झालेला दिसून येतो.

राजस्थानांत उदेपुरजवळ अहार येथें ताम्रश्मीय संस्कृतीचे अवशेष मिळाले आहेत. त्यांत चिमुकलीं पाषाणशस्त्रें, व काळ्या व लाल रंगाचीं चित्रासहित किंवा चित्रें नसलेलीं भांडीं आहेत. उत्तरेकडील ताम्राश्मीय संस्कृतीच्या पाठोपाठ एक संस्कृति अशी आहे कीं त्यामध्यें 'काळ्या' व लाल रंगाच्या मातीचीं भांडीं वापरण्याचा प्रघात होता. ह्या भांड्यांचे वैशिष्टच म्हणजे भट्टींत भाजण्यासाठीं ती उलटी ठेवली जात आणि अशा स्थितींत हवेच्या अभावामुळें आगीच्या धुराने भांड्यांच्या आंतील भाग काळा होई आणि हवेंत असलेला बाहेरचा भाग लाल होई. माळव्यांतील उज्जयिनी या शहरीं इ. पू. ७ व्या शतकांत वस्ती झाली असावी व तेथें हीच संस्कृति असावी असे दिसते. यावेळेस लोखंडाचा उपयोग तेथील लोकांना माहीत झाला होता.

वर म्हटलेंच आहे कीं उत्तर हिंदुस्थानांतील नदींच्या खोऱ्यांत व मैदानांत हरप्पा संस्कृति लुप्तप्राय झाल्यानंतर राखी रंगाच्या मातीच्या भांड्यांच्या संस्कृतीचें अस्तित्व दिसून येते. रूपर येथील उत्खननांत आढळून आलेंच आहे कीं हरप्पा संस्कृति आणि ही नवीन उद्‌भवलेली संस्कृति ह्यामध्यें कांहीं कालावधि असा होता की ज्याविषयीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. अर्थात् त्या दोन्ही संस्कृतीचा कोणत्याहि प्रकारचा परस्पर सबंध नव्हता हे सिद्ध होतें.

ह्या नवीन संस्कृतीच्या खाणाखुणा उत्तर राजस्थान, पंजाब , मध्य व पश्चिम उत्तर प्रदेश या प्रांतांतील बऱ्याच प्राचीन ठिकाणीं सांपडल्या आहेत. मीरत जिल्ह्यांतील हस्तिनापुर या प्राचीन स्थळीं जे महत्त्वाचें उत्खनन झालें होतें त्यांत असें समजून आलें कीं या नूतन संस्कृतीचा प्रादुर्भाव एका ओबडधोबड लाल रंगाच्या मातीच्या भांड्यांच्या संस्कृतीनंतर होतो. तज्ञांचा असा अंदाज आहे कीं गंगा नदीच्या खोऱ्यांत कांहीं ठिकाणी तांब्याच्या हत्याऱ्यांचे जे मधून मधून समूह मिळालें आहेत त्यांचा या ओबडधोबड भांड्यांशीं कांहींतरी ऋणानुबंध असावा. असो.

रूपर आणि हस्तिनापूर येथें राखी रंगाच्या मातीच्या भांड्यांबरोबरच लाल आणि काळा-लाल भांड्यांचा प्रादुर्भाव असल्याचें आढळून येते. भाजलेल्या विटांचा उपयोग माहीत नसल्याचेंहि दिसून येते. ह्या संस्कृतीच्या अन्तावस्थेत लोखंडाचा उपयोग माहीत झाला असावा आणि हस्तिनापूर येथें हा उपयोग नदीच्या मोठ्या पुरामुळेंच विशेषेंकरून माहीत झाला असावा असें दिसतें.

राखी रंगाच्या चितारलेल्या भांड्यांची संस्कृति अदमासें इ. स. पू. १००० ते इ. स. पू. ७५० पर्यंत अस्तित्त्वांत होती असें दिसते. या संस्कृतीची उपस्थिति सामान्यतः उत्तर हिंदुस्थानांत (पश्चिम पंजाब वगळून जेथें ह्या बाबतींत शोधकार्य झालेले नाही) बहुतकरून आर्यांनी सुरवातीस ज्या भागांत वसाहती केल्याचा समज आहे, व ज्याविषयीं वैदिक वाङ्मयांत उल्लेख पण मिळतात, त्याच भागांत ह्या संस्कृतीचें अस्तित्त्व आढळून येतें. यामुळें कांहीं तज्ञांचें असें म्हणणें आहे कीं ही संस्कृति आर्यांचीच असावी.

हिंदुस्थानच्या पुराणवस्तुशास्त्र दृष्टचा पुढील महत्त्वाची घटना म्हणजे एका विशिष्ट प्रतीच्या मातीची चमकणारी भांडीं मिळतात ही होय. हीं विशेषेंकरून काळ्या रंगाची असतात, मधूनमधून इतर रंगाचीहि मिळतात. या भांड्यांना तज्ञ लोक "उत्तरेची चमकणारी काळी भांडीं किंवा N.B.P." या विशेष नांवानें संबोधितात. अलाहाबादेजवळ कौशांबी आणि राजघाट-वाराणशीसारख्या प्राचीन शहरांच्या ठिकाणीं ह्या भांड्यांचे अवशेष फार प्रमाणांत मिळतात; आणि म्हणूनच असा कयास आहे कीं गंगानदीच्या या शहरांच्या आसपासच्या प्रदेशांत हीं भांडीं बनविण्याच्या कलेचा प्रथमतः उगम झाला व तेथून तिचा हिंदुस्थानांत सर्वत्र प्रसार झाला. पाकिस्तानच्या सरहद्द प्रांतांत तक्षशीला या प्राचीन ठिकाणांपासून दक्षिणेंत गुन्तूर जिल्ह्यांत अमरावती या ठिकाणापर्यंत या भांड्यांचा उपयोग झालेला आढळून येतो. तक्षशीलेच्या उत्खननावरून असें दिसून येतें कीं जेथें ग्रीक विजेता अलेक्झांडरचीं नाणीं सांपडतात त्याच्याहि खालच्या जमीनींतल्या थरांत ह्या भांड्यांचे अवशेष सांपडतात. म्हणजे कालमानदृष्टचा हे अवशेष इ. पू. ६ व्या किंवा ५ व्या शतकांतली असावींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. पश्चिम हिंदुस्थान, दख्खन व मध्यप्रदेशांतील प्राचीन स्थानीं हेच अवशेष ताम्राश्मयुगीन (Chalcolithic) जमीनीच्या थराला लागूनच वरच्या थरांत मिळतात. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकाचे नंतर मात्र हीं भांडीं उपयोगांत आणली जात नव्हतीं असें दिसून येतें.

भगवान बुद्ध व महावीर ह्यांच्या काळापासून या भांड्यांचा आरंभ होतो हें वाचकांच्या लक्ष्यांत आलें असेलच. ह्या काळांत हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं मोठमोठी शहरें भरभराटीस आलीं होतीं. भाजलेल्या विटांचा बांधकामासाठीं सर्रास उपयोग होऊं लागला; लोखंडाचा मोठ्या प्रमाणांत उपयोग होऊं लागला; आणि धातूची नाणींहि प्रचारांत येऊं लागलीं. देशाची सर्व दृष्टिने प्रगति होऊं लागली म्हणजे सांस्कृतिकदृष्टचा भारताच्या प्राचीन ऐतिहासिक काळाची खरीखुरी सुरूवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

दक्षिण हिंदुस्थानांत याच सुमारास म्हणजे इ. पूर्व ५०० च्या सुमारास किंवा कांहींशा नंतरच्या काळांत एका नवीन संस्कृतीचा प्रादुर्भाव झाल्याचे दिसून येतें. ह्या संस्कृतीचे

वैशिष्टच म्हणजे मृतांच्या देहांना पुरण्याचा विशिष्ट संस्कार हें होय. ह्या संस्काराप्रमाणें प्रेताला खुल्या जागेंत सोडून देत आणि नंतर त्याच्या कांहीं विस्कळित अस्थि एका पाषाणाच्या बनविलेल्या थडग्यांत पुरविल्या जात. मोठमोठे पाषाण जमिनींत रचून मध्यें हें थडगे बनविलें जाई आणि त्यावर एक मोठी शिला ठेवली जाई. अशा रितीनें जें स्मारक किंवा समाधि बनविली जाते त्याला तज्ज्ञ लोक 'Megalith' (अजस्त्र पाषाणाची समाधि) म्हणतात व अशा चालीच्या लोकांच्या संस्कृतीस Megalithic Culture म्हणतात. या थडग्यांचा आकार व स्वरूप भिन्नभिन्न ठिकाणीं वेगवेगळे दिसून येतात. काहीं ठिकाणीं तर पाषाणाचा उपयोगहि केलेला दिसत नाहीं. तरीपण कांही ठराविक बाबतींत त्यांच्यांत साम्यवैशिष्टच जरूर आहे. थडग्यांच्या आंत अस्थिसमवेत काळचा-लाल रंगाची भांडीं व लोखंडाच्या वस्तू सांपडतात. दक्षिण हिंदुस्थानांत ही संस्कृति कोण्यातरी नवीनच उपस्थित झालेल्या लोकांनी आणली असावी यांत शंका नाहीं. कांही विद्वानांचें म्हणणें आहे कीं, हे नवीन लोक म्हणजे द्रावीडी लोक असावेत.

ब्रम्हगिरि व मस्की येथील उत्खननांत असें दिसून आले आहे कीं ही पाषाण-समाधीची संस्कृति ताम्राश्म संस्कृतीच्या पाठोपाठच अस्तित्वांत आली असावी. आणि तिच्यानंतर लगेच इ. स. च्या पहिल्या शतकांत जे सातवाहन राजे राज्य करीत होते त्यांची संस्कृति आली. सातवाहनांच्या संस्कृतीची खूण म्हणजे त्यावेळची लालसर रंगाच्या मातीची भांडीं व त्यांचेवरची फिकट पांढऱ्या रंगाची रेखामय चित्रें हें होय.

इ. स. पहिल्या शतकांत दख्खन प्रदेशाचे रोमच्या साम्राज्याशीं बरेच व्यापारी संबंध होते, व दोन्ही देशामध्यें चांगलेच व्यापारी दळणवळण चालू होते. दक्षिणेंच बऱ्याच ठिकाणीं जीं हजारो रोमन नाणीं सांपडून येतात त्याचे हेंच कारण होय. दक्षिणेच्या पूर्व समुद्रकिनाऱ्यावर पांडेचरीजवळ अरिकेमिडु येथें कांही वर्षापूर्वी उत्खनन झालें. त्यावरून असें समजते कीं हें ठिकाण पूर्वी एक व्यापारी बंदर असावे. कारण या उत्खननांत येथें रोममध्यें अरेझो येथें बनविलेली मातीचीं भांडीं सांपडलीं आहेत आणि त्यांवर हीं भांडीं बनविणाऱ्याच्या नांवाचे शिक्के मिळतात. त्याचप्रमाणें चक्रीदार छापांची (Rouletted Ware) मातीची भांडी व चंबू (Amphora) ही पण येथे सांपडतात. भपकेदार: लाल रंगी भांडीं, ज्याला रोमची "समियन भांडीं" या नांवाने ओळखतात व जी साधारणत पहिल्या शतकांतली असल्याचें मानतात, तींहि हिंदुस्थानांत कांहीं ठिकाणीं, विशेषत: पश्चिम किनाऱ्याच्या प्रदेशांत, सांपडतात.


रूपर, हस्तिनापुर, मथुरा, अहिच्छत्रा, श्रावस्ति, राजगिर, चन्द्रकेतुगढ, उज्जयिनी इत्यादि ज्या उत्तर व मध्य हिंदुस्थानाच्या प्राचीन स्थानीं आजपर्यंत उत्खनन केलें आहे त्यांत वर उल्लेखिलेल्या 'N.B.P.' संस्कृतिनंतरचेहि अवशेष सांपडले आहेत. यानंतरच्या संस्कृतीचें निश्चित कालमान ठरविण्यास उपयुक्त अश्या बऱ्याच लेखी मुद्रा, शिक्के, नाणीं व लेख आढळून येतात. ज्यांचा निश्चित काल माहीत आहे अशा राज्यकर्त्यांचा उल्लेख असलेल्या नाण्यांवरून तसेंच उपलब्ध लेख व शिक्के यांच्या लेखनपद्धति किंवा शैलीवरून या वस्तूंच्या किंवा त्यांच्यासमवेत मिळालेल्या इतर वस्तूंचा निश्चित कालमान ठरविण्यास बरीच मदत होते. निरनिराळ्या प्रकारची मातीचीं भांडीं, खेळणीं आणि अशाच अन्य




मोहन्जो-दारो : ब्रॉन्झ धातुची नर्तिका




मोहन्जो-दारो : ब्राँन्झ धातुची नर्तिका



देऊलबड (पश्चिम बंगाल) : नवपाषाणयुगीन परशु



नागार्जुनकोंडा : मध्यभागीं स्वस्तिक असलेला स्तूप




मल्लर (मध्यप्रदेश) : व्याघ्र-राजाचा ताम्रपट









मोहन्जो-दारो : ठिसुळ दगडावरील मुद्रेचे ठसे




रत्नगिरि (ओरिसा): विहाराचे प्रवेशद्वार (उत्खननानंतर)




बिरभानपूर (पश्चिम बंगाल) : पाषाणाचीं चिमुकली हत्यारें




प्राचीन---पूर्वाश्मयुगीन पाषाणाचीं हत्यारें




अमलोथा (तापी नदीचें खोरें) : पाषाणाचीं हत्यारें (SERIES II)




ब्रह्मगिरि (म्हैसूर) : गुळगुळीत दगडी कुऱ्हाडी




हस्तिनापूर: राखी रंगाची चित्रांकित मृत्पात्रें




लोथल : नाल्या व सार्वजनिक गटारें



लोथल : घरें आणि त्यांची गटारें



आग्रा : ताजमहाल——मुख्य प्रवेशद्वार (दुरुस्ती चालू असतांना)



ब्रह्मगिरि (म्हैसूर) : विशाल पाषाणापासून बनविलेलें प्राचीन थडगें

वस्तू सर्वत्र सांपडतात. परंतु पूर्वीच्या काळांत ज्याप्रमाणें 'N.B.P.' सारख्या भांड्यांचे अवशेष मिळतात---ज्यामुळें विशिष्ट एकसूत्री सांस्कृतिक परंपरेचा बोध होतो---तसे अवशेष मात्र या काळांत आढळण्यांत येत नाहींं. या वस्तूंच्या प्रादुर्भावांत प्रादेशिक वैशिष्ट्येंच जास्त आढळून येतात.

उत्खननामुळें हिंदुस्थानच्या अतिप्राचीन संस्कृतींविषयी जो बोध होतो त्याचा हा संक्षिप्त गोषवारा आहे. व त्यावरून दरवर्षी पुराणवस्तुशास्त्रानें कसकशी प्रगति केली याची नीट कल्पना येईलच. देशांतील निरनिराळ्या प्राचीन स्मारकें आणि वस्तूंविषयी सविस्तर विवेचन वाचकांपुढें ठेवणें येथें अप्रस्तुत होईल कारण हा एक स्वतंत्र विषय होय.

१९५८-५९ सालांतील कार्य

उत्खनन

सन् १९५८-५९ सालीं देशांतील बऱ्याच प्राचीन स्थानीं उत्खनन-कार्य झालें. त्याचें सारांशतः विवरण खालीलप्रमाणें आहे:—

उतनूर.—आंध्रप्रदेशांत मेहबुबनगर जिल्ह्यांतील उतनूर या ठिकाणीं आंध्र सरकारच्या पुराणवस्तुखात्यानें उत्खनन केलें. याठिकाणीं अभिनव-पाषाणायुधें वापरणाऱ्या लोकांची वसाहत असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. उत्खननस्थानीं जमिनीवर बऱ्याच खांचांचीं चिन्हें सरळ रांगेंत असल्याचें आढळून आलें आहे. ह्या खांचा खांब रोंवण्याकरितां असाव्यात, व त्यावरून या वसाहतीभोंवती लांकडांचा बनविलेला कोट उभारला होता असें दिसतें. या कोटाची परिसीमा काय असावी ह्याचाहि या खांचांच्या रांगेवरून अंदाज निघतो. ही वसाहत कित्येक वेळां अग्नीच्या भक्ष्यस्थानीं गेली असावी, कारण जळलेल्या वस्तूंचे थरचे थर उत्खननांत मिळाले आहेत. येथील लांकडी कोळशाचा तुकडा 'कार्बन १४' या शास्त्रीय पद्धतीनें ब्रिटिश म्युझियममध्यें कसोटीस लावल्यावर असें दिसून आलें कीं, तो ४१२० ± १५० वर्षापूर्वीचा असावा.

टी-नरसीपूर.—म्हैसूर सरकारच्या पुराणवस्तुखात्यानें म्हैसूर जिल्ह्यांतील 'टी-नरसीपुर' याठिकाणीं उत्खनन केलें. अभिनव-पाषाणयुगांत प्रचारांत असलेल्या विशिष्ट मातीच्या भांड्यांचे अवशेष येथें मिळाले आहेत आणि तेच येथील सर्वांत प्राचीन वसाहतीचे निर्देशक होत. हीं भांडीं राखी रंगाचीं असून चांगलीं जाडजुड होतीं आणि त्यांच्या बरोबरच बदामी आणि नारिंगी लाल रंगाचीं पण भांडीं वापरलीं जात. कधीं कधीं राखी भांड्यांवर नक्षीकाम कोरलें जात असें व नारिंगी लाल भांड्यांवर जांभळ्या रंगाच्या वक्ररेषा काढल्या जात. अगदी खालच्या थरांत सांपडलेल्या राखी रंगाच्या भांड्यांच्या तोंडाच्या कडेला लोखंडी कावेचा भगवा रंग दिला असल्याचें आढळून आलें आहे. सांपडलेल्या राखी रंगाच्या दोन भांड्यांत आजकालच्या झारीप्रमाणें द्रव पदार्थ ओंतण्यासाठीं नळीच्या तोंडाची सोय ठेवली आहे. या उत्खननांत गुळगुळीत केलेल्या दगडाच्या कुऱ्हाडी आणि दगडी वरवंटे पण बऱ्याच संख्येनें मिळाले आहेत. तांब्याचा उपयोग करण्याची माहिती या वसाहतीच्या लोकांना अवगत नसल्यानें त्यांची संस्कृति वस्तुतः ताम्राश्मयुगपूर्व म्हणजे अभिनव-पाषाण-युगीनच समजावयास हरकत नाहीं. पोंवळ्यासारखे पाचा काढलेल्या दगडी गोट्याच्या गाभेशिवाय सांपडलेल्या वस्तूंत चिमुकल्या पाषाणायुधांचा अभावच दिसून येतो.

या उत्खननाच्या दुसऱ्या कालखंडांत महाश्मीय (megalithic) संस्कृतीची विशिष्ट प्रकारची काळी व लाल मातीचीं भांडीं मिळतात. त्यांचेबरोबरच एक लोखंडाची कट्यार पण मिळाली आहे.

लोथल.—मध्यवर्ती सरकारच्या पुराणवस्तुखात्याच्या 'लोथल-उत्खनन-योजना' नामक शाखेनें अहमदाबाद जिल्ह्यातील नुकत्याच प्रसिद्धीस आलेल्या हरप्पा संस्कृतीच्या

लोथल नांवाच्या प्राचीन स्थानीं या वर्षींहि उत्खनन चालू ठेविलें. या उत्खननांत नगरांतील चार रस्ते—दोन उत्तर-दक्षिण दिशेनें व दोन पूर्व-पश्चिम दिशेनें जाणारे— आणि दोन गल्ल्या उघडकीस आल्या. एका रस्त्याच्या कडेनें १२ घरांची रांग दिसून आली. या घरांमध्यें स्नानगृहांची सोय होती व त्यांतून पाणी बाहेर काढण्यासाठीं व्यवस्थेशीर बांधलेल्या मोऱ्यांची व्यवस्था होती. या मोऱ्यांचें पाणी रस्त्याच्या बाजूंच्या गटारींत काढण्यांत येत असे. संडासाच्या पाण्याची विल्हेवाट लावण्याकरितां पाणी शोषणारे मातीचे रांजण (soakage jars) आणि कुंडीं अथवा डबकीं यांचीहि व्यवस्था केली जात असे, असें दिसतें.

या उत्खननांत पूर्व-पश्चिम ७१० फूट लांब व उत्तर-दक्षिण १२० फूट रुंद असें विटांनीं बांधलेलें आवार सांपडलें आहे. आवाराच्या पूर्वेस खाडी असून भिंतींत एक लहान खिंड होती. त्यांतून समुद्रांतल्या बोटी आवारांत येत असत व मधल्या धक्क्यास किंवा चौथऱ्यास जाऊन लागत असत असा अंदाज आहे. आवाराच्या दक्षिण बाजूस एक नाली होती व तींत मधले पाणी कमी-जास्त करण्याची सोय व्हावी म्हणून फिरकीचा दरवाजा बसविला होता.

लोथलच्या प्राचीन वस्तिकालाचे मुख्यतः पांच भाग पडतात. पैकीं चार भाग हरप्पा संस्कृतीच्या समृद्ध दशेचे द्योतक आहेत व पांचवा भाग त्या संस्कृतीच्या ऱ्हासकालाची जाणीव देतो. या शेवटच्या कालखंडांतील नगर-रचना पूर्वीसारखी गुंतागुंतीची दिसून येत नाहीं. या काळाच्या कुम्भकारानें आपल्या मालाच्या बनावटींत पूर्वीपेक्षां नवीन तऱ्हा आणल्या होत्या. तरी पण हरप्पा संस्कृतीच्या विशिष्ट आकृतीच्या कांहीं भांडीं आणि इतर वस्तुहि ह्या कालांत प्रचारांत होत्या असें दिसून येतें.

येथील स्मशानभूमींत उत्खनन करतांना भिन्नभिन्न कालखण्डाची दहा थडगीं मिळालीं. त्यातील तीन थडगीं जुनी असून त्यांतल्या दोन थडग्यांतले सांपळे एकमेकाजवळ ठेवलेले सांपडले. या सांपळ्यांची कसून शास्त्रीय तपासणी अजून व्हावयाची आहे. परंतु तपासणीनंतर त्यांतला एक पुरुषाचा व दुसरा स्त्रीचा आहे असें जर सिद्ध झालें तर सती किंवा त्यासारखी चाल इतक्या प्राचीन काळांतहि अस्तित्त्वांत होती असें समजण्यास आधार मिळतो.

उत्खननांत मिळालेल्या लहान वस्तूंमध्यें सहा शिक्के आहेत. त्यांवर निरनिराळ्या प्राण्यांच्या आकृति काढलेल्या दिसतात. एकावर वाघाची आकृति आहे. एका भाजलेल्या मातीच्या शिक्यावर तर दोन-तीन प्राण्यांचा संयोग केलेली विचित्र आकृति आहे—म्हणजे सोंड हत्तीची, शिंगें बैलाचीं आणि शेंपूट सर्पासारखी असा हा प्राणी आहे !

येथल्या मातीच्या भांड्यांवरच्या नक्षीकामांत लाल अंगावर काळ्या रंगाने किंवा फिक्कट रंगाच्या अंगावर तपकिरी रंगानें काढलेल्या चित्रांचा भरणा जास्त आहे. या चित्रांत पक्षी आपल्या चोंचीत मासे पकडीत आहेत; तसेंच बगळे, हरिण, मोर, चिमण्या, सर्प, इत्यादि प्राण्यांच्या आकृति पण या चित्रांत सामान्यतः दिसून येतात.

रोजडी.—मुंबई सरकारच्या पुराणवस्तुखात्यानें सौराष्ट्रांत मध्यसौराष्ट्र जिल्ह्यांतील रोजडी येथील उत्खनन चालू ठेविलें. हें स्थान हरप्पा संस्कृतीच्या अखेरच्या कालावस्थेचें द्योतक आहे. येथील वसाहतकालाचे तीन भिन्नभिन्न कालखंड पडतात. पहिल्या काल-खण्डांत असें दिसून येतें कीं, येथील लोक मातीचा थोडा उंच चबुतरा बनवून त्यावर आपली

मातीची किंवा साध्या गाऱ्याच्या विटांचीं घरें बांधीत. यांचीं भांडीं चिकण मातीचीं बनविलेलीं असून तीं चांगल्या रीतीनें भट्टींत भाजलेलीं असत. या भांड्यावर लाल किंवा तपकिरी रंगाचा गिलावा लावलेला असे. कांहीं भांड्यांना काळ्या रंगाच्या पट्ट्यांनीं सुशोभित करीत. 'चर्ट' नावाच्या दगडाची हत्यारें, तांब्याचीं औजारें, नागमोडी वळणाच्या सोन्याच्या अंगठ्या, तांब्याच्या बांगड्या, कार्नेलियनचे मणि, Faience आणि मातीचीं खेळणीं ह्या वस्तू त्यावेळी उपयोगांत येत. दुसऱ्या कालविभागांत लाल व फिक्कट रंगाचीं भांडीं मिळतात. या भांड्यावर लाल, फिक्कट किंवा तपकिरी रंगाचा गिलावा दिला जाई व त्यावर काळ्या रंगानें चित्रें काढलीं जात. घरें साध्या गारा आणि दगडाचीं बांधलीं जात व त्यावर चुन्याचा गिलावा केला जाई. घरांतील तळभागाची जमीन ठोक्यांनीं दाबून घट्ट केली जाई. शेवटच्या काळांत मात्र केवळ दगडगोट्याचीं घरें बांधलीं जात. हरप्पा संस्कृतीच्या उत्तरार्धांतील भांड्यासारखीं भांडीं येथें मिळालीं आहेत आणि त्याबरोबरच प्रभासपट्टनला दुसऱ्या काळांत मिळालेल्या भांड्यासारखीं भांडीं पण मिळालीं आहेत.

आलमगीरपुर.—ह्या वर्षांतील फार महत्त्वाचा शोध म्हणजे हरप्पा संस्कृतीचें आणखी एक स्थान आलमगीरपुर येथें सांपडलें हें होय. हें ठिकाण मीरत जिल्ह्यांत असून दिल्लीहून २८ मल ईशान्येस यमुना नदीस मिळणाऱ्या हिंदोन नदीच्या किनाऱ्यावर आहे.

उत्खननांत येथें चार भिन्नभिन्न कालाच्या वसाहती असल्याचें दिसून आलें, आणि यांतील सर्वांत पूर्वीचा पहिला काळ हा हरप्पा संस्कृतीचाच होय. कोणत्याहि इमारतीचे अवशेष जरी अजून येथें मिळाले नसले तरी भाजलेल्या विटांच्या आणि लांबट कौलांच्या अस्तित्वाबद्दल मात्र पुरावा मिळाला आहे. हरप्पाची विशिष्ट आकृतीचीं भांडीहि येथें सांपडतात ; उदाहरणार्थ, तिवईवरच्या तबकड्या (dish-on-stand), निमुळत्या बुडाचा जाम किंवा पेला (goblet), इत्यादि. विशेषेंकरून रंगाचे पट्टे, त्रिकोन, चौकोन, द्विभागलेल्या रेषा, भिन्न भिन्न वनस्पति किंवा मोर यांच्या आकृति या भांड्यांवर चितारलेल्या दिसून येतात. कांहीं कुंड्या किंवा हौदांवर सांकेतिक चिन्हें कोरलेलीं सांपडलीं आहेत, आणि एकावर तर कापडाच्या छापाच्या खुणा आढळून आल्या आहेत.

भाजलेल्या मातीच्या खेळण्यांत अस्वल, नंदी आणि सर्प यांच्या आकृति मिळतात. इतर खेळणीं म्हणजे मातीच्या गोळ्या, बैलगाड्या, मातीचे फांसे व मणी व बांगड्या ह्या होय. एका मातीच्या मण्यावर सोन्याचें पाणी दिलें असावें असें वाटतें. Faience च्या बांगड्या, शिंपल्याचे आणि किंमती पाषाणाचे मणी, टांचण्या किंवा सुया, ब्रांझ किंवा तांबे याचें तुटलेलें पातें याहि वस्तू येथें सांपडल्या आहेत.

हरप्पा संस्कृतीच्या लोकांनीं ह्या ठिकाणाचा त्याग केल्यानंतर कांहीं काळानें ज्या लोकांनी येथें वस्ति केली ते राखी रंगाचीं भांडीं वापरत असावेत. त्याबरोबरच लाल किंवा काळ्या व लाल रंगाचीहि भांडीं उपयोगांत आणीत असावेत. या भांड्यावर एक प्रकारचा काळा मुलामा दिलेला आढळून येतो. दोन चाकी जनावरांनी ओढल्या जाणाऱ्या खेळण्याच्या गाड्या, खेळण्याचे फांसे, लेखण्या, टांचण्या, हाडापासून बनविलेलीं बाणांची टोंकें, काळ्या जॅस्पर नांवाच्या मूल्यवान दगडाच्या बनविलेल्या चकत्या (disc) आणि कांचेचे

मणि या वस्तूहि सांपडल्या आहेत. सुरवातीपासूनच येथें तांबे व लोखंड ह्या दोन्ही धातू कामांत आणल्या जात असाव्यात. चिकण मातीचे मोठेमोठे गोळे पण सांपडले आहेत आणि त्यावर बोरूच्या छापाच्या खुणाहि आहेत. यावरून तर्क करावयास हरकत नाही कीं, येथील घरें बांधतांना बोरूचा उपयोग केला जाई आणि त्यावर मातीच्या जाड थराचा गिलावा केला जात असे.

या उत्खननांत ज्या तिसऱ्या काळच्या वस्तू मिळाल्या आहेत त्यांत कांहीं विशिष्ट प्रकारचीं भांडीं मिळतात, जीं इतर प्राचीन ठिकाणीं विशेषेंकरून 'उत्तरेची चमकदार काळया' किंवा 'N. B. P.' नांवाच्या भांड्याबरोबरच मिळतात. ही 'उत्तरेची चमकदार काळी' भांडी मात्र आलमगीरपुरला सांपडलीं नाहींत. उत्खननांतील अगदी शेवटचा काळ म्हणजे मुसलमानी अंमलाचा होय; कारण येथें लाखोरी विटा व तत्कालीन मातीचीं भांडींहि सांपडलीं आहेत.

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं, या आलमगीरपुरच्या उत्खननांत अनुक्रमें, हडप्पा राखी रंगाच्या भांड्याचा काळ, प्राचीन इतिहास काळ व मध्ययुगीन काळ अशा चार भिन्न कालावस्थांचा बोध होतो.

नावदातोली.—डेक्कन कॉलेज रिसर्च इंस्टिटयूट या पुणें येथील संस्थेनें मध्यप्रदेश सरकार व बडोदें विश्वविद्यालय यांच्या सहकार्यानें मध्यप्रदेशांतील पश्चिम निमाड जिल्ह्यां-तील नर्मदानदीच्या काठीं नावदातोली या प्राचीन ताम्राश्मयुगकालच्या ठिकाणीं आपलें आधींपासून सुरू केलेलें उत्खनन यावर्षीहि चालू ठेविलें.

या ठिकाणीं एकामागून एक अशा कमींतकमी दहा वसाहती झाल्या असाव्यात असें दिसून येतें आणि या वसाहतींचें चार ठळक कालविभाग पडतात. घरें चौकोर, गोलाकार किंवा लांबट आकाराचीं बांधलेलीं सांपडतात. पहिल्या दोन काळांत घरामध्यें जमीन चुनगच्चीची असावी. पहिल्या काळांतील विशेष गोष्ट म्हणजे नीटपणें बनविलेला एक मोठा खळगा असावयाचा व त्याच्या बाजूस उतार असून चोहींकडें खांब रोंवण्यासाठीं खांचा दिसून येतात. या खळग्यांत दोन लांकडाचें ओंडकी एकमेकांवर समकोन करून ठेवलेलीं होतीं व त्यावर दोन विचित्र आकाराची भांडीं ठेवलेलीं मिळालीं (याचा काय मतलब असावा हें मात्र लक्षांत येत नाहीं.).

तिसऱ्या कालविभागाचे जळलेल्या खांबाचे जे तुकडे उत्खननांत मिळाले आहेत, त्यावरून घराच्या नकाशाची कल्पना येऊं शकते. साधारणत: एका खोलीची लांबी-रुंदी अनुक्रमें १० व ७ फूट असावी. घराच्या भिंती व छप्परें बांबूच्या चटयांची बनविली जात व त्यावर गाऱ्याचा गिलावा केला जाऊन सफेत कल्हई दिली जात असावी.

तांब्याच्या कांहीं वस्तू आणि चालसेडोनी नांवाच्या चकचकीत पाषाणाचीं हजारों पातीं पण या उत्खननांत मिळालीं आहेत. तांब्याच्या वस्तूमध्यें एका तलवारीचा तुकडा किंवा मधला भाग उंचसा असलेली एक कटचार (खंजीर) ह्या वस्तू पण आहेत. अशा कटयारी इराणमध्येहि मिळतात हें येथें नमूद करणे अवश्य आहे.

सामान्येंकरून या उत्खननांत चारी कालखंडांत जीं भांडीं मिळतात त्यांना 'माळव्याची भांडीं' या विशेष नांवानें संबोधण्यास हरकत नाहीं. ह्या भांड्यांचें वैशिष्टच म्हणजे त्यांचा फिक्कट किंवा पिंगट रंग, त्यावरचा लाल रंगाचा लेप अथवा मुलामा आणि त्यावर काळ्या रंगानें काढलेलीं चित्रें हें होय. भांड्यांच्या कांहीं आकृति सुरूवातीपासून अखेरपर्यंत बदललेल्या दिसत नाहींत. पहिल्या कालविभागांतील कांहीं थोडीं भांडीं काळ्या-लाल रंगाचीं असून त्यावर पांढऱ्या रंगानें चित्रें काढलेलीं दिसतात. आणि हाच प्रकार राजस्थानांतील अहार या प्राचीन स्थानीं मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. याच कालविभागांत कांहीं भांडीं अशीं आहेत कीं, त्यावर पांढऱ्या रंगाचा मुलामा आहे आणि त्यावर धांवणाऱ्या हरिणांच्या किंवा नाचणाऱ्या माणसांच्या पंक्ति दाखविणारे रंगीत पट्टे चितारलेले आढळून येतात.

तिसऱ्या कालविभागांत 'जोरवेच्या भांड्या' सारखी भांडीं मिळतात. 'माळव्यांच्या भांड्यांत' तर ओतण्यासाठीं नळी असलेल्या कटोऱ्यांचाहि (Bowl) उपयोग होऊं लागला आणि हे कटोरे इराणमधील ताम्राश्मयुगीन संस्कृतीच्या कटोऱ्यांसारखे दिसून येतात. या वस्तूंचीहि 'कार्बन १४' या शास्त्रीय पद्धतीनें कसोटी (किंवा चांचणी) घेण्यांत आली आहे. आणि त्यावरून असें समजतें कीं, नावदातोलीच्या उत्खननाचा पहिला कालविभाग हा इ. स. पूर्व १६ ते १७ शतकाच्या आसपास असावा आणि चौथा कालविभाग हा इ. स. पूर्व १२ ते १३ शतकाच्या आसपासचा असावा.

दैमाबाद.—गोदावरी नदीस मिळणाऱ्या प्रवरा नदीच्या कांठीं अहमदनगर जिल्ह्यांत दैमाबाद या ठिकाणींहि उत्खनन होऊन आणखी एका ताम्राश्मयुगीन स्थानाचा शोध लागला आहे.. ह्या स्थानाच्या कालावधीचे तीन भाग पडतात. पैकीं, पहिल्या भागाचीं भांडीं जाडजुड व राखी रंगाचीं असून त्यांचे ब्रम्हगिरी येथील पहिल्या काळांतील भांड्यांशीं साम्य जमतें. परंतु, ह्यामध्ये कांहीं भांडीं लाल रंगाचीं काळ्या रंगांनें चित्रें काढलेली अशींहि मिळतात. या दुसऱ्या वर्गाच्या भांड्यांत एक मोठा घडा मिळाला आहे. या घड्यावर रानांतल्या देखाव्याचें एक सुंदर चित्र असून त्याच्या वरच्या भागांत एक मनुष्य उभा असून त्याच्या दिशेनें एक हरणांचें जोडपें जात आहे व मधल्या जागेंत दोन मोर आहेत आणि खालच्या बाजूस उलट्या दिशेनें तीन वाघ पळ काढीत आहेत असा देखावा रंगविलेला आहे. दुसऱ्या कालविभागांतील भांडीं लाल रंगाचीं असून त्यावर काळ्या रंगाचीं चित्रें आहेत. गोदावरी-नर्मदा नदीच्या आसमंतातल्या ताम्राश्मयुगीन संस्कृतीची विशेष खूण म्हणजे द्रव पदार्थ ओतण्यासाठीं नळी असलेलीं भांडीं व त्याचा एक तुकडा येथें मिळाला आहे. तिसऱ्या कालविभागांत 'जोरवेच्या भांड्यां'चा विशेष प्रघात असल्याचें दिसून आलें आहे.

चिमुकलीं पाषाणशस्त्रें या सर्व कालविभागांत आढळून येतात. दुसऱ्या व तिसऱ्या कालविभागांत तांब्याच्या वस्तु मिळतात. या ठिकाणच्या पृष्ठभागावरच अभिनव पाषाणयुगाची छिनीसारखीं हत्यारें तर बऱ्याच संख्येनें मिळालीं आहेत.

सर्व कालविभागांत पुऱ्या पसरलेल्या शवासहित थडगी मिळतात. लहान मुलांच्या अस्थि मातीच्या पात्रांत पुरण्यांत येत असत; या मध्यें दोन पात्रांचा उपयोग करण्यांत येत असे

व त्यांत अस्थि ठेवून दोन्ही भांड्यांचीं तोंडें समोरासमोर मिळवून तीं पुरण्यांत येत. कधीकधीं तिसरें पात्रहि बरोबरच ठेवण्यांत येई.

वैशाली.—बिहारमध्यें मुझफरपुर जिल्ह्यांत प्राचीन वैशाली शहराच्या स्थानावर—ज्याला आजकाल 'राजा विशालचा गड' असें म्हणतात—काशीप्रसाद जयस्वाल इन्स्टिटयूट् या संस्थेनें उत्खनन केलें.

ह्या शहराच्या सभोंवती किल्ल्याचा कोट होता, ज्याच्या इतिहासाचे तीन भाग पडतात. त्यांतील सर्वांत प्राचीन भाग दर्शविणारीं चिन्हें म्हणजे उत्तरेच्या चकाकणाऱ्या काळया (N.B.P.) भांड्याचे अवशेष असलेल्या जमलेल्या मातीच्या उंचवट्यावरचीं विटांची ढिगारें होत. दुसऱ्या काळांत किल्ल्याच्या भिंती मातीच्या बनविलेल्या दिसतात व ही माती भिंतीबाहेरच्या जागेंतून खणून काढल्यामुळें आयताच किल्ल्याभोंवती खंदक तयार झाला होता. तिसऱ्या कालविभागांत किल्ल्याच्या जाड भिंती विटांच्या बनविलेल्या असून त्यांना लागूनच किल्ल्यामध्यें लष्करी शिपायासाठीं राहण्याच्या चाळी किंवा बराकी बनविलेल्या होत्या. ह्या उत्खननांत ज्या पुराणवस्तू मिळाल्या आहेत त्यावरून अनुमान काढता येतें कीं, हा शेवटचा तिसरा कालविभाग शुंग आणि गुप्त राज्यांच्या मधला (म्हणजे इ. स. पूर्व २ रें शतक ते इ. स. ३ ऱ्या शतकापर्यंतचा) असावा. किल्ल्याच्या आंतहि ज्या विटांच्या इमारतींचे अवशेष मिळाले त्यांचा कालमानहि साधारणतः वरील किल्ल्याच्या कोटाच्या कालविभागांशी जुळतो.

उत्खननांतील एका गड्ड्यांत एक भांडें मिळालें व त्यांत सोनें व चांदीच्या वस्तू मिळाल्या त्या अशा—कानांत घालण्याचीं भूषणें व डुलें, केसांचे आंकडे, नंदीच्या मूर्ति आणि कुशानकालीन मथुरा शैलीच्या धर्तीवर बनविलेली मनुष्याकार उभी मूर्ति. जवळच दुसरेंहि असेंच एक भांडें मिळालें त्यांत चांदीचे ताइत आणि कांहींशा मूल्यवान् (semi-precious) पाषाणापासून बनविलेले मणि पण होते.

कौशाम्बी.—अलाहाबाद जिल्ह्यांत यमुना नदीच्या कांठीं असलेल्या प्राचीन कौशाम्बी शहराच्या ठिकाणीं अलाहाबाद विश्वविद्यालयानें आपलें उत्खननकार्य चालू ठेविलें. या शहराच्या संरक्षणासाठींहि तटबंदी असून त्याच्या इतिहासाचे पांच कालविभाग पडतात. यांपैकीं सर्वांत प्राचीन कालविभागाचें चिन्ह म्हणजे भिंती व घरांतील जमिनींच्या तळांच्या ध्वस्तप्राय ढिगाऱ्यांवर बांधलेली तटबंदी ही होय. या सर्वांत प्राचीन तटबंदीच्या अस्तित्वाच्या कालाचेंहि सहा पोट-विभाग पडतात आणि तदनंतरच्या दुसऱ्या कालविभागाचे चार पोट-विभाग मोडतात. अगदी सुरवातीपासून तों अखेरपर्यंत ही तटबंदी म्हणजे एक गाऱ्याची अजस्र भिंत असून त्याचा बाहेरील दर्शनी भाग मात्र भाजलेल्या विटांनी झांकलेला होता. या तटबंदीभोंवती एक रुंद खंदक होता व खंदकाच्या बाजूनें एक सडक होती.

पहिल्या कालविभागाच्या ६ व्या पोट-विभागांत येथें उत्तरेच्या चकाकणाऱ्या काळया N.B.P.) भांड्यांचा प्रादुर्भाव झालेला दिसतो आणि तो दुसऱ्या कालविभागांतहि चालूच राहतो. ह्या भांड्यांवरचीं वैशिष्ट्यें म्हणजे त्यावरील रंगीत चित्रें आणि कोरलेल्या नक्षीकामाचे नमुने हे होय. शिवाय कांही थोडी राखी रंगाचीं भांडीं (ज्यावर

चित्रें सांपडतात) आणि साध्या राखी व लाल रंगांचींहि भांडीं मिळतात. या राख्या व लाल रंगांच्या भांडयांत तर कांहीं खास उल्लेखनीय आकृति बघावयास मिळतात.

श्रावस्ती.—उत्तरप्रदेश राज्यांत बह्रैच जिल्ह्यांत प्राचीन श्रावस्ती शहराचें ध्वस्तस्थान आहे. त्यांतील हल्लीं महेत या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या ठिकाणांत खात्याच्या उत्तर प्रदेशीय शाखेनें उत्खनन केलें. या शहराच्या संरक्षणासाठींहि तटबंदी केली होती ; परंतु शहराची मूळ वस्ती मात्र त्या तटबंदीपेक्षांहि प्राचीन असावी. ह्या मूळ वस्तीचें वैशिष्टच 'राखी रंगाच्या भांडयांच्या अवशेषांनीं' जाहीर होतें आणि त्या अवशेषांबरोबरच कांहीं अशा भांडयांचे अवशेष मिळतात कीं, ते साधारणतः इतरत्र उत्तरेची चकाकणाऱ्या काळ्या (N.B.P.) भांडयांच्या आधींच्या काळांत मिळतात; शिवाय उत्तरेची चकाकणाऱ्या काळी (N.B.P.) भांडीं, लाल भांडीं आणि चमकणारीं काळीं भांडींहि पण —ज्यावर कांहीं नमुन्यांमध्यें फिक्कट किंवा पिंगट रंगाचीं चित्रें पण आढळतात—मिळतात. कांचेच्या हिरव्या बांगडया, कांहींशा मौल्यवान पाषाणाचे बनविलेले मणि, मातीचीं खेळणीं, इत्यादि वस्तूहि येथें सांपडतात.

तटबंदीच्या दुसऱ्या कालावधीचे साधारणतः चार कालविभाग पडतात. पहिल्यात तटबंदी फक्त मातीचे ढीग रचून बनविलेली होती ; दुसऱ्यांत ह्याचेवर विटांची भिंत बनविली गेली; नंतरच्या तिसऱ्या कालविभागांत मातीचा भराव लावून तटबंदीची उंची वाढविली गेली आणि तदनंतरच्या चौथ्या कालविभागांत परत विटांच्या भिंतीची तटबंदी केली गेली.

या काळांतील मातीचीं भांडीं बनविण्यांतहि महत्त्वाचे फेरफार झालेले दिसून येतात. उत्तर हिंदुस्थानांतील शुङकालीन प्राचीन ठिकाणांत जीं विशिष्ट प्रकारचीं लाल व जाड अंगाचीं राखी रंगाचीं भांडीं मिळतात त्यांचा यांत जास्त भरणा आहे. अयोध्येचीं चिन्हें असलेलीं नाणीं, 'नागा' कृति मातीची खेळणीं, रंगेल जोडप्यांच्या आकृति, कोरलेल्या मातीच्या गोलाकृति मुद्रा (Plaques), कांचेचे व स्फटिकाचे मणि हेहि येथे सांपडलें आहेत. शहराच्या आंतील भागांतील उत्खननावरून असें समजून येतें कीं, तटबंदीच्या दुसऱ्या कालविभागांत या शहराची पहिली वसाहत झाली. येथें सांपडलेल्या भांडयावरून पूर्व मध्ययुगीन काळांत नंतरची दुसरी वसाहत झाली असें आढळून येतें. एकंदरींत असें म्हणता येईल कीं, श्रावस्तीच्या इतिहासाचा प्रारंभ काल इ. स. पूर्व ७५० ते ५०० च्या आसपासचा असावा, दुसरा काळ इ. स. पूर्व २५० ते इ. स. पूर्व ५० चे दरम्यानचा म्हणावयास हरकत नाही.

उदयगिरि.—ओरिसांत पुरी जिल्ह्यांत उदयगिरि नांवाची टेकडी आहे, ज्यावर प्रसिद्ध जैन गुंफा आहेत. येथें पूर्वीय शाखेनें उत्खनन केलें व एक laterite दगडाच्या शिळांनीं बनविलेली मालाकृति (apsidal) आकाराची इमारत शोधून काढली—त्या इमारतीच्या आंतील भागांत एका गोल आकाराच्या भिंतीचे अवशेषहि मिळाले आणि शक्य आहे कीं, येथें एका महत्त्वाच्या पूजेचें स्थान असावें. ह्याच गोलाकार ध्वस्त अवशेषाचे रूपान्तर मालाकृति (apsidal) इमारतींत केलें गेलें असावें. येथें सांपडलेली मातीचीं भांडीं लाल रंगाचीं असून तीं चांगली भाजलेली दिसत नाहींत. जमिनीच्या तळाच्या भरावांत फक्त एक पाषाणाचें छिनीसारखें हत्यार सांपडलें.

पूर्व हिंदुस्थानांत सांपडलेली ही पहिली मालाकार इमारत होय. शेजारच्या लहान खोल्यांत रहाणाऱ्या भिक्षुसाठीं अशा रितीनें पूजेच्या स्थानाची व्यवस्था केली असावी असें दिसतें. या जागेच्या खालच्या बाजूस जवळच्या पहाडीच्या दगडावर ज्या इतिहास-प्रसिद्ध राजा खारवेलचा शिलालेख अजून पहावयास मिळतों त्यानेंच ही इमारत बनविली असावी असें वाटते.

चंद्रकेतुगड.—बंगालमध्यें २४ परगणा जिल्ह्यांत खन-महिरेरधिपि या स्थानावरचें कलकत्ता विश्वविद्यालयाचें उत्खनन यावर्षींहि चालूच राहिलें. येथील उत्खननांत विटांनीं बनविलेल्या गुप्तकालीन मंदिरांचें अवशेष मिळाले. त्याचे तल-मान (plan) चौरस असून, त्याच्या पूर्व, दक्षिण आणि पश्चिम बाजचा मधला भाग थोडा पुढें आलेला आहे आणि उत्तरेस देवडी (vestibule) आहे.

या स्थानाच्या वसाहतकालाचे क्रमशः तीन भाग पडतात. पहिल्या काल विभागांत—जो मन्दिर बनविण्याच्या पूर्वींचा असावा—बांब, लांकूड आणि कौलारु छप्पर यांनीं बनविलेल्या इमारतींची चिन्हें मिळतात. उथळ तोंडाच्या राखी रंगाच्या मातीच्या भांडयांचा येथें जास्त प्रादुर्भाव दिसून येतो. विशेषतः कुशानकालीन लक्षणें असलेलीं पक्क्या मातीची खेळणीं कांहीं प्रमाणांत सांपडतात. या काळांतील भांडीं भिन्नभिन्न प्रतीची असून त्यांत लाल, राखी आणि काळया रंगाचाच भरणा आहे. तिसरा कालविभाग विशेष महत्त्वाचा दिसून येत नाहीं आणि त्यांतील भांडयांच्या प्रकारांत विशेष उल्लेखनीय असे थोडेच नमुने मिळतात.

अमरावती.—आन्ध्र प्रदेशांत गुन्तुर जिल्ह्यांतील अमरावती नांवाच्या प्राचीन स्थानीं एक स्तूप होता पण त्याची आधीच बरीच नासधूस झाली होती. नागार्जुनीकोंडा उत्खनन योजना शाखेनें येथहि उत्खनन केलें व त्यांत या स्तूपाच्या मुख्य घुमटाचा अवशिष्ठ भाग, त्या भोंवतालचा 'आर्यक' चबुतरा आणि प्रदक्षिणापथ शोधून काढला. या उत्खननांत जे इतर इमारतीचे अवशेष मिळाले त्याचे साधारणतः तीन कालविभाग पडतात. पहिला भाग 'उत्तरेची चकाकणारी काळी' (N.B.P.) नांवाच्या भांडयांच्या काळाशी मिळतो. दुसरा भाग रोमच्या कंदुकाकार (rouletted) भांडयांशी संबंध ठेवतो. तिसरा भाग चीनच्या celadon भांडयांच्या व तांत्रिक मूर्तींच्या समकालीन असावा असें वाटतें. स्तूपाच्या कठडया (railings.) च्या उर्ध्वपथाच्या बनविलेल्या खांच्यांत स्फटिकाचे पांच करंडे मिळाले व त्याचप्रमाणें या उत्खननांत बऱ्याच बुद्धधर्मीय मुर्तींहि मिळाल्या.

नागर्जुनीकोंडा.—गुन्तुर जिल्ह्यांतील नागार्जुनीकोंडा या प्रसिद्ध प्राचीन ठिकाणा-वरहि—जें तेथील धरण-योजनानुसार जलमग्न व्हावयाचें आहे—नेहमीप्रमाणें उत्खनन जोरांत जारी राहिलें. येथील कृष्णा नदीच्या खोऱ्यांत बरेच बुद्धधर्मीय अवशेष तर मिळतातच, परंतु त्याजबरोबरच, भिन्नभिन्न पाषाणयुगाचें—म्हणजे प्राचीन पाषाणयुग व अभिनव पाषाणयुगाचे व तसेंच चिमुकले पाषाण-शस्त्रांचें आणि पाषाण-समाधिचे अवशेषहि मिळतात. शिवाय हिंदुधर्माच्या मंदिरांचे व इक्ष्वाकु वंशीयराजांचे २-३ ऱ्या शतकांतील अवशेष मिळतात. या खोऱ्यांतील एका ठिकाणीं चिमुकलीं पाषाण-शस्त्रें मिळालीं; परंतु,

त्यांचेबरोबर मातीच्या भांड्यांचे अवशेष मिळाले नाहींत. अशाच दुसऱ्या स्थानीं मात्र पिंगट मुलामा असलेलीं भांडीं या चिमुकल्या पाषाणशस्त्रांबरोबर मिळाली. तिसऱ्या जागीं अभिनवपाषाणयुगाच्या बऱ्याच कुऱ्हाडी मिळाल्या, आणि येथें कांहीं खड्ड्यांत जनावरांची हाडें, चिमुकली पाषाण-शस्त्रें आणि बरीचशी हातानें बनविलेली मातीची भांडीं पुरलेलीं सांपडलीं. एका पाषाण-समाधींत त्याच्या थडग्याच्या लांबट खड्ड्यांत एक तुटलेली कवटी, लोखंडाची हत्यारें व मातीचीं भांडीं पण मिळालीं.

याच ठिकाणीं आधी अर्धवट शोधून काढलेल्या ९ व्या नंबरच्या स्तूपाचेंहि उत्खनन करण्यांत आलें आणि त्यांत चार कालविभागाच्या इमारतींचे अवशेष मिळाले आणि यांतील तिसऱ्या कालाचें पुनरुज्जीवन (?) एहुवल चन्तमूल या राजाच्या कारकीर्दीच्या ९ व्या वर्षांत झालें असावें असें दिसतें. या स्तूपाच्या गाभाऱ्यांत एक लहान शिलालेखहि मिळाला व त्यांत कुमार-सिरि-वीर म्हणजे वीर पुरुष दत्त याचा राजपुत्र असतांनाचा उल्लेख आहे. जवळच दुसरा स्तूप आहे, ज्याच्या तळभागाच्या मध्यावर स्वस्तिक चिन्ह आहे. तिसरा स्तूप दगडाच्या साध्या गोट्यांचा बनविलेला असून त्याचा बहिर्भाग कोरलेल्या मूर्तींनीं सजविलेला होता असें वाटतें. याचप्रमाणें बुद्धधर्माचे इतर अवशेष पण येथें सांपडलें आहेत.

कृष्णा नदीच्या कांठावर एक शिलालेख पण सांपडला आहे. हा लेख त्यांत विशद केल्याप्रमाणें आभीर राजा वासिष्ठीपुत्र वसुषेन याच्या कारकीर्दीच्या ९ व्या वर्षाचा आहे आणि त्यांत अष्टभुजस्वामीच्या लांकडाच्या मूर्तीच्या स्थापनेबद्दलचा उल्लेख आहे. ह्याच भागांत शंखाचीं शिंपलें पण सांपडलीं आहेत आणि त्यावर 'अष्टभुजसामिस' असें लिहिलेलें असून खालच्या बाजूस मध्ये चक्राची आकृति आणि दोन्ही बाजूस अंकुश व छत्र यांच्या आकृति कोरलेल्या आहेत.

नागार्जुन पहाडीच्या उत्तरेच्या उतारावर पूर्वी कदाचित् तेथील राजवंशाच्या मृतांच्या दहनविधीसाठीं स्मशान होते. येथें दोन उल्लेखनीय मूर्ती सांपडल्या. एक आहे एका स्त्रीच्या दहनविधीच्या आधींच्या अवस्थेंत (in state) आणि दुसरींत एक स्त्री शिडीवर चढलेली असून जणूं काय अग्नींत उडी मारीत आहे असे दाखविलेलें आहे.

या प्राचीन ठिकाणाच्या बालेकिल्ल्याच्या तटबंदीचे दोन कालविभाग पडतात. पहिल्या भागाची तटबंदी गारा व मुरुम यांनी जमवून केली असून त्याचे भोंवती मोठा रुंद खंदक होता. दुसऱ्या कालांत याच तटबंदीवर विटांची भिंत उभारली होती.

येल्लेश्वरम.—आन्ध्रप्रदेश-सरकारच्या पुराणवस्तुखात्यानें नलगोंदा जिल्ह्यांतील नागार्जुनी-कोंड्यासमोर, कृष्णानदीच्या पलिकडच्या कांठीं येल्लेश्वरम् या ठिकाणीं आपलें पहिल्या पासूनचें उत्खनन यावर्षीहि चालूं ठेविलें. या उत्खननांत काळ्या रंगाचा मुलामा असलेलीं लाल रंगाचीं मातीचीं भांडीं, मातीचीं खेळणीं आणि शिशाचीं नाणीं सांपडली जी बहुतेक सातवाहन राजवटीच्या समकालीन असावींत. यांचे खाली जमिनींत पाषाण-समाधींचे अवशेष मिळाले व त्यांचेबरोबर विशिष्ट प्रकारची मातीचीं भांडीं पण मिळालीं. पैकी एका थडग्यांत किंवा समाधींत माणसाच्या दोन कवट्या व इतर अस्थि मिळाल्या. त्यांच्या जवळच पाचरीच्या आकाराच्या (wedge-shaped) विटांनीं बनविलेल्या इमारतीचें अवशेष पण मिळाले. शक्य आहे कीं, येथें कदाचित स्तूप व घाट असावेत.

रत्नगिरि.—ओरिसांत कटक जिल्ह्यांत रत्नगिरि नांवाच्या पहाडावर एक बुद्धधर्मीय प्राचीन स्थान आहे. तेथे १९५७-५८ सालांत खात्याच्या पूर्वीय शाखेनें उत्खनन करून एका भरदार स्तूपाचे अवशेष उघडकीस आणले. या स्तूपाभोवतीं बरेच लहानसहान नवसाचे (votive) स्तूप पण मिळाले. यावर्षाच्या उत्खननांत या स्तूपाच्या उत्तरेस असलेल्या दोन भव्य मठांचे अवशेष उघडकीस आले. यापैकी पहिल्या मठाच्या प्रवेश भागाची रचना (plan) विशेष खुबीनें केली असून त्याला चांगल्या नक्षीकामानें सजविलेलें दिसतें. दाराच्या clorite नांवाच्या दगडाच्या चौकटीवर सुंदर कोरीव काम आहे व त्यांच्या गणेशपट्टी किंवा कपाळपट्टी (lintel) वर गजलक्ष्मीची मूर्ति कोरलेली आहे. चौकटीवरच्या दोन्ही बाजूच्या खोदीव कप्प्यांत बुद्धधर्मीय देवतांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. याचे शिवाय गंगा व यमुना नदींच्या देवतांच्या मूर्ति पण कोरलेल्या होत्या. या मठाच्या पार्श्वबाजूच्या भिंतीस लागून मठांतील मंदिर होतें, ज्यांत भूमिस्पर्श मुद्रा असलेली बुद्धाची विशाल मर्ति होती. ही मूर्ति khondalite पाषाणापासून घडविलेली होती.

ह्या मठाची भिंत भरभक्कम असून त्याला ओसरी (verandah) ची सोयहि होती. बौद्ध मठांच्या नेहमीच्या रचनेप्रमाणें तळमजल्यावरच्या लहान खोल्या असून, त्यावर आणखी एक मजला होता. ज्यावेळीं या खालच्या भिंती मोडकळीस येत आणि दुभंगून पडत, त्यावेळी या तळमजल्यावरच्या खोल्या पडलेल्या विटांच्या ढिगाऱ्यांनी बुजविण्यांत येऊन वरच्या जागेवर राहण्याची व्यवस्था करण्यांत येई. या खोल्यांपैकी दोन खोल्यांना मात्र अशा रीतीनें बुजविलेलें दिसत नाहीं; कारण त्या खोल्यांचा उपयोग व्हावा म्हणून त्यांत कमानदार दरवाज्यांची सोय केलेली दिसते. मठाच्या आंतलें अंगण आणि त्यांचे भोंवतालच्या ओसऱ्या पडलेल्या ढिगाऱ्यापासून उत्खननामुळें मोकळ्या झाल्या आणि त्याचे मूळ स्वरूप उघडकीस आणलें गेलें. मठाच्या आंतल्या मंदिराचीहि दुरुस्ती व डागडुजी करून तें थोडेसें सुस्थितींत आणलें गेलें होतें. या मंदिरावर पूर्वी एक भव्य व उंच शिखर असावें परंतु तें केव्हांच नाहींसे झाले आहे. ह्या शिखराचा आकार व स्वरूप ओरिसाच्या तत्कालीन हिंदु मंदिरांच्या धर्तीवर असावें असें म्हणावयास हरकत नाहीं.

या मठाच्या बाजूस एक अरुंद गल्ली किंवा बखळ जागा असून पलीकडे दुसरा मठ होता; त्याची अवस्था मात्र अतिशय मोडकळीस आलेली दिसली. त्याच्या पूर्व आणि दक्षिण बाजूंच्या खोल्यासमोरच जोडून लहानलहान खोल्या होत्या. त्यांचे कमानदार घुमटीदार छत होतें. लहान खोल्यांच्या पाठीमागेच्या बाजूस दगडाच्या चौकटीची खिडकी होती. मठाच्या पाठीच्या भिंतीस लागून मंदिर होतें व त्यांत khondalite पाषाणापासून बनविलेली वरदमुद्रेंत बुद्धाची मूर्ति होती.

वास्तुशास्त्रदृष्टचा पहिल्या मठाचें मूळ बांधकाम आठव्या शतकांतलें असावें व त्याचा उपयोग १३ व्या शतकापर्यंत झाला असावा. दुसरा मठ थोडचा नंतरच्या काळांत बांधलेला असावा; परंतु पहिल्या मठाची नंतर जी दुरुस्ती किंवा पुनरोद्धार झाला त्याचे आधींच तो बांधला गेला असावा.

या उत्खननांत बुद्ध व महायान-वज्रयान बुद्धपंथाच्या देवतांच्या बऱ्याच पाषाणाच्या आणि अष्टधातुच्या मूर्ति मिळाल्या आहेत. बुद्धधर्मग्रंथांतील उताऱ्यांनी अंकित बऱ्याच मातीच्या चकत्या (tablets), कोरींव काम व शिल्पकामानें अलंकृत बरींच शिलापट्टेंहि या उत्खननांत मिळालीं आहेत. कांहीं मातीचे शिक्के पण सांपडले आहेत व त्यावर श्री-रत्नगिरि-महाविहारीयार्य-भिक्षु संघस्य हा सामान्य 'बिरुद' आढळून येतो. यावरून स्पष्टच आहे कीं, पूर्वीपासूनच या ठिकाणाचे 'रत्नगिरि' हें नांव प्रचलित आहे.

लालकोट---दिल्ली.---खात्याच्या 'पश्चिमोत्तर' शाखेनें दिल्लीस अधमखानाच्या थडग्याच्या पश्चिमेस जे प्राचीन स्थान आहे तेथें उत्खनन केलें आणि दिल्लीच्या पूर्वमध्य-कालीन तटबंदीच्या विशिष्ट पद्धतीवर प्रकाश पाडला. या कोटाची भिंत दगड व विटांनी बांधलेली असून भिंतीस मधूनमधून अर्ध भरभक्कम गोलाकार बुरुजांनीं मजबुती आणलेली होती. प्रसिद्ध कुतुब-मीनारेच्या पूर्वेस जो जुना लालकोटचा बालेकिल्ला म्हणून दाखविण्यांत येतो त्याचेहि अवशेष उघडकीस आणले गेले.

इन्द्रगड.---मध्यप्रदेश सरकारच्या खात्यानें मन्दसोर जिल्ह्यांतील इन्द्रगड या ठिकाणीं उत्खनन करून एका भग्न मंदिराच्या तळभागाचे अवशेष शोधून काढले व त्याबरोबरच बऱ्याच कोरलेल्या मूर्ती व नक्षीकामाचे दगड आणि तीन शिलालेख पण सांपडलें. या लेखां-पैकीं एक लेख तेराव्या शतकांतला आहे. मन्दिराच्या जागेजवळच तीन भिन्न कालभागाच्या इमारतींचे अवशेषहि मिळाले व ते बहुधा ८ व्या ते १२ व्या शतकांच्या आंतले असावेत. मंदिरापासून तीन फर्लांग अंतरावर एक प्राचीन स्थान पण मिळाले, जेथ चिमुकली पाषाण शस्त्रें, मातीचीं भांडीं आणि अर्धवट बनविलेले मणि सांपडतात.

चित्तोडगड.---खात्याच्या 'पश्चिम शाखेनें' प्रसिद्ध चितोड किल्ल्यांतील 'महासती' नांवाच्या आवारांत उत्खनन केलें. स्थानीय परंपरेप्रमाणें येथें राजपूत स्त्रिया सती गेल्या अशी समजूत आहे. या आवारांत ५ भिन्न कालविभागाच्या इमारतींचे अवशेष मिळाले, पैकी तिसऱ्या आणि चवथ्या काळांत तीन देव्हारे आणि एका वाडीचे अवशेष मिळाले. या वाडींत राखेचे तीन थर आढळले व जवळच राखेचे तीन खड्डे व तीन सतीच्या शिळा मिळाल्या.

प्राचीन लेखवाचन

या वर्षी बरेच शिलालेख शोधून निघाले. त्यांपैकी महत्त्वाच्या लेखांविषयीं माहिती अशी आहे :---

१. अफगानिस्थानमध्यें कन्दाहार शहराजवळ अशोककालीन शिलालेख मिळाल्याची बातमी आहे---लेख ग्रीक अरेमिक भाषांमध्यें असून त्यांतील आज्ञापत्र (edict) बादशहा अशोक यांच्या कारकिर्दीतल्या दहाव्या वर्षी जारी करण्यांत आले होते.

२. महाराष्ट्रांत औरंगाबाद जिल्ह्यांत पितलखोरा येथें बुद्धधर्मीय गुफा आहेत. त्यांत दोन ब्राह्मी लिपींतले शिलालेख सांपडले. पैकी एका लेखांत धेनुककट येथील एका रहिवाशानें दान केल्याचा उल्लेख आहे. ब्राह्मी लिपीचे १३ लेख नागार्जुनीकोंडयास मिळाले आणि त्यांत इक्ष्वाकुवंशीय राजा वसिष्ठीपुत्र एहुवल चंतमूलच्या राजवटीच्या

१३ व्या वर्षाचा उल्लेख आहे. असेच दोन लेख मथुरेस पण मिळाले, त्यांतील एका लेखाची तारीख कुशान राजा कनिष्क याच्या राजवटीचे द्वितीय वर्षातील असून, दुसरा लेख कनिष्क—शक ९२ मधील आहे. याच लिपीचा लेख एक सौराष्ट्रांत सांपडला व त्यांत तीन ओळी असून तो क्षत्रपकालीन असावा असें वाटतें.

३. मथुरेस ५ व्या शतकाचा संस्कृत शिलालेख मिळाला आहे. त्यांत नृपमित्र नांवाच्या राजाचा व कवि दत्त यांचा उल्लेख आहे. मध्यप्रदेशांत बिलासपुर जिल्ह्यांत मल्लार या ठिकाणीं 'शरभपुर' च्या राजवंशांतील अनुक्रमें जयराज, प्रवरराज आणि व्याघ्रराज यांचे तीन ताम्रपट मिळाले. भोपालजवळ धर्मपुरी या ठिकाणच्या पहाडीच्या एका कप्प्यांत (rock-shelter) गुप्तकालीन चित्रिलेला लेख सांपडला आहे. चितोड येथील ६ व्या शतकांतल्या लेखांत दशपुर (मन्दसोर) आणि मध्यमा (नगरी) येथील राजस्थानीय, कोणी एक वराह, विष्णुदत्त नांवाचा एक व्यापारी आणि मनोरथस्वामी मंदिराचा उल्लेख आहे. बिहारमध्यें दरभंगा येथेंहि एक मध्ययुगकालीन ताम्रपट मिळाला आहे आणि त्यांत राजा जीवगुप्त आणि त्याचे पिता रामगुप्त यांचा उल्लेख आहे.

४. बिहारमध्यें शहाबाद जिल्हांत शहाबादजवळ ताराचंडी नांवाची पहाडी आहे. त्यावर एक शिलालेख आहे. त्यांत जपिलाधिपति (आजचें जाप्ला) महानायक प्रतापधवल यानें असे जाहीर केले आहे कीं, कन्नोजचा राजा विजयचन्द्र यांच्या एका अधिकाऱ्यास लांचलुचपत देऊन स्वर्णहल (सुवर्णहल) येथील ब्राम्हणांनी एक बनावट ताम्रपट हस्तगत केला होता व अशा रितीनें हीं दोन गांवे लबाडीनें बळकाऊन बसले होते. राजस्थानांत उदेपुर जिल्ह्यांत इस्वल येथे एक पंचायतन मन्दिर आहे. तेथील लेखांत गुहिल राजा मथनसिंह याचा उल्लेख आला आहे. उज्जयनीस जे लेख मिळाले आहेत त्यांत एकांत एका प्राकृत नाटकाचा उतार मिळाला आहे. दुसऱ्या लेखांत एका परमार राजाचा अयोध्या शहरावरील विजय मिळविण्याबद्दलचा उल्लेख आहे. तिसऱ्यांत 'रणरंगमल्ल' नांवाच्या वीरानें लढाईत शौर्य दाखविल्याविषयीं म्हटलें आहे.

५. गंजम जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं सहा ताम्रपत्र मिळाले. पैकी पहिला महाराजा उमावर्मा याचा आहे, दुसरा महाराजा नन्दप्रभंजन याचा व तिसरा गंग राजवंशाच्या श्वेतक नांवाच्या शाखेंतील महाराजा जयवर्मा याचा आहे. चौथाहि याच शाखेंतील महाराजा समन्तवर्मा याचा आहे. पांचवा शैलोभ्दव वंशाच्या एका राजाचा आहे आणि सहावा एका भजवंशीय राजाचा आहे. हा शेवटचा लेख पूर्वीच्या शैलोभ्दव राजाच्या ताम्रपत्रावरच कोरलेला आहे.

६. कलकत्त्याच्या संग्रहालयांत दोन शिलालेख आढळून आले. एक नवव्या शतकांतील असून मणिनागानें मूर्ति स्थापन केल्याचा त्यांत उल्लेख आहे. दुसरा दहाव्या शतकाचा आहे, त्यांत मूलसर्वास्तिवादपरिषदेचा सभासद आणि वङ्गविषय प्रदेशचा रहिवासी स्थविर धर्ममित्र यानें मूर्तिची स्थापना केल्याविषयीं म्हटलें आहे.

७. अहमदाबाद जिल्ह्यांतील हिलोल येथील एका ताम्रपटांत महाराजाधिराज कक्क याच्या कारकिर्दींत महासामन्त चंद्रादित्य यानें जमीन दान केल्याबद्दलचा उल्लेख आहे. नांदेड जिल्ह्यांतील बहादरपुर येथे एक अर्धवट तुटलेला लेख मिळला असून त्यांत

राष्ट्रकूट राजघराण्यांतील दन्तिदुर्ग, कृष्ण (पहिला) इत्यादि राजांचा, तसेंच यादव व तुङ्ग राजवंशांचाहि उल्लेख आहे. याच जिल्ह्यांत होत्तुल या गांवीहि लेख मिळाला आहे व त्यांत एका वह्निकुलांतील राजाचा मांडलिक सिद्धगि यानें महादेवाचें मन्दिर बांधल्याविषयी म्हटलें आहे आणि ह्याच गृहस्थानें कल्याण (कल्याणी) येथें स्थाणु-देवाची स्थापना केली होती. त्याच जिल्ह्यांत ताडखेळ नांवाचें गांव आहे तेथेंहि दोन शिलालेख सांपडले व त्यांच्यात पश्चिम-चालुक्य राजे त्रैलोक्यमल्ल सोमेश्वर (पहिला) व भुवनैकमल्ल सोमेश्वर दुसरा यांचा उल्लेख आहे. परभणी जिल्ह्यांत उखळाद यां गांवी २० जैन मूर्तींच्या पाद-पीठावर शिलालेख मिळाले आहेत व त्यांत शके १२३८ ते १७६४ पर्यंतच्या कालांतील भिन्न भिन्न तारखांचा उल्लेख आहे. सुरत जिल्ह्यांत नवसारीला देवगिरीचा यादव राजा रामचन्द्र याचा लेख मिळाला आहे.

८. अनन्तपुर जिल्ह्यांत वररेड्डीपल्ली येथें पूर्वीय चालुक्य घराण्यांतील राजा विनयादित्य सत्याश्रय (६९० शके ?), याच्या राजवटीच्या दहाव्या वर्षाचा लेख मिळाला आहे. आंध्र प्रदेशांत राष्ट्रकूट राजांचा वारंगळ जिल्ह्यांत झाफरगड येथें ९ व्या शतकाचा कानडी लेखहि सांपडला आहे. लेखांतील राजाचें नांव मात्र स्पष्ट वाचले जाऊं शकत नाहीं. पूर्वीय चालुक्य घराण्यांतील अलीकडचा राजा सर्वलोकाश्रय विष्णुवर्द्धन महाराज याचा उल्लेख असणारा एक लेख विशाखापत्नम जिल्ह्यांत गोपालपत्नम गांवी सांपडला आहे. याच जिल्ह्यांत रवादा या गांवीं पूर्वीय गंग राजघराण्यांतील राजा अनन्तवर्मा चोडगङ्ग याचा तामीळ भाषेंतील लेख मिळाला आहे; त्यांत मलइमण्डलम् (म्हणजे सध्यांचा केरळ देश) मधील व्यापाऱ्यानें एका मन्दिराला दान केल्याचा उल्लेख आहे. पूर्व व पश्चिम किनाऱ्यांतील प्रदेशांत या काळांत व्यापारी दळणवळण चालू होतें, हें या लेखानें जाहीर होतें. वारंगळ जिल्ह्यांत हनमकोंडा या गांवाजवळ कोमारपल्ली नांवाची पहाडी आहे; त्याच्या पाषाण-शिलावर १०७९ चा लेख आहे. हा काकतीय राजघराण्यांतील पुरुषांचा सर्वांत प्राचीन लेख असून त्यांत राजा विक्रमचक्रिन् महामण्डलेश्वर बेट (दुसरा) याचा उल्लेख आहे. करिमनगर जिल्ह्यांत मन्थनी या गांवी याच राजघराण्यांतील राजा गणपति याचा लेख मिळाला आहे. वारंगळ येथें एक पाषाणशिलेवर काकतीय राजा गणपतिदेवाच्या राजगुरुचा पुत्र नारायणमहर्षि यानें केलेले योगशस्त्र हें काव्यच कोरून लिहिलेलें सांपडले आहे. दुसरें असेंच एका सिद्ध जोडप्यांवर रचिलेले शृंगार रसभरित काव्य पण याच व्यक्तिनें केले असून तेंहि असेंच कोरलेलें मिळाले आहे. याच जिल्ह्यांत नारायणगिरि या ठिकाणीं १००६ चा लेख सांपडला असून त्यांत सत्याश्रय कुलांतील राजा गुणगरसाचा उल्लेख आहे. चित्तूर जिल्ह्यांत मुन्दलपुडी या गावीं विक्रमचोल (११२१-२२) च्या राजवटीच्या ३ र्‍या वर्षाचा लेख मिळाला आहे, त्यांत चालुक्यवंशांतील एक नायक नारायणदेव पुडोलरस यानें दान केल्याविषयी म्हटलें आहे. विशाखापत्नम जिल्ह्यांत दिमीळी या गांवी ११९२-९३ चा लेख सांपडला आहे व त्यांत जयमा महादेवीचा पुत्र राजा कुलोत्तुंग पृथ्वीश्वर याचा उल्लेख आहे. याच जिल्ह्यांतील गजुलपेल्लुरु गांवात चौदाव्या शतकांतील तामील लेखांत राजा राजगण्डगोपाळाचा उल्लेख आहे. अनन्तपुर जिल्ह्यांत यदिकी या गांवीं १६ व्या शतकाचीं काहीं शैव व वैष्णव मंदिरें आहेत व त्यावर काहीं तेलगु भाषेंत लेख मिळाले आहेत. त्यांत या मन्दिरांच्या कायकर्त्यांनी किंवा इतर खाजगी व्यक्तिनीं कर्जाऊ पैसे देणें इत्यादि व्यवहारांचा उल्लेख आहे.

९. म्हैसूर राज्यांत पश्चिम चालुक्य घराण्यांतील राजांचें कित्येक लेख मिळाले आहेत. बिदर जिल्ह्यांत जलसंगवी या गांवांतील लेखांत विक्रमादित्य राजाची स्तुति केलेली आहे गुलबर्गा जिल्ह्यांतील शिरिहल्ली गांवाच्या लेखांत राजा त्रैलोक्यमल्ल याच्या कारकीर्दींत तीन मन्दिरें बांधल्याबद्दल उल्लेख आहे. याच जिल्ह्यांतील सेदम गांवाच्या एका खांबावरच्या लेखांत त्रिभुवनमल्ल राजाचा उल्लेख आहे. रायचूर जिल्ह्यांत या राजघराण्याचे कित्येक लेख मिळाले आहेत; पैकी एक शके १०१४ चा असून तो बहुधा विक्रमादित्य पांचवा याच्या कारकीर्दीच्या अखेरच्या महिन्यांतील असावा. दुसरा लेख शके १०६६ चा आहे. त्यांत मरपेरु-मलदेव या नायकानें चोलराजाशी लढाई केली असावी असें दिसतें; ह्याच लेखांत कदंब घराण्याचा नागवर्मरस या मांडलिकाचा उल्लेख आहे. तिसरा लेख १११९ चा आहे आणि तो विक्रमादित्य ६ व्या च्या राजवटींतील असून त्यांत कदंब घराण्यातील नायक 'बुत्तरसा' चा उल्लेख आहे. या बुत्तरसाचा पुत्र माधवात्तिरस असून त्याचाहि उल्लेख राजा भूलोकमल्ल सोमेश्वर याच्या कारकिर्दीतील ११३५ च्या लेखांत आलेला आहे. हलकवातिगि येथील लेखांत कदंब राजा सिंगरस याचा उल्लेख आला आहे. नागवन्द येथील लेखांत नागार्ज्जुन येथील बचिग नावांच्या व्यक्तिनें ११२० मध्यें आत्माहुति दिल्याबद्दलचें म्हटले आहे.

कलचुरि राजवंशाचे दोन लेख मिळाले आहेत. त्यांतील एक बनावटी खोटा लेख विजापूर जिल्ह्यांत निंबाळ गांवीं सांपडला. राजा संकमदेवाच्या राजवटींतील एका ताम्र-पटावर तो लिहिलेला आहे व त्याची तारीख ११८६ अशी आहे. दुसरा लेख धारवाड जिल्ह्यांतील येम्मिगनपुर या गांवाचा आहे. तो एका पाषाण-शिलेवर कोरलेला असून त्याची तारीख १२०२ आहे. हा रायपुरारि सोविदेव याच्या राजवटींतला आहे. त्यांत सोवि-वित्ती नांवाचा व्यापारी धंद्यानिमित्त उत्तरेकडे जात असतांना रस्त्यावर दरोडेखोरांशी सामना देत असतांना तो मेला असें म्हटलें आहे.

धारवाड जिल्ह्यांत जे राष्ट्रकूटकालीन लेख मिळाले आहेत त्यांतील एक कच्छवी गांवचा असून त्यांत राजा धारावर्ष घोर याचा उल्लेख आहे. अनाजी येथें दुसरा लेख मिळाला तो अमोघवर्षाच्या राजवटींतला आहे. अलिकट्टी येथील तीन्हीहि लेख ९३० चे आहेत; ते राजा गोविन्द चौथा याचे आहेत. याच जिल्ह्यांत कोदमग्गी येथील लेख यादव वंशाचा राजा सिंहन याच्या राजवटीचा आहे व त्यांत सिंद कुल नायक बोम्मिदेवरस याचा उल्लेख आहे. शिमोगाजवळ पार्श्वनाथाच्या मूर्तिच्या पीठावर एक लेख सापडला असून त्यांत एक जैन मंदिर बांधल्याचें म्हटलें आहे.

१०. पल्लव राजा सिंहवर्मा (५५०—७५ इ. स.) याचा ताम्रपट तंजावर जिल्ह्यांतून मिळाला आहे. ह्या राजवंशाचा तामीळ भाषेंतील हा सर्वांत प्राचीन ताम्रपट होय. तिरुने-वेली जिल्ह्यांतील दलवयपुरम् येथें पाण्डय राजा परान्तक वीरनारायण सदैयन याचा दानलेख मिळाला आहे. कन्याकुमारी जिल्ह्यांत सुचिन्द्रम् येथील मन्दिरांतील १२२८ च्या लेखांत या मन्दिराच्या व्यवस्थेविषयीं बरीच महत्त्वाची माहिती दिलेली आहे. याच ठिकाणीं सोलंतलै-कोण्ड वीरपाण्ड्यचा लेख मिळाला आहे. कन्याकुमारी जिल्ह्यांतील पद्मनाभपुर येथील संग्रहालयांत कांही लेख मिळाले आहेत; त्यांत निर्वासित लोकांच्या वसाहतीच्या व्यवस्थेविषयी माहिती आहे. रामनाथपुर जिल्ह्यांत वेलनगुडि येथें मुसलमानी आक्रमणाच्या काळांत एका व्यक्तीस त्याच्या शौर्याबद्दल भूदान दिल्याबद्दलचा हिजरी संवत् ७३६ (१३३५ इ. स.) चा लेख मिळाला आहे.

नवीन सांपडलेल्या अरबी व फारशी लेखांपैकी खालील लेख विशेष उल्लेखनीय होत :—

नागोर जिल्ह्यांत बारी खातु या गांवीं मामलुक (म्हणजे गुलाम) घराण्याचे कित्येक लेख मिळालें आहेत. यांतील सर्वांत जुना १२३२ चा असून तो अल्तमशच्या राजवटींतला आहे. त्यांत तलाव खोदल्याबद्दलची माहिती आहे. १२६८ चा एक खंडित लेख घियासुद्दिन बल्बनच्या राजवटीचा आहे. याच जागेचा तिसरा लेख फिरोजशहा तुघलकच्या कारकिर्दीतील १३६० चा आहे. त्यांत जिहादमध्यें ६ वीर धारातीर्थी पडल्याचा उल्लेख आहे. उत्तरप्रदेशांत फिरोजशहा तुघलकच्या कारकिर्दींतले बरेच लेख मिळाले; पैकीं एक १३६४ चा जोनपुरहुन मिळाला. दुसरा १३६३ चा अलाहाबादच्या संग्रहालयांत आहे आणि दोन लेख १३७५ चे वाराणसीहून मिळाले आहेत. ह्या सर्व लेखांत मशिदी वगैरे बांधल्याबद्दलचा उल्लेख आहे.

हरदोई जिल्ह्यांतील बेलग्राम येथील लेखांत इब्राहिमशहा शर्कीच्या कारकिर्दींत त्या गांवात जामी मशीद बांधल्याविषयी म्हटलें आहे. त्याची तारीख इ. स. १४४१-४२ असून त्यावेळीं इब्राहिमशहाचा पुत्र महमुद हा राज्य करीत होता.

बरद्वान जिल्ह्यांत कलना या गांवीं दोन लेख गेल्या वर्षी उपलब्ध झाले व ते दोन्ही आतां कलकत्त्याच्या संग्रहालयांत आहे. पैकी एक अल्लाउद्दीन हुशेनशहाच्या कारकिर्दींतला आहे व दुसरा नसरतशहाचा पुत्र अलाउद्दीन फिरोझशहाच्या राजवटींतला आहे.

उपरिनिर्दिष्ट बारिखातु या गांवीं मोगल घराण्यांचे तीन जुने लेख मिळाले. अकबर बादशहाच्या दरबारांतील प्रसिद्ध सरदार व वाङ्मयपटु भक्करचा रहिवासी मीर मुहम्मद मासुम व त्याचा पुत्र मीर बुझुर्ग यानीं या तीन्हीं लेखांची रचना केली होती. त्यांतील एक लेख म्हणतो की, १६०१-२ सालांत महम्मद मासुमला इराकचा (म्हणजे आजकालच्या इराणचा) वकील या नात्यानें पाचारण करण्याची आज्ञा बादशहानें दिली होती.

इतर शोध

निरीक्षण करीत असतांना आणि अकस्मात् रीतीनें १९५८-५९ सालांत बरीच नवीन प्राचीन ठिकाणें शोधून निघाली आहेत. त्यापैकी कांहीं ठळक शोध येथे देत आहोंत.

पूर्व पाषाण-युगीन प्रकार १ ची कांहीं हत्यारें बऱ्याच ठिकाणीं सांपडलीं आहेत. उदाहरणार्थ बुंदेलखंडांत केन नदीस मिळणाऱ्या सोनार, कोप्रा व बीअर्मा नद्यांच्या खोऱ्यांत आणि नर्मदा नदीच्या पूर्वतीरांत, जेथें बरेच जनावरांच्या अश्मीभूत अस्थि पण सांपडल्या आहेत. ग्वालियर, मन्दसोर, इन्दौर, जबलपुर, चान्दा व अमरावती जिल्ह्यांतहि हे अवशेष मिळतात. राजस्थानमध्ये लुनी आणि बनास नद्या व त्यांना मिळणाऱ्या लहान नद्या यांच्या खोऱ्यांत; तसेंच पश्चिम खानदेशांत तापी नदीच्या खोऱ्यांत, ओरिसांत मयूरभञ्ज, केओंजर, धेनकानाल या जिल्ह्यांत व तसेंच कर्नूल जिल्ह्यांत गुन्दलकम्मा नदीच्या खोऱ्यांतहि हे अवशेष सांपडले आहेत. पंजाबांत होशियारपुर व बिलासपुर जिल्ह्यांत सिवालिक पहाडींमध्यें अश्मीभत जनावरांच्या अस्थि मिळाल्या आहेत. प्रकार २ (Series II) गणलीं जाणारीं हत्यारें तर बऱ्याचशा ठिकाणीं मिळालीं आहेत. त्यांपैकी कांहीं ठिकाणीं, उदाहरणार्थ नर्मदातीरीं महेश्वर येथें, दोन्ही प्रकारचीं हत्यारें उपलब्ध झालीं आहेत.

दुसऱ्या प्रकारचीं हत्यारें मध्यप्रदेश, मुंबई व राजस्थान यांच्या निरनिराळ्या प्रदेशांत वर सांगितलेल्या ठिकाणीं मिळतात, याशिवाय पुढे लिहिलेल्या प्रदेशांतहि हीं उपलब्ध झालीं आहेत : जसें, सौराष्ट्रांत भदर व गोमा नदींच्या खोऱ्यांत; अहमदनगर जिल्ह्यांत मुळा व तिला मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यांत, विजापूर जिल्ह्यांत, कओंजर व मयूरभंज जिल्ह्यांत, वैतरणी, खेदकई आणि इतर नद्यांच्या खोऱ्यांत, तसेंच मेदक व कर्नूल या जिल्ह्यांत.

मयूरभञ्ज, केओंजर, घेनकानाल, धारवाड व म्हैसूर जिल्ह्यांत अभिनव पाषाण-शस्त्रें उपलब्ध झालीं आहेत. आग्रा, इंदौर, जबलपुर, सागर, पूर्व-निमाड, पश्चिम निमाड, बन्सांकाठा, झालावाड, खेडा, मध्य सौराष्ट्र, अहमदनगर, केओजर, पुरी व कर्नूल या जिल्ह्यांमध्यें अभिनव पाषाण-शस्त्रें सांपडलीं आहेत, मात्र त्याबरोबर मातींच्या भांड्यांचे अवशेष उपलब्ध होत नाहींत.

सागर जिल्ह्यांत एका दगडाच्या कप्प्यांत (rock shelter) किंवा शिळाकंदरांत रंगीन चित्रांचे अवशेष मिळाले आहेत. असेच अनेक अवशेष मन्दसोर जिल्ह्यांत पण दिसून आले आहेत.

हडप्पा संस्कृतीचीं अदमासें १२ स्थानें मध्य सौराष्ट्र जिल्ह्यांत मिळालीं आहेत. पैकीं एकांत स्मशानभूमि पण होती असें दिसतें. असेंच एक ठिकाण हलर जिल्ह्यांत पण शोधून निघाले आहे. उत्तरेंत भतिंडा जिल्ह्यांत हडप्पा संस्कृतीचें एक स्थान मिळालें आहे.

कांस्ययुगीन (Chalcolithie) स्थान—ज्यांत चिमुकली पाषाण-शस्त्रें व लाल किंवा 'काळ्या व लाल' रंगी मातीचीं भांडी मिळतात—हीं पण कित्येक सांपडलीं गेलीं आहेत. जसे दक्षिणपूर्ण राजस्थानांत बनास व तिला मिळणाऱ्या नद्यांच्या खोऱ्यांत, जयपूर, इन्दौर, मन्दसोर व भडोच जिल्ह्यांत, पश्चिम खानदेशांत ताप्ती नदीच्या खोऱ्यांत, नासिक, अहमदनगर, विजापूर या जिल्ह्यांत आणि सर्वांत दक्षिणेंत, म्हणजे मदुरा जिल्ह्यांत, पण तीं मिळाली आहेत. अजमेर, जयपुर व भिंड जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं आणि गंगा नदीच्या वरच्या खोऱ्यांत बऱ्याच ठिकाणीं रंगीत राखी भांड्यांचे अवशेष प्राप्त झाले आहेत.

शिळांनी बनविलेल्या वर्तुलाकार समाधिची स्थानें, ज्याला पाषाण-समाधि (megalith) म्हणतात, हैदराबाद, जिल्ह्यांत कोईसराम व बलजिगुत्ता या ठिकाणीं मिळालीं आहेत. Cairn-circles, dolmens आणि अस्थि पुरण्याचे घडे (urn-burials) ही कोइंबतुर, दक्षिण अर्काट व धारवाड जिल्ह्यांत उघडकीस आली आहे.

बिहारांत भागलपुर व सरन जिल्ह्यांत अनुक्रमें नाथनगर व चिरांड या ठिकाणी मातीच्या स्तूपाचे अवशेष मिळाले आहेत. औरंगाबाद जिल्ह्यांत पितलखोऱ्याच्या बौध्द-गुफामध्यें बऱ्याच मूर्ति विखुरलेल्या स्थितींत सांपडल्या आहेत. त्या अदमासें इ. पूर्वी १ ल्या किंवा २ ऱ्या शतकांतील असाव्यात. त्यांचे शिवाय चार स्फटिकाचे करंडेहि मिळाले आहेत. मध्यें सौराष्ट्रांत खम्भलिहा या ठिकाणीं कांहीं बौद्ध गुंफांचा समूह मिळाला आहे.

पश्चिम खानदेशांत मोहिद-तर्फ-हवेली या ठिकाणीं एक जैन गुंफांचा समूह सांपडला आहे. गोमई नदीच्या पात्राच्या खडकांत त्या खोदलेल्या असल्यामुळें नेहमी त्या पाण्यांतच असतात.

भिलसा जिल्ह्यांत छपरा व परसोरा या ठिकाणीं; तसेंच झांशी जिल्ह्यांत देवगड-जवळ गुप्तकालीन व गुप्तोत्तरकालीन मन्दिरें व शिल्पें मिळालीं आहेत.

वस्तुसंग्रहालयें

निरनिराळ्या संग्रहालयांच्या संग्रहांत या वर्षीं बऱ्याच पुराणवस्तूंची जोड मिळाली आहे. पैकी कांहींविषयीं माहिती येणें प्रमाणें आहे :—

१. राष्ट्रीय संग्रहालय, नवी दिल्ली, या संस्थेनें दक्षिण हिंदुस्थानाची अनेक शिल्पें, पोथ्या व नाणीं आपल्या संग्रहांत आणली आहेत. कलकत्याच्या प्रसिद्ध इंडियन म्युझियमनें छोटा नागपूरमधील पूर्व पाषाणायुधें, २४ परगणा जिल्ह्यांतील हरिनारायणपुर येथील पूर्वकालीन मातीचीं भांडीं, एक नेपाली ब्रांझ धातुची मूर्ति आणि बरीच नाणीं मिळविलीं.

२. अजमेर येथील राजपुताना म्युझियमनें ११५२-५३ ची तारीख असलेल्या लेखाची जैन तीर्थंकराची मूर्ति मिळविली. बडोद्याच्या म्युझियमनें साबरकांठा जिल्ह्यांतून हिंदु मूर्ति जमविल्या. ओरिसाच्या भुवनेश्वर म्युझियमनें बौद्ध व जैन मूर्ति तसेंच ठिकठिकाणीं उपलब्ध झालेले ताम्रपट मिळविले. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमनें भारहुत स्तूपाभोवतीच्या कठड्याचे तुकडे प्राप्त करून घेतले.

लखनौ येथील स्टेट म्युझियमनें राज्य प्रदेशांत ठिकठिकाणीं उपलब्ध असलेली अभिनव पाषाणायुधें, पाषाण शिल्पें, पक्या मातींची खेळणीं, मणि, मातीची भांडी, विटांचे नमुने आणि बरींच नाणीं मिळविलीं. आसाममधील गौहती म्युझियमनें विष्णुची दगडाची आणि मातीची मूर्ति, आणि आहोम राजांची बरींच नाणीं आपल्या संग्रहांत आणली. बिहारच्या पाटणा म्युझियमनें शहाबाद जिल्ह्यांतील चेला या ठिकाणाहून एक ब्रांझ धातूची देवीची मूर्ति व किरकोळ नाणीं प्राप्त करून घेतली. दरभंगा येथील चन्द्रधारी म्युझियमनें बिहारमधील ठिकठिकाणाहून उपलब्ध हिंदु व बौद्ध मूर्त्या आणि तिबेटच्या ब्रांझ धातूच्या मूर्त्या आपल्या संग्रहांत मिळविल्या.

शिला-समाधि-संबंधित मातींचीं भांडीं, मध्ययुगीन शिलाशिल्पें (ज्यांत विष्णू, भूदेवी, श्री-देवी यांच्या मूर्त्यांचाहि समावेश आहे), धातूच्या मूर्ति व नाणीं इत्यादि प्राचीन वस्तूंनीं मद्रासचें सरकारी म्युझियमहि समृद्ध झालें आहे.

३. कलकत्त्याच्या असुतोष म्युझियमनें पश्चिम बंगालमध्यें ठिकठिकाणीं मिळालेल्या मातींच्या खेळण्याच्या मूर्ति पूर्व-मध्ययुगकालीन मातींची भांडीं, मातीच्या व धातूच्या मूर्ति आणि निरनिराळ्या लोकाकडून मिळालेलीं नाणीं आपल्या संग्रहांत आणलीं. अलाहाबाद म्युझियमनें प्राचीन इतिहासांच्या लेखी मुद्रा, व उत्तरप्रदेशांत ठिकठिकाणचीं मातींची भांडीं आपल्या संग्रहासाठीं प्राप्त करून घेतल्या. भरतपुर जिल्ह्यांत नोह या ठिकाणीं एक विशेष महत्त्वाचें कुशाणकालीन शिल्प मिळालें व तें आतां अंबरच्या म्युझियममध्यें आहे. उमामहेश्वराची एक सुंदर कोरलेली मूर्ति खजुराहोच्या पुराणवस्तुसंग्रहालयांत आणली गेली आहे.

प्राचीन स्मारकांची व्यवस्था व संरक्षण

नेहमीप्रमाणें मध्यवर्ती खात्यानें अनेक राष्ट्रीय महत्त्वाच्या स्मारकांची वार्षिक देखरेख, डागडुजी, खास दुरुस्ती इत्यादि बाबतींत आपले कार्य जारी ठेवलें. या कार्यापैकीं कांहीं महत्त्वाच्या कार्यांचा येथें उल्लेख करणें रास्त आहे. कांही राज्य सरकारांनीहि आपआपल्या ताब्यांतील स्मारकाची अशीच काळजी घेतली हेंहि येथे नमूद केलें पाहिजे:--

१. खात्याच्या मध्य सर्कलनें बाघ येथील गुफांच्या पहाडीवर जो नरम दगडी थर होता तो काढून टाकून खालचा घट्ट थर मोकळा केला. त्यामुळें गुफांमध्यें जे पावसाचे पाणी झिरपत असें तें बरेच बंद झालें. पूर्व निमाड जिल्ह्यांत बऱ्हाणपूर येथील मिनारेचें महत्त्वाचें दुरुस्तीचें कार्य या वर्षीहि चालू राहिलें. मीनारीच्या दर्शनी भागाच्या खराब झालेल्या शिला काढून नव्या शिला लावल्या गेल्या. मीनारेच्या भोंवतालची भिंत व गाभ्यांतील मुख्यस्तंभ यांची मजबूत सांगड बांधण्याची आवश्यकता भासूं लागली आहे व हें कार्यहि तडीस न्यावयाचें आहे.

२. पूर्वीय सर्कलनें आसामांतील शिवसागर जिल्ह्यांतील जयसागर येथील करेनधर राजवाड्याची डागडुजी केली. या राजवाड्याच्या खालचा भाग जमिनींत पुरला गेला होता तो उघडा करण्यांत आला. कटक जिल्ह्यांतील रत्नगिरीस १९५७-५८ च्या उत्खननांत मिळालेल्या स्तूपाचाहि पाण्यापासून बचाव व्हावा म्हणून दुरुस्ती करण्यांत आली, व त्याच्या मोडकळीस आलेल्या दर्शनी भागाची डागडुजी केली. अशाच एका लहान स्तूपाचीहि परत बांधून दुरुस्ती झाली.

पुरी जिल्ह्यांतील कोनारक येथील प्रसिद्ध सूर्यमन्दिराच्या आंतल्या भागांतून भोकें पाडून सिमेंट वा चुन्याचें पाणचट मिश्रण ओतून (म्हणजे grouting करून) पावसाचे पाणी गळूं नये या उद्देशानें दर्जबंदी करण्याचा उपक्रम सुरू करण्यांत आला आहे.

पश्चिम बंगालमध्यें मालदा जिल्ह्यांतील गौड व पाण्डुआ आणि मुर्शिदाबाद येथील व आसपासच्या कित्येक प्राचीन इमारतींत महत्त्वाचीं दुरुस्ती कामें केलीं गेलीं. मुर्शिदाबाद येथें मुर्शिदकुलीखानाच्या थडग्याचा घुमट गेल्या भूकंपात अर्धवट पडून गेला होता तो परत बांधण्यांत आला. त्रिपुरांतील उदेपुर येथील 'गुणवती' मंदिराचीहि मोठ्या प्रमाणांत दुरुस्ती केली गेली.

३. मध्यपूर्वीय सर्कलने वाराणशी जिल्ह्यांतील सारनाथ येथील धमेख स्तूपाच्या खालच्या तळाच्या भागाची आणि जवळच्या मुख्य मन्दिराच्या इमारतीची दुरुस्ती केली. पाटणा जिल्ह्यांतील नालंदा येथील ५ ते ८ नंबरच्या इमारतींच्या विटा क्षाराने ग्रासल्या गेल्यामुळे भिंती खराब झाल्या होत्या ; त्यांना खालून चुनाई करून भिंती मजबूत करण्यांत आल्या. याच जिल्ह्यांतील राजगिर येथील नव्या किल्ल्याच्या उत्तर दरवाज्याची व भिंतीचीहि दुरुस्ती करण्यांत आली.

४. उत्तर छत्तरपुर जिल्ह्यांतील खजुराहो येथल्या मंदिराकडे विशेष लक्ष्य पुरविलें गेलें. पन्ना जिल्ह्यांत नचना कुठार येथील प्राचीन गुप्तकालीन मन्दिराचा खालचा भाग भरावात दाबला गेला होता. हा भराव बाजूस करून मंदिराचा तळभाग भूतलापर्यंत उघडा

करण्यांत आला. आग्र्याच्या किल्ल्यांतील नौबतखान्याच्या पश्चिम कोनाच्या गुळदस्त्याचा वरचा भाग पडून गेला होता, तो परत बांधण्यांत आला. याच नौबतखान्याच्या उत्तरेच्या कमानीच्या आंतील भागावर चित्रांचे अवशेष दिसून आले. मोतीमशीदीचा जो भाग कोसळून पडला आहे, त्याला दुरुस्त करण्याचें कामहि हातीं घेण्यांत आलें आहे.

५. नदीच्या तीराच्या बाजूनें ताजमहालाच्या पायाची तपासणी करण्यासाठीं उत्खनन करण्यांत आलें. त्यांत असें दिसून आलें कीं, ताजमहालची ही इमारत विहीरीचे पाये बनवून उभी केली आहे. येथील इशान्येकडील मीनारीची दुरुस्ती मोठ्या प्रमाणावर हाती घेतली आहे. आवश्यकतेनुसार आग्रा जिल्ह्यांतील प्राचीन इमारतींच्या दुरुस्तीचें कार्यहि केलें गेले आहे. अकबरच्या थडग्याच्या कांहीं कमानींना तडा पडल्या होत्या, त्यांचे-कडेहि लक्ष पुरविलें गेलें.

६. वायव्य सर्कलमध्यें दिल्लीच्या जामीमशीदेचे महत्त्वपूर्ण दुरुस्तीचें काम चालूंच राहिलें. खराब झालेल्या शिळा काढून टाकल्या व त्याच्या जागीं नवीन बसविल्या. भोकांची व चीरांची दर्जबंदी करण्यांत आली, आणि गच्चीवरचा विरविरित गिलावा (concrete) काढून टाकण्यांत आला. दिल्लीच्या लाल किल्ल्यांतील रंग-महाल, दिवान-इ-आम आणि खास-महाल या इमारतींकडेहि लक्ष पुरविण्यांत आलें. तसेंच दिल्लीच्या लालकोटच्या सडकेला लागून असलेल्या भिंतीहि त्यांच्यावरचा भराव बाजूस सारून मोठ्या प्रमाणावर मोकळ्या करण्यांत आल्या व त्यांची डागडुजी करण्यांत आली. कोटला फिरोझशहा, नवी दिल्ली, येथल्या पूर्वेकडील परकोटचाची भित व सूच्याकार चबुतऱ्यावर उभारलेला अशोक-स्तंभ यांच्यामधील जागेंत मूळ जमिनीच्या थरापर्यंत उत्खनन करण्यांत आलें.

७. चित्तूर जिल्ह्यांत चंद्रगिरि येथें राजामहाल व राणीमहाल, चुडाप्पा जिल्ह्यांत सिद्धवटम् येथील किल्ला व त्याचा दरवाजा आणि हैदराबाद जिल्ह्यांत गोलकोंडा किल्ला येथेंहि आग्नेय सर्कलनें महत्त्वाचें दुरुस्तिकार्य केलें. विशाखापत्तनम जिल्ह्यांतील शालिहुण्डम येथील इमारतीच्या अवशेषांकडेहि लक्ष पुरविण्यांत आलें.

रायपुर जिल्ह्यांतील सिरपुर या ठिकाणींहि लक्ष्मण-मन्दिराच्या व्यवस्थेंत महत्त्वाच्या सुधारणा करण्यांत आल्या.

८. त्रिचूर जिल्ह्यांतील मत्तनचेरीच्या राजवाड्याच्या लांकूडकामाच्या संरक्षणाचें कार्य दक्षिण सर्कलनें केलें. चिंगलपुट जिल्ह्यांतील महाबलिपुरम् येथील पंच-पाण्डवांच्या रथांकडेहि लक्ष दिलें गेलें व त्याठिकाणी आसपासची जमीन ठीक सपाट करण्यात आली आणि पावसाळी पाण्याची नीट वाहून जाण्याची व्यवस्था झाली. उत्तर अर्काट जिल्ह्यांत वेलोर येथील किल्ल्यांतहि सुधारणा करण्यांत आल्या. तटावरचा मातीचा भराव व ढिगारे हलविण्यांत आले आणि वर जाण्याच्या पायऱ्या, ज्या नाहींशा झाल्या होत्या, परत बनविण्यांत आल्या. तंजावरच्या बृहदीश्वर मंदिराच्या समोरचा मातीचा ढिगारा हटविण्यांत आला व जमीन ठीक सपाट करण्यांत आली.

बंगलोर येथील अंधार कोठडी, किल्ला व दरवाजे यांचेकडेहि लक्ष पुरविलें गेलें. हसन जिल्ह्यांतील श्रवणबेळगोळा या ठिकाणच्या अक्कनबस्तीच्या प्रवेश-मंडपाच्या

गच्चीचीहि दुरुस्ती करण्यांत आली. येथील खांब थोडे बाजूस झुकलेले होते ते सरळ उभे केले गेले. सफाई करीत असतांना संगमरमराच्या जैन मूर्तीचे ६ तुकडे येथें मिळाले. म्हैसूर जिल्ह्यांतील सोमनाथपुर येथील केशव-मन्दिराच्या आसपासचा चौथरा परत नीट बनविला गेला व मंदिराच्या सज्ज्याची गच्चीहि परत नीट बनविण्यांत आली.

नैऋत्य सर्कलने बऱ्याच महत्त्वाच्या स्मारकांची दुरुस्ती केली व त्याचप्रमाणें औरंगाबाद जिल्ह्यांतील अजंठा, वेरुळ व पितलखोरा येथील पहाडी गुफा, तसेंच पुणें जिल्ह्यांतील कार्ले व भाजा, ठाणें जिल्ह्यांतील कण्हेरी आणि नासिक येथल्या गुफांमध्यें दुरुस्तीचें काम जारी राहिलें. या कार्याचा महत्त्वाचा भाग म्हणजे कांहीं वर्षांपूर्वी उभे केलेले बांधीव खांब काढून टाकून त्याऐवजीं पहाडीच्या खडकाशीं मिळतेजुळते किंवा समरस दिसणारे सिमेंटचे लोखंडाच्या सळयांनी दृढ बनविलेले खांब उभें करणें हें होय.

विजापुर जिल्ह्यांत ऐहोळे व पत्तडकल या ठिकाणी मंदिरांचे समूह आहेत, त्यांच्याकडे व बिदर व विजापुर येथील कांहीं प्राचीन इमारतींकडेहि लक्ष पुरविलें गेलें.

९. चित्तोडगडच्या स्मारकांकडेहि पश्चिम सर्कलनें यावर्षीं विशेष लक्ष पुरविलें होते रतनसिंगच्या राजवाड्याचा दक्षिणी भाग, कुक्कुटेश्वर मंदिर, शृङ्गारचौरी आणि राणा कुम्भाच्या राजवाड्यांतील नगारखाना व झनानामहाल यांचीहि डागडुजी करण्यांत आली चितोडगड जिल्ह्यांत बदोली येथील मंदिरांच्या समूहाकडे पण लक्ष पुरविण्यांत आलें.

पुराण वस्तुविषयक रसायनशास्त्र

खात्याच्या केमिस्ट्री शाखेनेंहि स्मारकांचें, चित्रांचें, उत्खननांत सांपडलेल्या व संग्रहालयांतील पुराणवस्तुंचें रसायनशास्त्रदृष्ट्या संरक्षणकार्य नेहमीप्रमाणें पार पाडलें. या कार्याचा संक्षिप्त अहवाल येणेंप्रमाणें :—

प्राचीन स्मारकांमध्यें असलेल्या चित्रांची रसायनशास्त्रपद्धतीनें सफाई केली गेली. या कार्यांत औरंगाबाद जिल्ह्यांतील वेरुळ व अजंठा, धार जिल्ह्यांतील बाघ, तंजावर, अनन्तपुर जिल्ह्यांतले लेपाक्षी, माण्डया जिल्ह्यांतील श्रीरंगपट्टण, आग्रा, चान्दा, आग्रा जिल्ह्यांत फतेपुर सिक्री आणि अलाहाबाद येथील स्मारकांचा समावेश होतो.

कांहीं स्मारकांवर काई व शेवाळे जमलें होतें, तें रसायनांच्या मदतीनें नीटपणें काढण्यांत आलें. त्याचप्रमाणें हवेनें व क्षारानें दगडाच्या चिपा निघून शिळा खराब होत ; त्यावरहि इलाज करण्यांत आला. ज्या ठिकाणीं हें कार्य करण्यांत आलें तीं अशी :—

चान्दा जिल्ह्यांतील मर्कन्दीचें मन्दिर, छत्तरपुर जिल्ह्यांतील खजुराहोचे खण्डार्य महादेव मन्दिर, जबलपुर जिल्ह्यांतील भेराघाट येथील चौसष्ठयोगिनी मन्दिर, विदिशा जिल्ह्यांतील उदयगिरीच्या पहाडी गुफा, तिरुनेलवेली जिल्ह्यांतील तिरुमल्लैपुरम् येथील गुफा-मन्दिर, पुरी जिल्ह्यांत भुवनेश्वर येथील राजाराणी व लिंगराज मन्दिर, आणि कांगडा जिल्ह्यांतील बैजनाथ मन्दिर. हसन जिल्ह्यांतील श्रवणबेलगोला येथील गोमतेश्वर मूर्तीचाहि या बाबतींत विशेषेंकरून उल्लेख करणें जरूर आहे.

बरद्वान जिल्ह्यांतील बिरभानपुर येथील चिमुकल्या पाषाणशस्त्रांच्या उपलब्धि-स्थानाच्या मातीच्या तपासणीचें कार्यहि चालूं राहिलें. भूगर्भशास्त्रदृष्टचा कालमान ठरविण्याची जी नवीन शास्त्रीय पद्धति आहे (Geochronological investigation) त्या पद्धतीचा अवलंब या कार्यांत केला गेला आहे. लोथलच्या उत्खननांत मिळालेल्या मातीचे नमुनेहि याच पद्धतीनें कसोटीस लावले जात आहेत.

GPN—J-2984—DDADAND—29-12-62—1,000.